

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# समग्र रायगड

## पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण

महाराष्ट्र शासन

रायगड
जिल्हाधिकारी
प्रकाशन

घारापुरी (एलिफंटा) | कोंडाणे लेणी | खडसांबळे (नेणवली)| कुडे | ठाणाळे (नाडसूर) | आंबिवली |

रेवदांड्याचा इतिहास | द्रोणागिरी | कर्नाळा किल्ला | प्रबळगड | कासा (पद्मदुर्ग)| अवचितगड | सांक्षी

रेवदंडा आगरकोट | जंजिरा | तळागड | घोसाळगड | बिरवाडीचा किल्ला | लिंगाणा | सोनगड | बिक

(ढवळ्या) | पेठचा किल्ला | ढाक | सरसगड | सूरगड | पीरवाडी | अलिबाग | वरसोली | थळ-किहि

धबधबा | फणसाड व सिद्धेश्वर धबधबा | झेनिथ धबधबा | ताम्हिणी व भिवपुरी | मंडाळा व वरदा

जीवना बंदर | रेवस | जे.एन.पी.टी. | दिघी | मांडवा | फणसाड | कर्नाळा | खारफुटीचे जंगल | ऑलिव्ह

(नांदगाव) | श्री विक्रम विनायक | मुगवली स्वयंभू गणपती | श्री हरिहरेश्वर काळभैरव | हरिहरेश्वर क्षेत्र

| वीरेश्वर | भुवनेश्वर | शितळादेवी | सोमजाई | दत्तमंदिर (चौल-भोवाळे) | दत्तमंदिर (मुरूड) | रूपना

धावीर महाराज | श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ भैरव | शिवथरघळ | आवास | गगनगिरी आश्रम | शंक

अली शाह दरबार | बेने इस्रायली आळी | घोणे काष्ठशिल्प संग्रहालय | करमरकर शिल्पालय | उरण | ना

रेवदंड्याचे नानासाहेब व अप्पासाहेब धर्माधिकारी | चिरनेरचा जंगल सत्याग्रह | गेल इंडिया लिमिटेड |

| रॅडिसन अलिबाग व कर्जत | शिरढोण | गांगवली | गागोदे बुद्रुक | चवदार तळे | नवाबाचा राजवाड

पाले । कोल । दुर्गदुर्गेश्वर रायगड । इतिहासातील रायगड जिल्हा । ऐतिहासिक अलिबाग । चौल ।
। कोथळीगड । कुलाबा किल्ला । खांदेरी । उंदेरी । सागरगड । कांगोरी (मंगळगड) । कोर्लई ।
टगड (पेब) । भिवगड । रतनगड । माणिकगड । महेंद्रगड । ईर्शाळगड । सोनगिरी (मिरगड) । चंद्रगड
म । आक्षी । नागांव । काशिद । श्रीवर्धन । दिवेआगर । मुरूड । हरिहरेश्वर । माथेरान । सवतकडा
यिनी । पांडवकडा । भीमाची काठी । झुलता पूल । डोलवाला । शहापाडा । हेटवणे । मोर्बे व गारंबी ।
रिडले टर्टल्स । जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या । बल्लाळेश्वर मंदिर । वरदविनायक (महड) । सिद्धीविनायक
ाची परिक्रमा । श्री रामेश्वर । श्री कनकेश्वर । जीवनेश्वर । कुसुमेश्वर । दिवेआगर सुवर्णमंदिर । उत्तरेश्वर
रायण व सुंदरनारायण । बोंबल्या विठोबा । वरसोलीचा विठ्ठल । उन्हेरे । लक्ष्मीनारायण । पेशवे मंदिर ।
रगिरी महाराज मठ । वाळणकुंड । सव । उद्धर । अफनासी निकितीन स्मृतिस्तंभ । ईदगाह । हजरत
गांवची मंदिरं । हंबीररावांच्या शिलालेखाचा ठसा । चुंबकीय वेधशाळा । हिराकोट (अलिबाग कारागृह) ।
पनवेल । इर्मॅजिका । एन डी फिल्म वर्ल्ड । रायगड जिल्हाधिकारी निवासस्थान व शासकीय विश्रामगृहे
ा । खोकरी । आक्षी शिलालेख...


महाराष्ट्र शासन

# समग्र रायगड

## पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण



जिल्हाधिकारी रायगड प्रकाशन



# समग्र रायगड– पर्यटन, पर्यावरण, सक्षमीकरण


प्रकाशन :
**जिल्हाधिकारी, रायगड**

संकल्पना व मार्गदर्शन
**डॉ. महेंद्र कल्याणकर,** भा.प्र.से.
*जिल्हाधिकारी, रायगड*


निर्मिती
जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी व जिल्हा माहिती अधिकारी, रायगड यांच्या सहयोगाने,
मीडिया आर अँड डी (इं) प्रा. लि., मुंबई

खासगी वितरणार्थ

**प्रकाशनः २०२२**



जंजिरा किल्ल्यातील गोड्या पाण्याचे तळे





सत्यमेव जयते



मुख्य मंत्री
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई

**शुभसंदेश**

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांच्यावतीने जिल्ह्यातील पर्यटन, पर्यावरण संरक्षणासाठी करण्यात येणारी जिल्ह्यातील विकासकामे व स्थानिकांच्या सक्षमीकरणासंदर्भात प्रशासनाच्या स्तरावर झालेले प्रयत्न या सर्व बाबींची माहिती देणारे कॉफी टेबल बुक प्रकाशित होत आहे, ही कौतुकास्पद बाब आहे.


पर्यटनाच्या दृष्टीने रायगड अतिशय समृद्ध जिल्हा आहे. नयनरम्य निसर्ग आणि हिंदवी स्वराज्याच्या राजधानीचे ठिकाण असलेला किल्ले रायगड यासह अनेक ऐतिहासिक गड–किल्ले इथे आहेत. मुंबई आणि पुण्यासारख्या महानगरांपासून जवळ असणाऱ्या स्थानामुळे जिल्ह्याला पर्यटन अनुकूल परिस्थिती लाभली आहे हे लक्षात घेऊन पर्यटनाला चालना मिळावी यासाठी शासनातर्फे रोरोसारख्या दळणवळण व पर्यटकांच्या निवासासाठी विविध पर्यावरणस्नेही योजना पूर्ण करण्यात येत आहेत.

पर्यटनस्थळांविषयी एकत्रित व विस्तृत माहिती देणारे कॉफी टेबल बुक पर्यटकांसाठी अनेक दृष्टींनी सोईचे ठरेल. या कॉफी टेबल बुकची संकल्पना तयार करणाऱ्या व ती प्रत्यक्षात आणणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक कौतुक करीत असून अशाच प्रकारच्या नावीन्यपूर्ण उपक्रमांना तसेच कॉफी टेबल बुकच्या प्रकाशनास शुभेच्छा!

**(एकनाथ संभाजी शिंदे)**

महादरवाजा (किल्ले रायगड)





सत्यमेव जयते



उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई

**शुभसंदेश**

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, रायगड जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धन, स्थानिकांचे सक्षमीकरण व पर्यटनवृद्धीसाठी प्रशासकीय स्तरावरील प्रयत्न यांची माहिती देणारे कॉफी टेबल बुक रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे प्रकाशित होत आहे, हे समजून समाधान वाटले.


किल्ले रायगडसारख्या महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे साक्षीदार असलेले गडकिल्ले रायगड जिल्ह्याचे भूषण आहेत. यासोबतच इथे अभयारण्ये, धबधबे, गिरिस्थाने यांसारख्या नैसर्गिक सौंदर्याने परिपूर्ण असलेल्या पर्यटनस्थळांसोबतच भाविकांच्या मनात श्रद्धेचे स्थान असलेली मंदिरेही अनेक ठिकाणी दिसतात. त्यामुळे संपूर्ण देशभरातून जास्तीतजास्त पर्यटक इथे यावेत व येथील पर्यटन उद्योगाची सतत भरभराट व्हावी, स्थानिकांचे सक्षमीकरण व्हावे यादृष्टीने पर्यावरण समतोलाची जबाबदारी सांभाळून प्रयत्न व्हायला हवेत. शासन याबाबतीत प्रयत्नशील आहे हे इथल्या विकास कामांवरून लक्षात येते. परंतु त्यासोबतच पर्यटकांसाठी सहज सोप्या भाषेत रायगड जिल्ह्यातल्या पर्यटनाची महती सांगणारे साहित्य विनासायास उपलब्ध असणेही आवश्यक आहे. ही गरज जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या कॉफी टेबल बुकमधून पूर्ण होईल अशी खात्री आहे.

या कॉफी टेबल बुकच्या संकल्पनेपासून प्रकाशनापर्यंत सर्व कामांसाठी प्रयत्नशील असलेल्या सर्वांचे अभिनंदन. हे पुस्तक जास्तीतजास्त पर्यटकांच्या पसंतीस उतरून त्यांना रायगड पर्यटनाचे अधिकाधिक आकर्षण वाटावे, अशी अपेक्षा व्यक्त करतो. जिल्हाधिकारी कार्यालय अशाच नावीन्यपूर्ण उपक्रमांमधून स्थानिकांच्या उत्कर्षासाठी प्रयत्नशील राहील, असा विश्वासही या निमित्ताने व्यक्त करतो.

**(देवेंद्र फडणवीस)**

कोर्लई किल्ला







अध्यक्ष,
महाराष्ट्र विधानसभा,
विधान भवन,
मुंबई ४०००३२

**शुभसंदेश**

प्रेरणादायी इतिहासाच्या पाऊलखुणा आणि निसर्गाने मुक्तहस्ते सौंदर्याची केलेली उधळण यासाठी प्रसिद्ध असलेला जिल्हा म्हणजे रायगड. किल्ले रायगड, विस्तीर्ण सागर किनारा, डोंगर कपारी, प्राचीन लेणी, जंगल आणि थंड हवेसाठी प्रसिद्ध असलेली गिरिस्थाने असे वैविध्य आपल्याला एकाच जिल्ह्यात येथे पाहायला मिळते. त्यामुळेच रायगड जिल्हा देशभरातील पर्यटकांसाठी एक आकर्षणाचे केंद्र ठरला आहे. या संदर्भात माहिती देणारे कॉफी टेबल बुक रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे प्रकाशित होत आहे, हा निश्चितच अभिनंदनीय उपक्रम आहे.

या कॉफी टेबल बुकमुळे पर्यटकांना आकर्षित करणारी रायगड जिल्ह्यातील ठिकाणे, त्यांची छायाचित्रे, तेथील निवास व्यवस्था, प्रशासकीय आस्थापनेपासून या ठिकाणांचे अंतर, स्थानिक बाजारपेठांची वैशिष्ट्ये, खाद्यसंस्कृती अशा सर्व गोष्टींचे आकर्षक स्वरूपात सादरीकरण पर्यटकांना एका दृष्टीक्षेपात उपलब्ध होत आहे. त्यामुळे पर्यटकांची तर सोय होईलच परंतु त्याचबरोबर स्थानिकांचे सक्षमीकरण, पर्यावरण संवर्धन, रोजगारवृद्धी इत्यादी घटकांनाही चालना मिळेल, असा मला विश्वास वाटतो.

पर्यटन हा समाज आणि संस्कृती तसेच वर्तमान आणि इतिहास, व्यक्ती आणि निसर्ग यांना जोडणारा महत्वाचा दुवा आहे. ''केल्याने देशाटन, पंडित मैत्री आणि सभेत संचार'' असे म्हटले जाते. मनुष्य आणि निसर्ग यात निर्माण झालेली दरी भरून काढायची असेल तर पर्यटनासारखे दुसरे माध्यम नाही. हे आकर्षक कॉफी टेबल बुक आपल्याला निसर्गाशी संवाद साधण्यास उद्युक्त करेल, यात शंका नाही. या कॉफी टेबल बुकची निर्मिती आणि प्रकाशन यासाठी योगदान देणाऱ्या सर्वांचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो.

या कॉफी टेबल बुकचे पर्यटक, वाचक, पत्रकार, इतिहास आणि निसर्गप्रेमी अशा सर्वांकडून स्वागत होईल, ही शुभेच्छा.

**(ॲड. राहुल सुरेश नार्वेकर)**

कुलाबा किल्ला





सत्यमेव जयते



मंत्री,
महसूल, पशुसंवर्धन व
दुग्धविकास, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई

**शुभसंदेश**

रायगड जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्यातर्फे जिल्ह्यातील पर्यावरण संरक्षण, स्थानिकांचे सक्षमीकरण व पर्यटनासंबंधी माहिती देणारे कॉफी टेबल बुक प्रसिद्ध होत आहे हे समजून आनंद झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे ठिकाण असलेला किल्ले रायगड देशविदेशात प्रसिद्ध आहे. इतिहासप्रेमी या गडाला भाविकांच्या श्रद्धेने भेट देत असतात. सह्याद्रीच्या डोंगररांगांमधून कोसळणारे धबधबे, हिरवाईनं नटलेली अभयारण्ये, बौद्धकालीन लेणी, समुद्रकिनारे अशी पर्यटनस्थळांची रेलचेल रायगड जिल्ह्यात दिसून येते. अधिकाधिक पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी रायगड जिल्ह्याचे प्रशासन प्रयत्नशील असते. त्या अनुषंगाने बीच शॅक्ससारख्या नावीन्यपूर्ण योजना आखल्या जात आहेत. त्यांबाबतची माहितीही कॉफी टेबल बुकमधून प्रकाशित होत आहे, ही समाधानाची बाब आहे.

कॉफी टेबल बुकच्या निर्मितीसाठी डॉ. कल्याणकर व जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे काम करणाऱ्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. भविष्यातही अशाच प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम त्यांच्याकडून घडोत अशा सदिच्छा व्यक्त करतो.

**(राधाकृष्ण विखे पाटील)**

कर्नाळा किल्ला







सत्यमेव जयते

मंत्री,
उद्योग
महाराष्ट्र राज्य
तथा पालकमंत्री, रायगड

**शुभसंदेश**

रायगड जिल्ह्यात पर्यावरणस्नेही पर्यटन वाढीस लागावे यासाठी सातत्याने प्रयत्न होत आहेत. दिवेआगर व वर्सोली समुद्र किनाऱ्यांवर बीच शॅक्स उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. अशा प्रकारच्या योजनांमुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना कोकणातील समुद्रकिनाऱ्यांकडे आकर्षित करून पर्यटन उद्योगाच्या माध्यमातून स्थानिकांचे सक्षमीकरण करण्यासाठी शासनस्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरू आहेत. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील पर्यावरणाच्या संरक्षणासाठीही विविध उपक्रम राबवले जात आहेत. या सर्व उपक्रमांची माहिती देणारे कॉफी टेबल बुक रायगड जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्यातर्फे प्रकाशित होणे ही अतिशय आनंदाची बाब आहे.

पर्यटन हा आजच्या युगात भरभराटीचा उद्योग समजला जातो. पर्यटनामुळे सामाजिक–सांस्कृतिक देवाणघेवाण होते, स्थानिकांना रोजगार उपलब्ध होतो व पर्यटकांना त्यांच्या प्रियजनांसोबत नवीन अनुभवांचा आनंद मिळतो. आमचा रायगड हा तर निसर्गसंपन्नतेने नटलेला, ऐतिहासिक गडकिल्ल्यांचे माहेरघर असलेला, खाद्यसंस्कृतीची देणगी लाभलेला समृद्ध जिल्हा आहे. त्याच्याकडे पर्यटक आकर्षित झाले नसते तरच आश्चर्य. मुंबई–पुणे या महानगरांना जवळ असल्याने पर्यटकांसाठी रायगड जिल्हा अतिशय सोईचाही आहे. या सर्व अनुकूल बाबी लक्षात घेऊन शासनाने रायगड जिल्ह्यातील पर्यटनासाठी नित्यनूतन योजना व विकास कामांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील पर्यटकसंख्या दरवर्षी वाढत आहे.

पर्यटनासोबतच आज पर्यावरण समतोलासाठी प्रत्येकाने जागरुक असायला हवे. त्यादृष्टीने प्लास्टिकच्या पिशव्या आणि इतर वस्तूंचा कमीतकमी वापर होईल यासंबंधी तसेच पर्यटनस्थळांवर कचरा होणार नाही, निसर्गाची नासधूस होणार नाही यासाठी स्थानिक प्रशासनाने जागरुक असणे आवश्यक आहे. पर्यटनवृद्धीसाठी प्रयत्नशील असताना या गोष्टींची विशेष दखल घेतली जाईल, याविषयी मला खात्री आहे.

समग्र रायगड हे कॉफी टेबल बुक जास्तीतजास्त लोकप्रिय होऊन त्याचा उद्देश सफल होवो अशी प्रार्थना करतो व जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर व त्यांच्या कार्यालयाच्या टीमला पुढील उपक्रमांसाठी सुयश चिंतितो. धन्यवाद!

**(उदय सामंत)**

जंजिरा किल्ला





सत्यमेव जयते

**मुख्य सचिव,**
**महाराष्ट्र राज्य**
**मंत्रालय, मुंबई**



**शुभसंदेश**

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे पर्यावरण संरक्षण, स्थानिकांचे सक्षमीकरण व पर्यटनासंबंधी माहिती देणारे कॉफी टेबल बुक प्रसिद्ध होत आहे हे समजून मला आनंद झाला.

रायगड जिल्हा उत्तम पर्यटनासाठीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. जंगलांनी व्यापलेल्या डोंगरदऱ्यांपासून विस्तीर्ण सागर किनाऱ्यांपर्यंत, भाविकांच्या श्रद्धास्थानांपासून ऐतिहासिक गडांपर्यंत, प्राचीन लेण्यांपासून थंड हवेच्या गिरिस्थानांपर्यंत सर्व काही या जिल्ह्यात आहे. त्यामुळे पर्यटनासाठी इथे देशविदेशातून पर्यटकांचा सतत ओघ असणे स्वाभाविक आहे. पर्यटकांमुळे रायगड जिल्ह्यातील अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात चालना मिळते. त्यासाठी शासनस्तरावर मोठ्या प्रमाणावर विकास कामे केली जात आहेत. तसेच यासोबतच इथले स्थानिकही त्यांच्या परीने पर्यटकांसाठी राहणे व खानपानाच्या सुविधा उपलब्ध करून देत असतात. एकूणच, निसर्गाने दिलेल्या देणगीचा योग्य तो लाभ घेत रायगड जिल्ह्यातील पर्यटन उद्योग पंख पसरून भरारी घेत आहे. अशा वेळी जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे प्रकाशित होत असलेले पुस्तक जिल्ह्याचे पर्यटनमूल्य अधिक वाढवेल यात शंका नाही. या पुस्तकात जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या पर्यटनस्थळांच्या तांत्रिक माहितीसोबत तिथले स्थान महात्म्यही विस्ताराने वर्णन केले आहे.

पुस्तकाच्या निर्मितीसाठी जिल्हाधिकारी यांच्यातर्फे काम करणाऱ्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. तसेच भविष्यातही अशाच प्रकारचे नावीन्यपूर्ण उपक्रम त्यांच्याकडून घडोत अशा सदिच्छा!

**(मनु कुमार श्रीवास्तव)**

**प्रबळगड**





किहीमचा सागरकिनारा

सत्यमेव जयते

## मनोगत



एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ठाणे जिल्ह्याचं विभाजन होऊन 'कुलाबा' जिल्हा अस्तित्वात आला. मराठा साम्राज्याच्या राजधानीचं शहर कुलाबा जिल्ह्यात होतं म्हणून जिल्ह्याचं नामकरणही पुढे 'रायगड' असं करण्यात आलं. पश्चिमेला नयनरम्य किनारपट्टी आणि पूर्वेला पश्चिमघाटाची दाट हिरवाई या जिल्ह्याला लाभली आहे. इथले लोक आतिथ्यशील, कष्टाळू आहेत. मुंबई-पुण्यासारख्या महानगरांपासून अतिशय जवळ आणि रस्ते किंवा बोटीनं सहज पोहोचता येईल अशी सुविधा... या सर्व वैशिष्ट्यांमुळे रायगड जिल्ह्यामध्ये पर्यटनाचा विकास झाला नसता तरच नवल. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळानं रायगडमध्ये पर्यटनवृद्धीसाठी अनेक योजना आखल्या आहेत. जिल्हा प्रशासनानेही पर्यटकांना विविध आणि आगळ्यावेगळ्या सुविधा पुरविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. यामध्ये स्थानिकांच्या सहकार्यातून निर्माण करण्यात आलेल्या पारंपरिक निवास व भोजनाच्या सुविधांसह बीच शॅक्ससारख्या नावीन्यपूर्ण सुविधांचाही समावेश आहे. श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्र किनाऱ्यावर असे बीच शॅक्स लवकरच उभारण्यात येत आहेत. या दोन्ही किनाऱ्यांवरील प्रत्येकी एक जागा महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालय यांना बीच शॅक्स (चौपाटी कुटी) उभारण्यासाठी तात्पुरत्या वापरासाठी देण्यात आली आहे. कोविडच्या जागतिक साथीनंतर पर्यटन उद्योग पुन्हा भरारी घेत असताना बीच शॅक्ससारखे नावीन्यपूर्ण प्रयोग त्यासाठी नक्कीच साहाय्यभूत ठरतील.

पर्यटन हे आज एखाद्या मूलभूत गरजेइतके आवश्यक बनले आहे. प्रत्येक पर्यटकाच्या व्यक्तिमत्त्वावर त्याची पर्यटनस्थळाबाबतची निवड अवलंबून असते. रायगड हा असे वैविध्य खच्चून भरलेला दुर्मीळ जिल्हा म्हणावा लागेल. ऐतिहासिक किल्ले आणि लेण्यांपासून शांत समुद्रकिनाऱ्यांपर्यंत आणि भाविकांच्या श्रद्धास्थानांपासून खवय्यांची रसनातृप्ती करणाऱ्या खाद्यसंस्कृतीपर्यंत सर्व प्रकारचे वैभव या जिल्ह्याला लाभले आहे. या सर्व ठिकाणांची एकत्रित माहिती असलेला शासकीय दस्तावेज म्हणून या पुस्तकाची निर्मिती करण्यात येत आहे. पर्यटनस्थळांच्या विस्तृत माहितीसोबतच या पुस्तकातून सहल नियोजनासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शनही करण्यात आले आहे. यासाठी समुद्रकिनारे, जंगल पर्यटन, मंदिरे, किल्ले अशा आवडींनुसार निरनिराळी सर्किट्स तयार करण्यात आली आहेत व त्यांचे नकाशे पुस्तकात शेवटी प्रसिद्ध करण्यात आले आहेत. विविध प्रकारची पर्यटनस्थळे एकत्र गुंफलेली सर्किट्सही या सोबत प्रसिद्ध होत आहेत. यामुळे हे पुस्तक सर्वसमावेशक ठरून त्याद्वारे रायगड जिल्ह्यातील पर्यटनाला चालना मिळेल असा विश्वास आहे.

हे पर्यटन पर्यावरणस्नेही व स्थानिक नागरिकांचे सक्षमीकरण करणारे ठरावे यासाठी जिल्हा प्रशासन विशेष प्रयत्न करीत आहेच परंतु पर्यटकांनीही जिल्हा प्रशासनास त्यासंदर्भात सहकार्य करावे अशी विनंती आहे. यामुळे निसर्गाचे अद्भुत सौंदर्य लाभलेल्या या ऐतिहासिक रायगड जिल्ह्यातील पर्यटन सर्वांना निश्चितच रम्य आठवणी देईल आणि येणाऱ्या पिढ्यांसाठीही त्याचे वैभव टिकून राहील.

डॉ. महेंद्र कल्याणकर भा.प्र.से.
**जिल्हाधिकारी, रायगड**

# अनुक्रम


दृष्टीक्षेपात रायगड जिल्हा ..... २०

**नावीन्यपूर्ण योजना**

'बीच शॅक्स' म्हणजेच 'चौपाटी कुटी' रायगड जिल्हा पर्यटनाचं नवं पाऊल..................... २२

**लेणी**

घारापुरी (एलिफंटा)........... २४
कोंडाणे लेणी .................. २७
खडसांबळे (नेणवली)......... २८
कुडे ............................. २९
ठाणाळे (नाडसूर) ............. ३०
आंबिवली ....................... ३१
पाले ............................ ३२
कोल ........................... ३४

**गड आणि जलदुर्ग**

दुर्गदुर्गेश्वर रायगड ............. ३६
इतिहासातील रायगड जिल्हा.......................... ५४
ऐतिहासिक अलिबाग .......... ५५
पराक्रमी, कार्यक्षम नेता : कान्होजी आंग्रे................. ५८
चौल, रेवदांड्याचा इतिहास... ६४
नरवीर तानाजी मालुसरे....... ७०
द्रोणागिरी........................ ७३
कर्नाळा किल्ला.................. ७४
प्रबळगड........................ ७५
कासा (पद्मदुर्ग)............... ७६
अवचितगड .................... ७७
सांक्षी ........................... ७८
कोथळीगड..................... ७९
कुलाबा किल्ला.................. ८०
खांदेरी.......................... ८४
उंदेरी .......................... ८५
सागरगड........................ ८६
कांगोरी (मंगळगड) ........... ८७
कोर्लई .......................... ८७
रेवदंडा आगरकोट............. ८८
जंजिरा.......................... ८९
तळागड......................... ९०
घोसाळगड ..................... ९०
बिरवाडीचा किल्ला ........... ९१
लिंगाणा......................... ९१
सोनगड, बिकटगड (पेब), भिवगड, ....................... ९२
रतनगड, माणिकगड, महेंद्रगड......................... ९३
ईर्शाळगड, सोनगिरी (मिरगड), चंद्रगड (ढवळ्या), ............ ९४
पेठचा किल्ला, ढाक, सरसगड........................ ९५
सूरगड .......................... ९६

**समुद्रकिनारे**

पीरवाडी ........................ ९८
अलिबाग ....................... १००
वरसोली, थळ–किहिम........ १०२
आक्षी, नागांव.................. १०३
काशिद ........................ १०४
श्रीवर्धन......................... १०६
दिवेआगर....................... १०७
मुरूड ........................... १०९
हरिहरेश्वर ...................... ११२

**धबधबे व गिरिस्थाने**

माथेरान ........................ ११६
सवतकडा धबधबा ............ १२२
फणसाड व सिद्धेश्वर धबधबा ............. १२३
झेनिथ धबधबा................ १२५
ताम्हिणी व भिवपुरी........... १२६
मंडाळा व वरदायिनी........... १२७
पांडवकडा...................... १२८
भीमाची काठी ................. १२९
झुलता पूल .................... १३०

**धरणे**

डोलवाला ...................... १३२
शहापाडा ....................... १३३
हेटवणे, मोर्बे व गारंबी......... १३४




**बंदरे**

जीवना बंदर .................... १३६
रेवस ............................ १३७
जे.एन.पी.टी. .................. १३८
दिघी ............................ १३९
मांडवा .......................... १४०

**अभयारण्ये**

फणसाड ........................ १४२
कर्नाळा ......................... १४६
खारफुटीचे जंगल ............. १४७
ऑलिव्ह रिडले टर्टल्स ........ १४८
जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या ... १४८

**धार्मिक स्थळे**

बल्लाळेश्वर मंदिर ............... १५०
वरदविनायक (महड) .......... १५१
सिद्धीविनायक (नांदगाव) ..... १५२
श्री विक्रम विनायक ........... १५३
मुगवली स्वयंभू गणपती ....... १५४
श्री हरिहरेश्वर काळभैरव ...... १५५
हरिहरेश्वर क्षेत्राची परिक्रमा ... १५६
श्री रामेश्वर ..................... १५७
श्री कनकेश्वर .................... १५८
जीवनेश्वर ...................... १५९
कुसुमेश्वर,
दिवेआगर सुवर्णमंदिर ......... १६०
उत्तरेश्वर ....................... १६१
वीरेश्वर .......................... १६२
भुवनेश्वर ........................ १६३
शितळादेवी ..................... १६४
सोमजाई ........................ १६४
दत्तमंदिर (चौल-भोवाळे) ..... १६५
दत्तमंदिर (मुरूड) ............. १६६
रूपनारायण व सुंदरनारायण .. १६७
बोंबल्या विठोबा ................ १६८
वरसोलीचा विठ्ठल ............. १६९
उन्हेरे, लक्ष्मीनारायण ......... १७०
पेशवे मंदिर .................... १७१
धावीर महाराज ................ १७२
श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ
भैरव ............................ १७३
शिवथरघळ .................... १७४
आवास ......................... १७७
गगनगिरी आश्रम ............... १७८
शंकरगिरी महाराज मठ ........ १७९
वाळणकुंड ...................... १८०
सव ............................ १८१
उद्धर, अफनासी निकितीन
स्मृतिस्तंभ ...................... १८२
ईदगाह, हजरत अली शाह दरबार १८३
बेने इस्रायली आळी ........... १८४

**इतर**

घोणे काष्ठशिल्प संग्रहालय ... १८६
करमरकर शिल्पालय .......... १८७
उरण ............................ १८८
नागांवची मंदिरं ................ १८९
हंबीररावांच्या शिलालेखाचा ठसा १९२
चुंबकीय वेधशाळा ............. १९३
हिराकोट (अलिबाग कारागृह) ... १९४
रेवदंड्याचे नानासाहेब व
चिरनेरचा जंगल सत्याग्रह ..... १९४
गेल इंडिया लिमिटेड ........... १९५
रेवदांड्याचे नानासाहेब व
अप्पासाहेब धर्माधिकारी ..... १९६
पनवेल .......................... १९८
इमॅजिका ........................ १९९
एन डी फिल्म वर्ल्ड ............ २००
रायगड जिल्हाधिकारी निवासस्थान
व शासकीय विश्रामगृहे ........ २०१
रॅडिसन अलिबाग व कर्जत ... २०२

**ऐतिहासिक**

शिरढोण ........................ २०४
गांगवली ........................ २०५
गागोदे बुद्रुक .................... २०५
चवदार तळे .................... २०६
नवाबाचा राजवाडा ............. २०७
खोकरी .......................... २०८
आक्षी शिलालेख ............... २०९

**नकाशे** ........................ २१६




कुलाबा किल्ला (अलिबाग)



# दृष्टिक्षेपात रायगड जिल्हा

**लोकसंख्या**

**२०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या २६,३४,२००**

पुरुष १३,४४,३४५

महिला १२,८९,८५५

**साक्षरतेचे प्रमाण** (%)

**एकूण ८३.१**

पुरुष ८९.१

महिला ७६.९

**शाळा**

प्राथमिक शाळा : ३००३,
माध्यमिक शाळा : ४४७
उच्च माध्यमिक शाळा : २१४

**महाविद्यालये**

महाविद्यालये : २९,
उच्च माध्यमिक विद्यालये : २८,
अभियांत्रिकी संस्था : १९,
उच्च शिक्षण संस्था : २९,
वैद्यकीय महाविद्यालय : २

**बचतगट**

महिला बचत गट ४७२५

**तालुके व गावे (संख्या)**

पेण, सुधागड, श्रीवर्धन, म्हसळा, उरण, रोहा, तळा, पोलादपूर, खालापूर, कर्जत, पनवेल, महाड, अलिबाग, माणगांव, मुरूड हे १५ तालुके

**महसुली गावे २११३ आहेत.**

**महसूल उपविभाग ८ :** अलिबाग, पनवेल, माणगांव, महाड, पेण, कर्जत, रोहा, श्रीवर्धन

**महानगरपालिका १ :** पनवेल

**नगरपालिका १० :** अलिबाग, पेण, मुरूड, जंजिरा, उरण, कर्जत, माथेरान, खोपोली, रोहा, महाड, श्रीवर्धन.

**नगरपंचायती** : ६

**पंचायत समित्या** : १५

**ग्रामपंचायती** ८०८

दिवेआगरचा सागरकिनारा



कोलाड रिव्हर राफ्टिंग



तिबोटी खंड्या
(जिल्हा पक्षी)



रायगड जिल्ह्याचे स्थान राज्यात अनन्यसाधारण आहे. इंग्रजी अंमल सुरू होण्यापूर्वी कित्येक वर्षे रायगड हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजधानीचे केंद्र होते. महाराष्ट्राचे भाताचे कोठार आणि नैसर्गिक सौंदर्याने नटलेले स्थान म्हणूनही हा जिल्हा ओळखला जातो. या जिल्ह्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे प्रमुख केंद्र असलेला कुलाबा किल्ला होता. सरखेल कान्होजी आंग्रे यांचे प्रमुख आरमार केंद्र अलिबाग, क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके यांचे जन्मगांव शिरढोण, भारताचे माजी अर्थमंत्री कै. चिंतामणराव देशमुख यांचे रोहा तालुक्यातील नातेगांव याच जिल्ह्यात आहे.
समर्थ रामदास स्वामी यांनी दासबोध ग्रंथ जेथे बसून लिहिला ती शिवथरघळ, स्वातंत्र्य लढ्यात सत्याग्रहामध्ये बलिदान केलेल्या हुतात्म्यांची भूमी चिरनेर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सत्याग्रह केला ते महाड येथील चवदार तळे आदी ऐतिहासिक ठिकाणे या जिल्ह्यात आहेत.

## नद्या

कोकणात पावसाचे प्रमाण भरपूर असल्यामुळे पावसाळ्यात नदीच्या उगमाकडील तीव्र उताराकडून पाणी दुथडी भरून वाहते. काही नद्यांच्या मुखाकडील भाग खडकाळ असल्यामुळे या भागामध्ये नदीचा प्रवाह गढूळ व तुटक होतो. समुद्र अगदी जवळ असल्यामुळे नदीच्या प्रवाहाच्या मुखाकडील भागावर भरती ओहोटीचा परिणाम होत असतो. जिल्ह्यात उत्तरेकडील उल्हास नदी, पनवेल व कर्जतच्या दक्षिणेकडून पाताळगंगा व भोगावती तसेच पेणच्या दक्षिणेकडून अंबा नदी वाहते. जिल्ह्याच्या मध्य भागात रोह्याजवळून कुंडलिका, नैऋत्य भागातून मांदाड तर दक्षिण भागातून सावित्री व तिच्या उपनद्या वाहतात. घोड आणि काळ या महत्त्वाच्या नद्या आहेत. पनवेलमध्ये गाढी नदी आहे. कर्जत तालुक्यातील पेजच्या खोऱ्यात व खालापूर तालुक्यातील पाताळगंगेच्या खोऱ्यात सह्याद्री पर्वताचे उंच कडे आहेत. त्यामुळे भिवपुरी, खोपोली व भिरा या तीन जलविद्युत निर्मिती केंद्रांना उत्तम जागा लाभली आहे. पेण तालुक्यातील पूर्व-पश्चिम वाहणारी भोगेश्वरी नदी अंतोरा खाडीपासून पुढे नौकानयनास उपयोगी पडते. अंबा, कुंडलिका, सावित्री या नद्यांचे प्रवाह नौकानयनास उपयोगी पडतात.

## डोंगररांगा

जिल्ह्याची पूर्वेकडील सीमा सह्याद्री पर्वताच्या लहानमोठ्या रांगांनी वेढलेली असून त्याला लागून पुणे जिल्ह्याची हद्द आहे. महाड तालुक्याचा ईशान्येकडील भाग, सुधागड व पोलादपूर तालुक्याचा काही भाग सह्याद्री पर्वताच्या रांगांनी व्यापलेला आहे. जिल्ह्याच्या एकूण क्षेत्रफळापैकी बराचसा भाग डोंगर व उंचसखल पर्वतराजींनी व्यापलेला आहे.

## वनक्षेत्र

जिल्ह्यात एकूण वनक्षेत्र १,७२५.४४ चौ.किमी असून १,४६५.३४ चौ.किमी वनक्षेत्र राखीव आहे. घनदाट वनक्षेत्र ५६६.४० चौ.किमी, तुरळक वनक्षेत्र ६४४.९० चौ.किमी आहे.

## अभयारण्ये

**कर्नाळा अभयारण्य:** मुंबई–गोवा महामार्गावर पनवेलपासून १० किलोमीटरवर कर्नाळा पक्षी अभयारण्य आहे. अभयारण्याच्या दाट झाडीमधून ऐकू येणारी पक्ष्यांची किलबिल व दुर्मीळ पक्ष्यांचे दर्शन पर्यटकांना भुरळ पाडते. सव्वाशेपेक्षा जास्त प्रकारचे स्थानिक पक्षी आणि पंचवीसपेक्षा जास्त स्थलांतर करणारे पक्षी या अभयारण्यात आढळतात. पक्षीनिरीक्षक, अभ्यासक पर्यटक मोठ्या संख्येने निसर्ग भ्रमंतीसाठी येत असतात.

### फणसाड अभयारण्य:

मुरूड व रोहा तालुक्यांच्या मध्ये हे अभयारण्य आहे. ६९६९ हेक्टर जंगलक्षेत्रात हे अभयारण्य असून येथे विविध प्रकारचे प्राणी व पक्षी उदा. बिबट्या, वानर, ससे, हरीण, भेकर, रानडुक्कर, तरस, कोल्हे, अस्वल इ. आढळून येतात.

## महत्त्वाचे सण

गौरीगणपती, होळी, नवरात्र, दहीहंडी आणि शिवराज्याभिषेक सोहळा

### साखरचौथ गणेशोत्सव

साखरचौथ हा रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील गणेशमूर्तिकारांचा उत्सव. प्रतिवर्षी गणेशमूर्ती तयार करून त्या संपूर्ण जगाला पाठविण्यात ही मंडळी मग्न असतात तेव्हा स्वतःच्या घरात मंगलमूर्ती गणेशाची स्थापना करण्यासाठी साधारणतः ५ ते ६ पिढ्यांपूर्वी मूर्तिकारांच्या घरांतील बालगोपाळांनी हा उत्सव सुरू केला. गणेश चतुर्थीनंतर येणाऱ्या पुढील चतुर्थीस याची सुरुवात होते. आता साखरचौथ गणेशोत्सव हा रायगड जिल्ह्यातील एक महत्त्वाचा उत्सव झाला असून जिल्ह्यात तो मोठ्या भक्तिभावाने साजरा केला जातो. जिल्ह्यात सार्वजनिक तसेच खासगी स्वरूपात हा उत्सव साजरा केला जातो. या गणेशोत्सवात चलतचित्रे रेखाटली जातात, हे याचे एक वैशिष्ट्य आहे. यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रम, भजन, कीर्तन अशा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

## जिल्ह्याचे दुर्गवैभव

ऐतिहासिक किल्ले म्हटले, की सर्वप्रथम छत्रपती श्री शिवाजी महाराजांचे नाव आपल्या डोळ्यांसमोर येते. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकारणे या किल्ल्यांमुळेच शक्य झाले होते. दख्खनच्या पठारावर दक्षिणोत्तर पसरलेला सह्याद्री व त्याच्या उपशाखा म्हणजे किल्ल्यांसाठीची उपयुक्त ठिकाणे असल्याने सह्याद्री पर्वतामध्ये सर्वाधिक किल्ले बांधले गेले. डोंगरी किल्ल्यांबरोबरच समुद्रमार्गे येणाऱ्या शत्रूशी चार हात करण्यासाठी भर समुद्रात तसेच समुद्रकिनारीही काही दुर्ग बांधले गेले. रायगड जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करता जिल्ह्यात जवळपास पन्नासपेक्षा जास्त डोंगरी किल्ले आहेत. यापैकी बहुतेक किल्ले भक्कम व बुलंद अवस्थेत आहेत. रायगड जिल्ह्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या किल्ल्यांमुळे येथील पर्यटनाला चालना मिळाली आहे. अनेक पर्यटक येथे दुर्गभ्रमंतीसाठी भेट देत असतात.

## कृषी क्षेत्र

१,८१,१४६ हेक्टर निव्वळ कसलेले क्षेत्र आहे. लागवडीखालील एकूण क्षेत्र २,००,८९५ हेक्टर असून दुबार पिकाखाली आणलेले क्षेत्र १९,७४९ हेक्टर आहे.

जिल्ह्यात मुख्य खरीप पीक भात हे आहे. त्याचबरोबर नाचणी, वरी ही पिके हंगामात घेतली जातात. सिंचन क्षेत्रात उन्हाळ्यात काही ठिकाणी कडधान्ये व भाजीपाल्याची पिके घेतली जातात. नारळ व सुपारी यांसारख्या कठीण कवचाच्या फळांचे उत्पादन थोड्याफार प्रमाणात घेतले जाते. याशिवाय हरभरा, तूर इत्यादी कडधान्यांचे पीक घेतले जाते.

### सिंचन प्रकल्प

मोठे प्रकल्प १– काळ. याचे लाभक्षेत्र : १२,४१४ हेक्टर आहे.

मध्यम प्रकल्प ३ – अंबा, हेटवणे व सांबरकुंड. अंबा प्रकल्पाचे लाभक्षेत्र २७७ हेक्टर आहे. सांबरकुंड प्रकल्प जून २०१८ पर्यंत पूर्ण करणे प्रस्तावित आहे.

जिल्हा परिषद आणि राज्य शासन क्षेत्रात एकूण १८० लघु पाटबंधाऱ्यांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. एकूण २०,३२५ हेक्टर लाभक्षेत्र असणाऱ्या लघु पाटबंधारे योजनांमुळे ७०४० हेक्टर क्षेत्र पाण्याखाली आणले गेले आहे.

## उद्योग

सन १९१५ मध्ये स्थापन झालेला खोपोली–भिवपुरी प्रकल्प व पुढे तयार झालेला मुंबई – पुणे राष्ट्रीय महामार्ग यामुळे रायगड जिल्ह्याचा औद्योगिक विकास होत आहे. अभियांत्रिकी उद्योग, कागद गिरण्या व तत्सम अनेक उद्योग इथे आहेत. खोपोलीचा विकास उद्योगधंद्यामुळे झाला आहे; परंतु रायगडच्या अंतर्भागातील दऱ्याखोऱ्यांमध्ये शेतीव्यतिरिक्त दुसरा व्यवसाय विकसित झालेला नाही. पुणे आणि गोव्याकडून येणारे राष्ट्रीय महामार्ग पनवेल येथे येऊन मिळतात. त्यामुळे या भागाचे वेगाने औद्योगिकीकरण झाले आहे. नवी मुंबई व न्हावाशेवा येथील पंडित जवाहरलाल नेहरू बंदराच्या विकासामुळे तसेच कोकण रेल्वेमुळे या परिसरात औद्योगिकीकरणास वेग आला आहे.





शिवराज्याभिषेक सोहळा


मूर्तीकार

दळणवळणाच्या सुविधा, मुंबईचे सान्निध्य व नवी मुंबईच्या विकासामुळे पनवेलचा औद्योगिक विकास वेगाने झाला आहे. पनवेलच्या रसायनी येथे अनेक उद्योगधंदे उभे राहिले आहेत. अलिबागच्या उत्तरेला अलिबाग रेवस रस्त्यावर थळ वायशेत येथे मुंबईजवळील सागरतळांपासून मिळणाऱ्या नैसर्गिक वायूपासून रासायनिक खते बनवण्याचा प्रकल्प उभा राहिला. नागोठणे येथे बॉम्बे हाय मधून काढलेल्या अशोधित तेलापासून मिळणाऱ्या इथेन व प्रोपेन वायूंवर प्रक्रिया करून इथिलीन मिळविण्यासाठी इंडियन पेट्रोकेमिकल्सद्वारे वायुविभाजन प्रकल्प कार्यान्वित झाला आहे.




प्रातिनिधिक छायाचित्र

# रायगड जिल्हा पर्यटनाचं नवं पाऊल... बीच शॅक्स

महाराष्ट्रातील पर्यटनस्थळांचा आणि पर्यटन व्यवसायाचा विकास करण्यासाठी 'बीच शॅक्स' म्हणजेच 'चौपाटी कुटी'ची कल्पना आता प्रत्यक्षात उतरत आहे. ज्या पर्यटकांना समुद्रकिनाऱ्यावरची भटकंती किंवा तिथे राहायला आवडतं त्यांच्यासाठी बीच शॅक्स ही एक नावीन्यपूर्ण कल्पना ठरणार आहे. समुद्र किनाऱ्यावर बांधलेली छोटी छोटी लाकडी घरं किंवा एखाद्या बीच रेस्टॉरण्टच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या बीन बॅग्ज, लाकडी आराम खुर्च्या आणि मधोमध छोटंसं टेबल हेच या बीच शॅक्सचं प्रमुख वैशिष्ट्य. समुद्र किनाऱ्यावर उभारलेल्या या बीच शॅक्समध्ये काही दिवसांचा किंवा काही तासांचा निवारा घ्यायचीही सोय असते. इथे राहण्याचे दर सामान्यांना परवडणारे असतात. अर्थात त्यातही वेगवेगळे प्रकार असतात. त्यातील काही बीच शॅक्समध्ये केवळ काही वेळासाठी विश्राम करण्याची व्यवस्था असते. या शॅक्स तिथे असलेल्या हॉटेलशी संलग्न असतात. तिथे पर्यटक येऊन काही काळासाठी विसावतात. समुद्रकिनारी तिथल्या रुचकर पदार्थांचा आस्वाद घेतल्यावर पुन्हा आपल्या घरी जाण्यासाठी परततात.

काही बीच शॅक्समध्ये पर्यटकांची दोन तीन दिवस राहण्याचीही व्यवस्था होऊ शकते. या शॅक्सच्या आत आवश्यक तेवढंच सामान असतं. त्यामुळे तिथे राहणाऱ्या पर्यटकांची गैरसोय होत नाही. समुद्र किनाऱ्यावर राहण्याचा मनमुराद आनंदही यात मिळतो. तिथल्या जवळपासच्या हॉटेलांमधून त्यांच्या खाण्यापिण्याची व्यवस्थाही केलेली असते. इथं राहण्यासाठी अतिशय वाजवी दर आकारले जातात. त्यामुळे हे बीच शॅक्स पर्यटकांमध्ये लोकप्रिय होतात. भारतामध्ये गोवा राज्यामध्ये काही महत्त्वाच्या निसर्गरम्य समुद्रकिनाऱ्यांवर बीच शॅक्स आढळतात. केवळ परदेशीच नव्हे तर देशी पर्यटकांमध्येही या बीच शॅक्सना वाढती पसंती आहे.

गोव्याप्रमाणेच महाराष्ट्राच्या कोकणपट्टीलाही एक अतिशय सुंदर व रम्य असा सागर किनारा लाभला आहे. या सागर किनाऱ्याचं सौंदर्य वर्णनातीत आहे. या किनाऱ्याच्या निसर्गसौंदर्याचे वैभव पर्यटकांना आपल्या डोळ्यात अतिशय जवळून साठवता यावं यासाठी आता अलिबाग पर्यटन विकास मंडळाने यात जातीने लक्ष घालायला सुरुवात केली आहे. आणि त्यासाठी बीच शॅक्सचा पर्याय मांडला आहे.


रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्र किनाऱ्यावर असे बीच शॅक्स उभारण्यात येणार आहेत.

या बीच शॅक्सच्या उभारणीसाठी असलेल्या जागांची योग्य निवड व पाहणी करून बीच शॅक्स बांधण्यास सुरुवात होत आहे. या पार्श्वभूमीवर श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर व अलिबाग तालुक्यातील वरसोली समुद्रकिनाऱ्यावर बीच शॅक्स उभारणीसाठी शासकीय जमिनीची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार मौजे वरसोली, ता.अलिबाग, जि. रायगड येथील एक जागा आणि मौजे दिवेआगर, ता. श्रीवर्धन क्षेत्र ग्रामपंचायत दिवेआगर यांच्याकडील समुद्र किनाऱ्याजवळील एक जागा, महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन संचालनालय यांना बीच शॅक्स (चौपाटी कुटी) उभारण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात वापर करण्यासाठी मान्यता दिल्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिले.

कोरोना साथीनंतर जवळजवळ बंद पडलेल्या पर्यटन व्यवसायाला अशा नावीन्यपूर्ण प्रयोगामुळे चालना तर मिळेलच पण त्यासोबत इथल्या ग्रामस्थांना रोजंदारीही मिळेल. अलिबागचा समुद्र किनारा हा पर्यटकांमध्ये विशेष प्रसिद्ध आहेच, प्रत्येक शनिवार रविवार इथे पर्यटकांची प्रचंड वर्दळ असते. अशात त्यांना बीच शॅक्सचा पर्याय उपलब्ध झाला तर देशीविदेशीच्या पर्यटकांना आकर्षून घेण्यात अलिबाग अग्रेसर राहील.

# लेणी









रावणानुग्रह मूर्ती

# रायगड जिल्ह्यातील प्राचीन लेणी

प्राचीन भारतात सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये बौद्ध, शैव, वैष्णव, जैन या संप्रदायांच्या अनुयायांनी तसेच नाथपंथीय संप्रदायाच्या अनुयायांनी अनेक गुंफा, लेणी, विहार व चैत्यगृहे निर्माण केली. महाराष्ट्रातील डोंगरांमध्ये असणारा अग्निजन्य खडक खोदकामाकरिता उपयुक्त असल्याने भारतातील सर्वाधिक लेणी महाराष्ट्रात आहेत. विविध कालखंडांमधील धर्मसंस्था व राज्यसंस्था यांच्या उत्कर्षाच्या काळात धार्मिक व सामाजिक गरजेपोटी अनेक लेणी खोदण्यात आली. प्राचीन काळी कोकणातून देशाकडे व्यापारउदीम होत असे. त्याकाळी जिल्ह्यात जी काही प्रमुख बंदरे अथवा व्यापारी मार्ग होते, अशा मार्गांजवळ विश्रांतिस्थाने म्हणून ह्या लेण्यांची निर्मिती झाली. जिल्ह्यातील बहुतांश लेणी बौद्धकालीन असली तरी काही लेणी कलचुरीकालीन आहेत. काही लेणी हीनयान व उत्तर हीनयान काळातील आहेत, तर काही हीनयान व महायान यांच्यामधील संक्रमण काळातील आहेत. एखाददुसरी लेणी महायान काळातील आहेत. जिल्ह्यातील बऱ्याचशा लेण्यांची कालौघात पडझड झाली असली, तरी सध्या अस्तित्वात असलेल्या शिल्पांवरून तत्कालीन वैभवाची कल्पना येते.



घारापुरी लेणी

# घारापुरी (एलिफंटा)

ही लेणी मुंबई व उरण यांच्यामधील समुद्रात एका स्वतंत्र बेटावर आहेत. हे बेट मुंबई येथील गेटवे ऑफ इंडियापासून जवळपास ९ ते १० कि.मी. अंतरावर आहे. बेटावर उतरण्यासाठी बेटाच्या वायव्येस तसेच नैऋत्येस धक्के आहेत. गेटवे ऑफ इंडिया व उरण येथून घारापुरीपर्यंत लाँच/स्पीड बोटींची सोय आहे. या बेटाचा परीघ जवळपास ७ कि.मी. असून येथील डोंगराची उंची १५३.५ मीटर आहे. इ. स. ४ ते ९ या शतकादरम्यान ही शैव लेणी खोदलेली असावीत, असे अभ्यासकांचे मत आहे. युनेस्कोच्या वर्ल्ड हेरिटेज कमिटीने ह्या लेण्यांचा जागतिक वारसास्थळांमध्ये समावेश केला आहे. मोरा बंदर, राजबंदर (घारापुरी) व शेट बंदर अशी तीन चिमुकली खेडी या बेटांवर आहेत. घारापुरीला सापडलेल्या वस्तू, नाणी व खापरांचे अवशेष यावरून येथे भरभराटीस आलेले प्राचीन बंदर असावे असे म्हणता येईल. सातवाहन काळात याच बंदराशी रोमन, ग्रीक व अरबी व्यापारी यांचा संपर्क असे. सम्राट समुद्रगुप्त व त्यांचा नातू कुमारगुप्त यांच्या कारकिर्दीतली नाणीही इथे सापडली आहेत. ऐहोळे (जिल्हा विजापूर, कर्नाटक) येथील शिलालेखात घारापुरीचा उल्लेख 'पश्चिम सागराची लेणी' असा आढळतो.

सन १५३४ ते १६०३ या दरम्यान पोर्तुगीज वास्तव्याने या लेण्यांमधील उत्तमोत्तम शिल्पांचा ऱ्हास झाला. या पाषाणात कोरलेल्या ज्या प्रचंड हत्तीमुळे पोर्तुगिजांनी 'एलिफन्टा केव्हज' असे नाव दिले ती हत्तीची मूर्ती मुंबई येथील जिजामाता उद्यानात ठेवली आहे.

घारापुरीचे आज दिसणारे अवशेष प्राचीन संस्कृतीची प्रचिती देतात. या ठिकाणी इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंत धार्मिक लोकांची आणि गावकऱ्यांची वर्दळ असे. बेटावरील बौद्ध वास्तू आणि पाण्याच्या कोरीव टाक्यांवरून तशी कल्पना करता येते. काही देवळांचे अवशेष, नाहीशा झालेल्या इमारतींची विटांची जोती यावरूनही समृद्ध जीवन लक्षात येते. कलारसिक आणि पर्यटकांच्या दृष्टीने येथील लेणी, विशेषतः मुख्य लेणी, पाहणे हा एक वेगळा अनुभव ठरतो. संशोधकांच्या दृष्टीनेही घारापुरी लेणी अत्यंत महत्त्वाची आहेत. येथील लकुलीश (योगीश्वर शिव), रावणानुग्रह मूर्ती, शिवपार्वती अक्षक्रीडा, अर्धनारीश्वर शिव, सदाशिव, गंगावतरण, कल्याण सुंदर मूर्ती, अंधकासुर वधमूर्ती, नटराज शिव या मूर्ती प्रसिद्ध आहेत.

घारापुरी येथे ७ शिल्पगुहा आहेत. येथील आकर्षण म्हणजे ६ मीटर उंचीचे त्रिमूर्ती शिल्प. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने ही मूर्ती आपले बोधचिन्ह म्हणून स्वीकारली आहे.



महेश मूर्ती



# कोंडाणे लेणी

कर्जत तालुक्याजवळ राजमाची किल्ल्याच्या डोंगरावर हा सोळा बौद्धकालीन लेण्यांचा समूह आहे. ही लेणी इ. स. पूर्व पहिल्या शतकातील असून त्यावरून त्या काळी तेथे राहत असलेल्या बौद्धकालीन भिक्षूंच्या राहणीमानाविषयी माहिती मिळते. मोठमोठ्या शिल्पांशिवाय येथे विविध विहार, चैत्य व स्तूपही कोरलेले आढळतात. महाराष्ट्रामध्ये असलेल्या पाषाणातून कोरलेल्या मोजक्या बौद्ध लेण्यांमध्ये कोंडाणे लेण्यांचा समावेश होत असल्यामुळे येथे कला व इतिहास अभ्यासकांची वर्दळ असते.

पावसाळ्यामध्ये येथून अनेक धबधब्यांचा उगम होतो. त्यावेळचे निसर्गदृश्य अलौकिक असते.

कोंडाणे शिल्पाचे वैशिष्ट्य असे, की चैत्य गुंफेच्या बाजूला असलेला यक्ष कोरणाऱ्या कान्हा याचा शिष्य बलुक या कलावंताचा यात स्पष्ट उल्लेख आहे. शिल्पी म्हणून कान्हा याचा उल्लेख पितळखोऱ्याच्या रांगांवरील शिलालेखातही आहे. स्वतः निर्माण केलेल्या शिल्पावरील स्वतःचा नामोल्लेख कोरून ठेवण्याचा हा प्रकार दुर्मीळ आहे. याच्या आधारे असे अनुमान काढता येते, की एकाच शिल्पी संघातील किंवा घराण्यातील कलाकार दूरवर कार्यरत होते.






# खडसांबळे (नेणवली)

(तालुका सुधागड) पालीच्या पूर्वेस खडसांबळे गावाच्या डोंगरात दोन लेणीसमूह आहेत.

पूर्वेकडील समूहात एकूण २१ लेणी आहेत. स्थानिक लोक त्यांना पांडवलेणी म्हणतात. हे लेणीसमूह चौल बंदराहून नागोठणे खाडीमार्गे बोर घाटातून मावळात जाणाऱ्या प्राचीन मार्गावर आहेत. दुसरा लेणीसमूह पहिल्या समूहाच्या पश्चिमेस असून त्यांना चांभारलेणी म्हटले जाते. डोंगराचे कडे तुटल्यामुळे तेथे जाण्यास वाट नाही. या लेण्यांमध्ये कोठेही स्तंभ नाही.









# कुडे लेणी

(तालुका माणगांव) कुडे, मांदाड ही बौद्धकालीन लेणी खाजणी भालगांव पुलामार्गे मुरुड शहरापासून दक्षिणेस २५ कि.मी. अंतरावर आहेत. मुंबई–गोवा हायवेवरील माणगांवपासून २१ कि.मी. वर असलेली ही लेणी पाहण्यास स्वतःचे वाहन असेल तर थेटपर्यंत जाता येते.

इ.स. पूर्व १०० वर्षांच्या काळात दंडा राजपुरी येथे सातवाहनांचे सामंत महाभोज यांची राजधानी होती. त्यांनी बौद्ध भिक्षुकांच्या वास्तव्यासाठी खोदलेली ही लेणी समुद्रसपाटीपासून २०० फूट उंच असून, एका डोंगररांगेत आहेत. इ.स. १८४८ साली डोंगराच्या कपारीतील या लेण्यांचा शोध लागला. रौद्र कातळातील ही २६ लेणी दोन स्तरांमध्ये असून, लेणी क्र. १ ते १५ खालच्या रांगेत व लेणी क्र. १६ ते २६ वरच्या रांगेत आहेत. यात ५ चैत्य व २१ विहार असून, ब्राह्मी लिपीतील शिलालेख आहेत. आत एक भव्य स्तूप आहे. लेण्यांच्या सुरुवातीला असलेले खांबदेखील खूप देखणे असून, तेथील पाण्याचे टाकेही पाहण्यासारखे आहे.

हा सगळा परिसर पश्चिमाभिमुख असून, येथून समोर अथांग अरबी समुद्र, पूर्वेस तळा, उत्तरेस घोसाळा किल्ला दिसतो. एकसंघ दगडी डोंगर कोरून निर्माण झालेली लेणी पाहताना पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावर आश्चर्यमिश्रित भाव सहज उमटतात.

समोर विस्तीर्ण राजपुरी खाडी, पलिकडे तसेच महोवा टेकडीच्या दोन्ही अंगास सुमारे १०० ते ३०० मी उंच डोंगरांमुळे ती खाडी पर्वतातील मोठ्या तलावासारखी भासते. या टेकडीवरून पूर्वेस तळा व उत्तरेस घोसाळा हे किल्ले दिसतात.



# ठाणाळे (नाडसूर)

(तालुका सुधागड) पालीच्या पूर्वेस १३ कि.मी. अंतरावर असलेल्या ठाणाळे गावाजवळच्या डोंगरात हा २३ बौद्ध लेण्यांचा समूह आहे. या लेणीसमूहात एक चैत्यगृह, एक स्मारक स्तूप समूह व उर्वरित २१ विहार लेणी आहेत. बहुतांश लेण्यांच्या दगडात तांबड्या मुरमाचा थर आहे. लेणी क्रमांक ३, ७, ८, १३ व १५ पाहण्यासारखी आहेत. बहुतांश विहार 'दीर्घिका व एक किंवा दोन खोल्या' या प्रवर्गातील असून त्यात शयनासाठी ओटे आहेत. ही पश्चिमाभिमुख लेणी दक्षिणोत्तर पसरलेली आहेत.

या लेण्यांच्या निर्मितीचा काळ हा इ.स. पूर्व ५० ते ७० वर्षांपासून तिसऱ्या शतकाअखेरचा असावा असे मानले जाते. ही लेणी द्विगर्भ किंवा तिगर्भ म्हणजे दोन किंवा तीन भिक्षुकांची निवास व्यवस्था होऊ शकेल अशी आहेत. ही लेणी भाजे लेण्यांपेक्षा जुनी असावीत. पाचव्या शतकानंतर चौल बंदराचे महत्त्व कमी होऊन मावळात जाण्याचा मार्ग बदलल्यामुळे हा बौद्धविहारसमूह विस्मृतीत गेला असावा, असे जाणकार म्हणतात.







# आंबिवली

कर्जतपासून सुमारे २६ कि.मी. वर जांबरुंगजवळ कोथळीगडाच्या उत्तरेस पायथ्याशी आंबिवलीचे बौद्ध लेणे आहे. प्राचीन काळी ठाणे व कल्याण बंदरातून निघून कुसूर घाटावरच्या पठारावरील गावांना जोडणाऱ्या व्यापारी मार्गावर हे ठिकाण असून येथून उल्हास नदीचे सुंदर खोरे दिसते. नदीकाठच्या उतरत्या खडकांवरून अवघड वाटेने लेण्यांकडे जाता येते.

हे लेणे बहुविध विहार प्रवर्गातील असून खोल्या सभागृह व दीर्घिका वर्गातील आहेत. सभागृह आयताकृती असून त्याच्या तीन बाजूंस प्रत्येकी चार अशा बारा निवासी खोल्या व समोरच्या बाजूस दीर्घिका आहेत. या खोल्यांमध्ये इतर विहारांप्रमाणे शय्येसाठी ओटे नाहीत. मध्यस्तंभ अष्टकोनी असून वर कुंभाकृती स्तंभशीर्ष आहेत. स्तंभावरच्या भागांवर प्राकृत भाषेत शिलालेख आहेत. आंबिवली लेणे हीनयान व महायान दरम्यानच्या काळात निर्माण झाले असून वास्तुशिल्पीय संक्रमणाचे पुरावे त्यातून मिळतात, असा उल्लेख गॅझेटियरमध्ये आढळतो.





## पाले लेणी

ही लेणी महाड शहराच्या वायव्येस ३ कि.मी. अंतरावरील पाले गावाच्या जवळील टेकडीत आहेत. या लेणीसमूहात एकूण २८ लेणी असून ती दक्षिणेकडून उत्तरेकडे क्रमांकित आहेत. ही सर्व लेणी पूर्वाभिमुख असून या लेण्यांना गांधारपाले लेणी असेही म्हणतात.

सावित्री आणि गांधारीच्या संगमापासून जवळ असलेले हे ठिकाण पावसाळ्यात अतिशय रम्य दिसते. पालेचा उल्लेख चौदावा शिलाहार राजा अनंत देव (इ.स. १०९४) याच्या ताम्रपटात वलीपवन किंवा पालीपट्टन असा आलेला आढळतो. ही लेणी चढण्यास कठीण असून एलिफंटा व साष्टीप्रमाणे विहार व प्रार्थना मंदिरे असलेल्या खोल्या आहेत. लेण्यांच्या वरच्या थरात लेणी क्र. १ ते २० आणि दुसऱ्या खालच्या थरात २१ ते २८ क्रमांकाची लेणी आहेत.







# कोल

महाडच्या आग्नेयेस ३ कि.मी. अंतरावर असलेले हे खेडे बौद्ध लेण्यांसाठी प्रसिद्ध असून सावित्री नदीकाठी महाड-भोर मार्गावर आहे. सावित्री नदीपलिकडील टेकडीत ही लेणी दोन समूहात विभागली गेली आहेत. पहिल्या समूहात एका घळीच्या काठी पाच पश्चिमाभिमुख लेणी आहेत. लेणी क्र. ६ व ७ दुसऱ्या समूहात मोडतात. पडझड झाल्यामुळे ही लेणी नैसर्गिक गुहांसारखी भासतात. लेणे ३, ४ व ५ मधील शिलालेखांच्या पुरालिपीवरून या लेण्यांचा काळ इ. स. दुसऱ्या शतकाचा पूर्वार्ध असा निश्चित करता येतो.

या दोन्ही समूहांशिवाय ईशान्येस काही खोल्या व टाकी असलेला एक तिसरा समूहदेखील आहे.

# गड व जलदुर्ग

# दुर्गदुर्गेश्वर रायगड





किल्ले रायगड
विहंगम दृष्य






रायगडाच्या मुख्य
दरवाजाभोवतालची
तटबंदी

**(तालुका महाड)** हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेला हा किल्ला शिवरायांनी जिंकून घेण्यापूर्वी रायरी या नावाने ओळखला जाई. चंद्रराव मोऱ्यांचा हा किल्ला जावळीच्या पाडावानंतर १६५६ साली शिवरायांच्या ताब्यात आला. शिवरायांनी १६६२ मध्ये त्याचे नाव बदलून रायगड असे ठेवले. हा किल्ला महाडच्या उत्तरेस २४ किमी अंतरावर समुद्रसपाटीपासून ८७० मीटर उंचीवर आहे. सभोवताली तुटलेल्या डोंगरांच्या कडांमुळे तो सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून विभक्त झाला आहे.

रायरी ताब्यात आल्याने शिवाजी महाराजांना कोकण भागात राज्यविस्तार करणे शक्य झाले. गडाची नैसर्गिक अभेद्य रचना पाहून राजांनी तेथे



राजदरबाराचे प्रवेशद्वार

राजधानी वसविण्याचे निश्चित केले. रायगडावर राजधानीसाठी आवश्यक मोठी जागा असून सागरी दळणवळण, कोकण प्रदेशावर नियंत्रण तसेच दक्षिणेत जाण्यासाठी हा किल्ला सोयीचा होता. या किल्ल्यावर ६ जून १६७४ रोजी पहाटे छत्रपती शिवाजीराजे सिंहासनारूढ झाले व याच किल्ल्यावर ३ एप्रिल १६८० रोजी निधन पावले. रायगडावर शिवरायांची समाधी आहे. एकेकाळी राजवैभव पाहिलेल्या या किल्ल्यावरील वैभवाची कल्पना किल्ला पाहताना नक्कीच येते. रायगड किल्ला चढण्यासाठी कठीण असला, तरी पर्यटकांसाठी व शिवप्रेमींसाठी गडावर जाण्यासाठी 'रोप वे'ची सोय उपलब्ध आहे.

महाराष्ट्र शासनाने रायगड किल्ला जतन व संवर्धनाचे काम पुरातत्त्व विभागाच्या सहयोगाने हाती घेतले असून हे काम सध्या प्रगतिपथावर आहे.

### रायगडावरील महत्त्वाची ठिकाणे :

**खूबलढा बुरुज**
पाचाडहून पुढे गेल्यावर रायगडावर जाणाऱ्या डोंगररांगेच्या वायव्य कोपऱ्यावर हा बुरूज आहे. पेशवे दप्तरात या बुरुजासंबंधी अनेक उल्लेख आढळतात.

**नाना दरवाजा**
खूबलढा बुरुजापासून १ किमी. अंतरावर या दरवाजाचे अवशेष

रायगडावरील राजदरबार





▲ नाना दरवाजा

▼खूबलढा बुरूज



▼गडमाथा



आढळतात. किल्ल्यास दोन दरवाजे आहेत असा उल्लेख हेन्री ऑक्झेंडनने १६७४ साली केला होता. त्याने या दरवाजाचा उल्लेख नहाना (लहान) असा केला. त्याचाच अपभ्रंश नाना असा झाला असावा. दरवाज्याच्या दोन्ही बाजूस खंदकात पहारेकऱ्यांसाठी खोदलेल्या खोल्या आहेत.

**महादरवाजा**
अत्यंत कठीण चढण असलेल्या ३२ पायऱ्या चढून गेल्यावर हा दरवाजा व त्याच्या लगतचे सुमारे २० मीटर उंचीचे दोन बुरूज पाहायला मिळतात. दोन्ही बुरुजांवर तोफा व गोळीबारासाठी छिद्रे आहेत. अगदी जवळ गेल्याखेरीज महादरवाजाचे दर्शन होत नसल्यामुळे शत्रूला दरवाजावर तोफा टाकता येत नसत. म्हणून रायगड जिंकणे अशक्य होते. गडाची वाट चढून येणाऱ्या शत्रूवर अचूक मारा करण्यासाठी मात्र बुरुजांमध्ये अनेक जागा आहेत.

**गडमाथा**
रायगडास तीन टोके असून नैऋत्येस हिरकणी, वायव्येस टकमक, व ईशान्येस भवानी टोक आहे. दक्षिणेस श्रीगोंडे नावाचे लहानसे टोक आहे. डोंगराच्या पश्चिम, दक्षिण व पूर्व बाजूचे कडे उभट असल्यामुळे नैसर्गिक संरक्षक तटबंदी बनलेली आहे, तर वायव्य बाजू दुपदरी भिंतीने संरक्षित केलेली आहे.

**मदारशहाची कबर**
पठारावरून बालेकिल्ल्याला जाताना मदारशहाची कबर लागते. या मदारशहाने महाराजांच्या आग्रा भेटीसमयी महाराजांचे प्राण वाचवले होते. या कबरीजवळ उजवीकडे प्रचंड आकाराचा हत्ती तलाव आहे.





भवानी टोक


टकमक टोक





◀ गडावरील मनोरे

## गंगासागर

हत्ती तलावापासून १०० मीटर अंतरावर खडकात खोदलेला आणि सदैव विपुल पाण्याचा पुरवठा करणारा गंगासागर तलाव आहे. या तलावाच्या खोदकामामुळे बालेकिल्ल्यास खंदकाच्या स्वरूपात चांगले संरक्षण मिळाले व त्यातून मिळालेले दगड इमारती बांधण्यासाठी वापरले गेले आहेत.

## मनोरे

गंगासागर तलावाच्या दक्षिणेस १०० मी. सार्सेनिक स्थापत्यशैलीचे दोन भव्य मनोरे आढळतात. हे मनोरे मुळात पाच मजली होते. मनोऱ्यांचा पाया बाराकोनी असून प्रत्येक बाजूस खिडक्या आहेत. बाहेरील अंगास नक्षीकाम आहे. मनोऱ्यांच्या पाचव्या मजल्यावर पाण्याची टाकी असावीत. मनोऱ्याच्या मध्यभागी कारंजे आहे. मनोऱ्यात प्रत्येक दोन बाजूंच्या जोडावर एकेक कोनाडा आहे. त्यात पूर्वी दिवे ठेवत असावेत.

बालेकिल्ल्यात पालखी दरवाजा, मेणा दरवाजा, राणीवसा, राजभवन, रत्नशाळा, सदर आणि फड, सिंहासन, नगारखाना या वास्तू आहेत.

**बाजारपेठेचा परिसर : हे नमुनेदार दुकानांचे चौथरे रस्त्याच्या प्रत्येक बाजूस २२ असे एकूण ४४ आहेत. दुकानांच्या जोत्यांची उंची घोडेस्वारांना त्यांच्या घोड्यावर बसूनच खरेदी करता येईल एवढी आहे. या बाजारपेठेत कापड, जडजवाहिर, शस्त्रे, घोड्यांचे साजसामान इ. अनेक वस्तूंचा व्यापार होत असावा.** ▼






राजदरबार, बाजारपेठ, गंगासागर व त्यासमोरील मनोरे, मदारशहाची कबर, हत्ती तलाव, दरबारापर्यंत जाणाऱ्या कठीण चढणीच्या पायऱ्या यांचे विहंगम दृष्य







**रायगडावरील महाराजांची समाधी** : जगदीश्वर मंदिराच्या पूर्वेस शिवरायांची समाधी आहे. महाराजांचे निधन झाल्यावर त्यांचे अंत्यसंस्कार जगदीश्वर मंदिराजवळ झाले. ९१ कलमी बखरीमध्ये म्हटले आहे, 'श्री महादेवाच्या देवळापुढे महाराजांच्या कलेवरास अग्नी दिला.' ज्या ठिकाणी अंत्यसंस्कार झाले त्या ठिकाणी एक चिरेबंदी अष्टकोनी चौथरा बांधण्यात आला. परंतु त्यावर छत्री मात्र बांधण्यात आली नाही. गडावर येणाऱ्यांसाठी एक धर्मशाळाही बांधण्यात आली. सन १९२६ मध्ये महाराजांच्या समाधीच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाले. मूळच्या अष्टकोनी चौथऱ्यावर तशाच आकाराचा लहान चौथरा बांधला. या लहान चौथऱ्यावर मध्यभागी अष्टकोनी छत्री उभारण्यात आली. छत्रीवरील घुमट डौलदार असून त्यावर कळस आहे. शिवछत्रपतींचा अष्टधातूचा अर्धाकृती पुतळा चौथऱ्यावर बसवलेला आहे.



## राजमाता जिजाऊ माँसाहेब यांची समाधी

**(तालुका रायगड)** खरे तर रायगडचा पहिला टप्पा पाचाडपासून सुरू होतो. पाचाडहून रायगडचे विशाल व भव्य दर्शन घडते. येथे राजमाता जिजाबाईंना साजेसा वाडा महाराजांनी बांधून घेतला होता. जाता-येता महाराज मातोश्रींचे येथे दर्शन घेत. राज्याभिषेक सोहळ्यानंतर बारा दिवसांनी राजमातांचे दुःखद निधन येथेच झाले. जवळच राजमाता जिजाऊंचे स्मारक असून १९४३ मध्ये फलटणचे राजे मालोजीराव नाईक निंबाळकरांनी स्मारकाच्या जीर्णोद्धाराचे काम हाती घेऊन मूळ स्मारकाची प्रतिकृती उभारण्याचा प्रयत्न केला. सध्या भारत सरकारच्या पुरातत्त्व विभागाने हे स्मारकशिल्प संरक्षित केले आहे. या वाड्यास अतिभक्कम तटबंदी होती. तटाची भिंत अदमासे २ मीटर जाड व ३-४ मीटर उंच असावी असे अवशेषांवरून दिसते. तटबंदीस गोळीबारासाठी जंगी होत्या. महालात दिवाणखाना, शयनगृहे, देवघर व नोकरांच्या खोल्या होत्या. वाड्याच्या परिसरात दोन विहिरी आहेत. पर्शियन इतिहासकार खाफीखान याच्या वर्णनावरून त्यातील एक विहीर सार्वजनिक उपयोगासाठी खुली होती. पायऱ्यांवर दगडी बांधकामाचे छत्र आहे. त्यावर एक दगडी आसन कोरलेले असून त्यावर बसून शिवाजी महाराज मुलांना त्या त्या हंगामातील फळे वाटत असत, दानधर्म करत असत, असे खाफीखान नमूद करतो. पाचाडचा कोट व राजमातेचे वृंदावन हे शिवप्रेमींचे श्रद्धास्थान आहे. पाचाडपासून अडीच कि.मी. अंतरावर वाडी असून गडाची खरी चढण वाडीनंतर सुरू होते. जवळच धान्याच्या कोठारांचे अवशेष आहेत.





दरवर्षी शिवराज्याभिषेक दिनी रायगडाच्या पायथ्याशी रायगड महोत्सव साजरा केला जातो.












गडावर जाण्यासाठी रोप-वे





# इतिहासातील रायगड जिल्हा

रायगड जिल्ह्याला अडीच हजार वर्षांचा इतिहास आहे. उत्तर कोकणात असलेल्या या प्रदेशाला प्राचीन काळी अपरान्त हे नाव होते, चौल, महाड, घोडेगांव (गोरेगांव), राजपुरी आणि घारापुरी ही त्यावेळची प्रसिद्ध नगरे होती. मौर्य, सातवाहन, क्षत्रप, त्रैकुटक, कलचुरी, कोंकणमौर्य, चालुक्य, शिलाहार, यादव, बहामनी, गुजरातचे सुलतान, निजामशहा, पोर्तुगीज, सिद्दी, मराठे, मुघल, इंग्रज इत्यादी राजवटी येथे नांदल्या. या राजवटींच्या खुणा रायगडमध्ये जागोजागी पाहावयास मिळतात. बौद्ध व हिंदू लेणी, डोंगरी किल्ले, भुईकोट व जलदुर्ग हे इतिहासाचे साक्षीदार गतवैभवात चढउतार कसकसे होत गेले ते कथन करण्यास उत्सुक आहेत. पर्यटक म्हणून आपण ते सजगपणे समजून घेतले पाहिजे.





शिवकाळात अली नावाच्या धनवान मुसलमान व्यक्तिने नारळीपोफळीच्या बागा जोपासल्या होत्या. अलीच्या बागांमध्ये वसलेले शहर म्हणून यास 'अलिबाग' असे नाव पडले.

# ऐतिहासिक अलिबाग

रायगड जिल्ह्यातील (भूतपूर्व कुलाबा) अलिबाग हे ऐतिहासिक गाव साखर खाडीच्या मुखापाशी असून सागरी मार्गाने मुंबईच्या दक्षिणेस १९ कि.मी. अंतरावर आहे. पश्चिमेस नारळीपोफळीच्या बागा आहेत. शिवकाळात अली नावाच्या धनवान व्यक्तिने या बागा जोपासल्या होत्या. अलीच्या बागांमध्ये वसलेले शहर म्हणून यास 'अलिबाग' असे नाव पडले. समुद्राकडून अलिबागला येतानाचा देखावा अत्यंत रमणीय आहे. कुलाबा जलदुर्ग, तेथील वनश्री, मंदिरे आणि त्यापाठीमागे नारळी–पोफळीच्या लांबवर पसरलेल्या राया डोळ्याचे पारणे फेडतात. दूरवर नजर टाकल्यास रामधरण टेकडी व सागरगड दिसतात. रामधरण टेकडीच्या उजव्या बाजूस सुप्रसिद्ध कनकेश्वराची टेकडी तर सागरगडाच्या उजव्या बाजूस वनश्रीने नटलेले बेलोशीचे डोंगर नजरेस पडतात. अलिबाग शहराच्या आग्नेयेस नागांव, रेवदंड्याच्या पलीकडे बौद्ध लेणी व दत्तात्रेयाचे मंदिर असलेली चौलची टेकडी दिसते. कुलाबा किल्ल्यापासून




***मराठा व ब्रिटिश आरमारांमधील लढाई***
*चित्रकार : थॉमस बटर्सवर्थ*
*स्रोत : नॅशनल मेरिटाइम म्युझियम, ग्रीनविच*



३०५ कि. मी. अंतरावर समुद्रातील खडकावर दीपस्तंभ आहे. समुद्रकिनाऱ्यावर वसलेले असूनही अलिबागची हवा सुखद आहे. अलीच्या बागांमध्ये सुमारे साडेतीनशे वर्षापूर्वी बांधलेल्या अनेक विहिरींपैकी १०–१२ विहिरी अजूनही आहेत. ब्राह्मण आळीतील गणपती मंदिरासमोरील विहीर आणि अलीच्या दर्ग्याजवळील विहीर या त्यापैकीच.

इ. स. १६९८ मध्ये कान्होजी आंग्रे आरमाराचे प्रमुख झाल्यावर त्यांनी सतराव्या शतकाच्या अखेरीस अलिबाग शहर नव्याने उभारले. ह्याआधी जुने गांव हिराकोटच्या उत्तरेस रामनाथ येथे होते. या भागातच आंग्रेंचा राजवाडा होता. येथे आंग्रेंची कुलदेवता कुलंबिका देवीचे मंदिरही आहे. इ.स. १७७१ मध्ये राघोजी आंग्रे कुलाबा किल्ल्यात राहत होते. परंतु त्यांचा राजवाडा, खजिना, पागा इत्यादी अलिबागला होत्या. कुलाबा संस्थान ब्रिटिशांनी खालसा केल्यावर १८३९ मध्ये तेथे ब्रिटिश एजंटचा कारभार सुरू झाला. अलिबागला १८४० मध्ये कुलाबा एजन्सीचे मुख्यालय झाल्यानंतर १८५० मध्ये अलिबाग हे तालुक्याचे मुख्य ठिकाण बनले. सन १८६९ साली वेगळा कुलाबा जिल्हा निर्माण झाला व अलिबाग हे जिल्हा मुख्यालय झाले.







कान्होजी आंग्रे
यांच्या अखत्यारीतील पश्चिम
किनारपट्टीचा प्रदेश

# पराक्रमी, धैर्यवान, कार्यक्षम नेता : कान्होजी आंग्रे

सागरपुत्र सरखेल कान्होजी आंग्रे यांचे मूळ घराणे संकपाळांचे. पुणे जिल्ह्यातील चाकण सुपे येथील काळोखे गावात आंगरवाडी आहे. हेच आंगऱ्यांचे मूळ स्थान. त्यांचे वडील तुकडोजी सखोजी आंग्रे हे इ.स. १६४० मध्ये शहाजी राजे यांच्या पदरी चाकरीस असता चौलच्या समुद्रावरील लढाईत त्यांनी पराक्रम गाजविला आणि त्यांना २५ सैनिकांची मुखत्यारी मिळाली. तेथपासून इ.स. १६५९ मध्ये शिवाजी महाराजांच्या पदरी आपल्या कर्तबगारीने सरनौबत हुद्द्यापर्यंत तुकडोजीने प्रगती केली. १६ व्या शतकात शिवाजी महाराजांनी विजापूरकरांकडून सुवर्णदुर्ग जिंकून घेतला. हा किल्ला हर्णे बंदराजवळ असून तुकडोजी आंग्रे यांचे कुटुंब तेथे राहत होते. तुकडोजींची पत्नी बिंबाबाई हिने आपले दैवत कान्होबास नवस बोलल्याने त्यांच्या मुलाचे नाव कान्होजी ठेवण्यात आले.

शिवाजी महाराजांनी सह्याद्रीबरोबरच सागराशीही सलगी केली आणि शिव, सह्याद्री, सागर या तिघांच्या साहाय्याने रायगडावर हिंदवी स्वराज्य स्थापन झाले. शिवरायांच्या आणि संभाजीराजांच्या पश्चात स्वराज्यावर मळभ दाटून आले होते. औरंगजेबाने अमानुषपणे केलेल्या छत्रपती संभाजीराजांच्या

छत्रपती राजाराम महाराजांची पत्नी ताराबाई हिने कान्होजींना 'सरखेल' किताब देऊन गौरविले. पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत आंगऱ्यांनी मराठ्यांचे सागरी सामर्थ्य वाढविले व मुघलांचे वर्चस्व जवळजवळ निष्प्रभ केले. उरलेल्या लहान सत्तांनीही कान्होजींचे वर्चस्व मान्य केले व त्यांच्या अधिकारात राहिले.


क्रूर हत्येने मराठी मुलुख पेटून उठला होता. याच धामधुमीत कान्होजींचा उदय झाला. शिवरायांनी उभारलेल्या आरमाराचे सुकाणू त्यांच्या हातात आले. त्या जोरावर सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज आदी परकीय सत्तांना नमवून त्यांनी स्वराज्याची पताका उत्तुंग शिखरावर नेऊन ठेवली. शिवाजी महाराजांच्या राज्यारोहणाआधी ऑगस्ट १६६९ मध्ये जन्मलेले कान्होजी सागराशी खेळतच लहानाचे मोठे झाले. कान्होजी उंच, धिप्पाड, अंगी गरुडाची वेगवान झेप आणि ससाण्याची तीक्ष्ण नजर असलेले होते. सागरावरील त्यांचा संचार शत्रूची त्रेधातिरपीट उडवत असे. आंग्रे घराण्याच्या उदयाआधी शंभर वर्षे भारताच्या किनाऱ्यावर बिनविरोध संचार करणाऱ्या पोर्तुगीज, इंग्रज, डच, सिद्दी अशा सागरावरील शत्रूच्या आरमाराला एकाच वेळी तीव्र विरोध करून नामोहरम करणारा त्यांच्यासारखा सेनानी भारतीय आरमारात झाला नाही, ही भारतीय आरमाराच्या इतिहासातली मोठ्या गौरवाची बाब आहे.

अत्यंत पराक्रमी, धैर्यवान, कार्यक्षम नेता म्हणून कान्होजींनी आपली योग्यता दाखविली. परकीय देशांची गलबते, त्रावणकोर ते मुंबईपर्यंतची सर्व गावे, शहरे त्यांनी जिंकली. अलिबागजवळील कुलाबा किल्ला हे त्यांनी आपले प्रमुख केंद्र बनवले आणि सुवर्णदुर्ग तसेच रत्नागिरीजवळील विजयदुर्ग येथे आपला आरमारी तळ उभारला. छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी ताराबाई यांनी कान्होजींना 'सरखेल' किताब देऊन गौरविले. पन्नास वर्षांच्या कारकिर्दीत आंगऱ्यांनी मराठ्यांचे सागरी सामर्थ्य खूप वाढविले आणि मुघलांचे वर्चस्व जवळजवळ निष्प्रभ केले. उरलेल्या लहान सत्तांनीही कान्होजींचे वर्चस्व मान्य केले व त्यांच्या अधिकारात राहिले.

सन १६९९ मध्ये सिद्दीने मराठ्यांचा पराभव केला व दंडाराजपुरी जिंकून घेतली. त्याबद्दल औरंगजेबाने सिद्दीला बक्षिसादाखल रायगड किल्ला भेट दिला. त्याच वर्षी सिद्दी आणि पोर्तुगिजांनी आंग्रेंच्या विरोधात मुघलांशी सलोखा केला. परंतु कान्होजींनी या सर्वांचा पराभव केला. सागरगड आणि त्याच्या जवळचा प्रदेश जिंकून घेतला. अशाप्रकारे सिद्दी आणि मुघलांना कान्होजींच्या सामर्थ्याचा तडाखा बसला. सागरी सामर्थ्य वाढल्यामुळे कान्होजींनी आपल्या परवान्याशिवाय पश्चिम समुद्रात फिरणाऱ्या गलबतांना अटकाव



छत्रपती राजाराम यांच्या काळातील आंग्रे यांची मुद्रा



छत्रपती शाहू यांच्या काळातील आंग्रे यांची मुद्रा



*मराठा आरमारातील विविध प्रकारच्या युद्धनौका*

करण्यास सुरुवात केली. परिणामी महसुलात वाढ होऊन व्यापारी जहाजांनाही वचक बसला.

इ.स. १७०७ ते १७११ च्या काळात महाराणी ताराबाई यांनी कान्होजी आंग्रेंची मुंबई ते सावंतवाडी पर्यंतच्या मराठा राज्याच्या किनारपट्टीचा प्रमुख म्हणून नेमणूक केली. तसेच राजमाची आणि भिवंडीच्या उत्तरेकडील काही प्रदेश व कल्याण प्रदेशाचेही अधिकार कान्होजींना दिले.

सन १७१३ मध्ये छत्रपती शाहूंचा पक्ष स्वीकारत कान्होजींना दहा किल्ले व उभारलेली गावे देण्यात आली आणि मराठा आरमाराचे प्रमुखपद व सरखेल हा मानाचा किताब देण्यात आला. श्रीवर्धन आणि इतर काही महत्त्वाची आंग्रेंना दिलेली ठिकाणे सिद्दीच्या ताब्यात होती. सिद्दी आणि आंग्रेंच्या शत्रुत्वाचे पर्यवसान पुन्हा एकदा लढाईत झाले. परंतु आता पेशवे आंग्रेंच्या मदतीस असल्यामुळे सिद्दीला शरणागती पत्करावी लागली. सन १७१४ मध्ये मराठे व सिद्दी यांच्यात परस्पर सामंजस्य जोपासले जावे, अधिकार आणि उत्पन्न इत्यादींची समसमान विभागणी व्हावी अशा अर्थाचा एक तहनामा मान्य करण्यात आला. यामुळे कान्होजींना पुरेशी स्वायत्तता मिळाली. त्यांनी आपल्या कारभाराचे मुख्य केंद्र रत्नागिरीच्या ४८ कि.मी. दक्षिणेस असलेल्या विजयदुर्ग या बळकट किल्ल्यावर स्थापन केले. त्यांची लढाऊ गलबते समुद्रात फेरफटका मारत असत. मुंबई ते गोवा दरम्यानचा समुद्रकिनारा

**सिद्दी आणि मुघलांना कान्होजींच्या सामर्थ्याचा तडाखा बसला. सागरी सामर्थ्य आणखी वाढल्यामुळे कान्होजींनी आपल्या परवान्याशिवाय पश्चिम समुद्रात फिरणाऱ्या गलबतांना अटकाव करण्यास सुरुवात केली. परिणामी महसुलात वाढ होऊन व्यापारी जहाजांनाही वचक बसला.**

कुलाबा किल्ला



कान्होजींच्या ताब्यात होता.

बाळाजी बाजीराव यांनी कान्होजी आंग्रे आणि छत्रपती शाहू महाराज यांच्यात समेट घडवून आणल्यामुळे दोघांचे संबंध अत्यंत स्नेहपूर्ण व आदरपूर्ण झाले. शाहूंशी केलेल्या मैत्रीमुळे कान्होजींची प्रतिष्ठा व सामर्थ्य वाढले. खांदेरी, कुलाबा आणि घेरिमा येथे आपले बस्तान बसवल्यावर पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील आपले शेजारी इंग्रज, सिद्दी व पोर्तुगीज यांच्यावर वचक बसवणे त्यांना शक्य झाले. परकीय युरोपीय शक्तींना कान्होजी उघडउघड विरोध करू लागले. आंग्रेंचे वाढते बळ रोखणे त्यांच्या शक्तीबाहेरचे झाल्याने इंग्रजांनी कान्होजींशी करार केला. त्यानुसार इंग्रज व्यापाऱ्यांनी कर भरल्यास आंगऱ्यांच्या बंदरात त्यांना व्यापार करण्यास परवानगी देण्यात यावी व त्या बदल्यात मुंबईच्या गव्हर्नरने प्रमाणित केलेल्या व्यापाऱ्यांच्या जहाजांना परवाने द्यावेत व आंगऱ्यांच्या माणसांना मुंबईत सुविधा व सवलती देण्यात याव्यात असे ठरले. पण थोड्याच दिवसात इंग्रजांनी हा करार मोडला. इंग्रज आणि सिद्दी या दोघांत जुंपली. कान्होजी आंग्रे या दोघांवरही नजर ठेवून होते. या संधीचा फायदा घेत त्यांनी इंग्रजांच्या तीन व्यापारी जहाजांचा ताबा घेतला. अखेर १७ जून १७१८ रोजी युद्धाला तोंड लागले, त्या युद्धात कान्होजींनी इंग्रजांचा पार धुव्वा उडविला.

याच सुमारास पोर्तुगिजांची पीछेहाट सुरू झाली होती आणि कोकणातून हळूहळू मुघलांचेही उच्चाटन होऊ लागले होते. यामुळे कान्होजींचे महत्त्व आणखी वाढले.



यावेळी कान्होजींचे आरमार चांगलेच प्रबळ झाले होते. कान्होजींच्या आरमारामध्ये १५० ते २०० टन ओझे वाहू शकणारी गुरांबे व गलबते होती. त्या जहाजांवर सहा आणि नऊ पौंडी तोफा आणि त्यांच्या मुख्य फाळक्यावर नऊ किंवा बारा पौंडी तोफा बसविलेल्या होत्या. गॅलीव्हटमध्ये चक्रावर लहान तोफा बसवलेल्या असत. ही सर्व गलबते ४० ते ५० भक्कम वल्ह्यांच्या सहाय्याने चालत. आरमाराच्या एका ताफ्यामध्ये अशा प्रकारची ८ ते १० गुरांबे आणि ४० ते ५० गलबते असत.

कान्होजींच्या अंगी असलेले प्रचंड धैर्य, धाडस, युद्धकौशल्य आणि स्वराज्यावरील असीम निष्ठा यामुळे बलाढ्य युरोपियन सत्तांना त्यांनी हा हा म्हणता धूळ चारली. दिनांक ४ जुलै १७३९ रोजी अल्प आजारानंतर कान्होजी मृत्यू पावले. ग्रोसने कान्होजींचे वर्णन कृष्णवर्णी, धिप्पाड, बलदंड असे केले आहे. कान्होजींचे डोळे अत्यंत चमकदार पण चेहरा अगदी उग्र व रुक्ष होता. हाताखालच्या अधिकाऱ्यांशी आणि सैनिकांशी त्यांची वर्तणूक उदार आणि मोकळेपणाची होती. इंग्रज गव्हर्नरांशी त्यांचा पत्रव्यवहार पाहता लक्षात येते, की त्यांनी इंग्रजांशी शांततापूर्ण संबंध ठेवण्याची इच्छा अनेकदा प्रकट केली; पण इंग्रजांनी त्याचा चुकीचा अर्थ लावला.

अशा या पराक्रमी सागरपुत्राचा स्फूर्तिप्रद इतिहास जतन व्हावा म्हणून भारतीय नौकानयनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या अशा खांदेरी बेटास 'कान्होजी आंग्रे बेट' व त्यावरील दीपगृहास 'कान्होजी आंग्रे दीपगृह' असे नाव देण्यात आले आहे. भारतीय नौसेनेने त्यांचा योग्य आदर करून मुंबईतील नाविक तळाला त्यांचे नाव देत त्यांची स्मृती कायमस्वरूपी जतन करून ठेवली आहे.



अलिबाग येथील कान्होजी आंग्रे दीपगृह



# आंग्रेवाडा

अलिबाग शहरात विष्णू मंदिरासमोर आंगऱ्यांचा वाडा असून तेथे इतिहासकालीन अनेक वस्तू आहेत. माडीवर भव्य दिवाणखाना असून त्यात जुन्या पद्धतीच्या हंड्या व झुंबरे आहेत. तसेच, आंग्रे घराण्यातील पुरुषांची चित्रेही आहेत. कान्होजी आंग्रेंची गादी व दैवतेही वाड्यात आहेत. आंग्रे काळात अलिबागला आंगऱ्यांची टाकसाळही होती. त्यात पाडले जाणारे नाणे 'अलिबागी रुपया' म्हणून प्रसिद्ध होते.




**रत्नदुर्ग गडावरील कान्होजी आंग्रे यांचा अर्धाकृती पुतळा**



**सरखेल कान्होजी आंग्रे यांची समाधी**





**शिवाजी चौक, अलिबाग येथील कान्होजी आंग्रे यांचा पुतळा**

दरवर्षी दि.०४ जुलै रोजी या महान सागर वीराला अलिबाग नगरपरिषदेद्वारे अभिवादन केले जाते. २०२२ मध्ये सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या २९३ व्या स्मृतीदिनानिमित्त भारतीय नौदलाचे पश्चिमी क्षेत्र मुख्यालय भारतीय नौसेना पोत आंग्रे या नौदल तळाचे कमांडिंग ऑफिसर कमोडोर आदित्य हाडा यांनी भारतीय नौदलाच्यावतीने पुष्पचक्र तर जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, रघुजीराजे आंग्रे सरखेल, माजी नगराध्यक्ष प्रशांत नाईक, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी अंगाई साळुंके यांच्यासह विविध मान्यवरांनी मराठा आरमाराच्या सरखेलांच्या समाधीवर पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली. सरखेल आंग्रे यांना भारतीय नौदल आपला मानबिंदू मानते आणि त्यांच्या नीती धोरणांचे आजही अनुसरण करते, हे कमोडोर हाडा यांनी विशेषत्वाने नमूद केले.

# चौल व रेवदंड्याचे ऐतिहासिक महत्त्व

कुलाबा तथा रायगड जिल्ह्यातील प्राचीन शहर चौल हे सागराच्या सान्निध्यातील, नारळी-पोफळीच्या बागेत लपलेले अतिशय निसर्गसंपन्न ठिकाण आहे. पूर्वी चौल हे पश्चिम समुद्रकिनाऱ्यावरील सुप्रसिद्ध व्यापारी बंदर होते. इतिहासात चौलचे विविध लेखकांनी विविध प्रकारे उल्लेख केलेले आहेत. त्यात प्रामुख्याने चेकूल, तिमूल्ल, सिमूल्ल, सेमूल्ल, सिबोर, चिमोलो, सैमूर, जयमूर, चेमूली, चिवील, शिऊल, चिवल, सौल, चावोल, चैल, चौले इत्यादी उल्लेख इ. स. १३० पासून निरनिराळ्या प्रवासी लेखकांनी केलेले दिसतात. हे सर्व मूळ नावाचे अपभ्रंश असून विद्यमान लेखनात चौल हेच ग्रामनाम गृहीत धरले आहे. चौलच्या शेजारीच रेवतीद्वीप तथा रेवदंडा हे गांव आहे.

### चौलचा प्राचीन इतिहास

ज्ञात इतिहासावरून इ.स. १३० पासून इ.स. १७८६ पर्यंतचा चौलचा इतिहास असंख्य घटनांनी भरलेला दिसतो. त्याकाळी या स्थानास चंपावती व रेवतीक्षेत्र म्हणत असावेत. ही प्राचीन गावे जुळ्या भावंडांसारखी एकमेकांच्या शेजारी उभी आहेत. आज ती चौल व रेवदंडा म्हणून ओळखली जातात. प्राचीन व मध्ययुगीन काळात चौलला व्यापारी बंदर म्हणून महत्त्व आले होते. चौल हे टॉलेमीने इ. स. १५० मध्ये वर्णन केलेले वसईची खाडी व पालेपट्टण किंवा महाड यामधील Symulla किंवा Timulla हे भूशिर असावे. या ठिकाणाहून अलेक्झांड्रियास गेलेल्या लोकांकडूनच पश्चिम भारताची माहिती आपणास मिळाली, असे टॉलेमी नमूद करतो. याच सुमारास (सन १३०) कान्हेरी लेण्यांतील दोन शिलालेखांत Chemula असा उल्लेख असून तेथे राहणाऱ्या दोघा भावांनी विहारास देणग्या दिल्याचा उल्लेख आहे. इ. स. २४७ मध्ये परोल्पस नामक प्रवासवर्णनात Symulla ही कल्याणच्या दक्षिणेस असलेली पहिली स्थानिक बाजारपेठ आहे असा उल्लेख आहे. पाचव्या शतकात पुन्हा कान्हेरी लेण्यातील एका शिलालेखात चेकूल असा उल्लेख आहे. इ. स. ६४० चिनी प्रवासी हिएनवसँग याने याच संदर्भात चौलचा Tchi-mo-lo असा उल्लेख केला आहे. अल मसूदी (९१५) मुहलहील (१९२) अल इस्तीसेल (९५०) इब्त हौकल (९७६) अल बिरूनी (१०३०) हे अरब प्रवासी चौलचा सैमूर किंवा जयमूर असा उल्लेख करतात. अरब प्रवासी मसूदी याने इ. स. ९१५ मध्ये सैमूरला भेट दिली तेव्हा तेथे कोकण शिलाहाराच्या (इ.स. ८१५ ते १२६०)

कोर्लईचा किल्ला





उत्तरेकडील शाखेचा पाचवा स्थानिक राजपुत्र राज्य करीत होता. इ.स. ९७० सैमूर हे मोठे व सुरक्षित शहर असून तेथे आंबे, नारळ, कांदे व भाताचे पीक भरपूर होते असे प्रवाशांनी वर्णन केले आहे. तेथे हिंदूंशिवाय मुसलमानही मोठ्या संख्येने राहत होते. काही स्थानिक सिराफ, ओमान, बसरा व बगदादहून आले होते. बरेच जण धनिक व्यापारी होते. त्यांची भाषा लारी म्हणजे गुजराती होती. या शिवाय ख्रिश्चन, ज्यू व पारशीही होते. इ.स. १०९४ मध्ये चौदावा शिलाहार राजा अनंतदेवाच्या ताम्रपटात चेमूर्लीचा शूर्पारक (सोपारा) आणि श्रीस्थानक (ठाणे) या बंदरांसारखे बंदर असल्याचा उल्लेख केला आहे. बाराव्या शतकात चौल हे मेंदी व नारळाची मुबलक झाडे असलेले व सभोवतालच्या टेकड्यांवर सुवासिक वनस्पती असलेले आखीवरेखीव शहर होते, असा उल्लेख आढळतो.

तेराव्या शतकात देवगिरीच्या यादवांनी चौल माहीमच्या राजाकडून जिंकून घेतले. इ. स. १३१२ मध्ये यादवांकडे असलेले हे ठिकाण व कोकणातील त्यांची इतर प्रमुख ठाणी अल्लाद्दीन खिलजीचा (१२९७–१३१५) सरदार मलिक काफूर याने शंकरदेव यादव यास ठार मारून आपल्या आधिपत्याखाली आणली. यानंतर अल्पावधीसाठी चौल विजयनगर राज्यात समाविष्ट होते. त्यानंतर ते बहामनीकडे गेले. इ.स. १३५७ मध्ये चौल हे बहामनी राज्यातील एक महत्त्वाचे शहर होते. इ. स. १३८० मध्ये फेरिसाने चौलचा बहामनी राज्यातील एक मोठे शहर व मुख्य बंदर असा उल्लेख केला आहे. इ. स. १३९८ मध्येही चौल हे



**बाराव्या शतकात चौल हे मेंदी व नारळाची खूप झाडे असलेले व सभोवतालच्या टेकड्यांवर सुवासिक वनस्पती असलेले आखीवरेखीव शहर होते, असा उल्लेख आढळतो.**

कोकणातील प्रमुख बंदर होते. सन १४७० मध्ये रशियन प्रवासी अफनासी निकितीन चौलचा चिवील असा उल्लेख करतो. मात्र त्याने चौलच्या व्यापाराविषयी तसेच वैभवाविषयी नमूद केले नाही. निकितीनच्या भेटीनंतर काही वर्षांनी चौल बहामनीकडून अहमदनगरच्या निजामशाहीच्या (१४९६–१६००) आधिपत्याखाली गेले. त्या काळात चौलची प्रमुख बंदर म्हणून चांगली देखभाल ठेवली जात होती. वर्थमा (१५०३–१५०८) याने चौलचे लढवय्ये लोक, तटबंदी, उत्पादन, व्यापारी सुबत्ता यांचे फार सुंदर वर्णन केले आहे.

सन १५०५ मध्ये पोर्तुगिजांचे चौलमध्ये पदार्पण झाले. सन १५१४ मध्ये बार्बोसा या प्रवासी इतिहासकाराने चौलला भेट दिली, तेव्हा तेथे अहमदनगरच्या राजाचा मांडलिक सत्ताधारी होता. त्याचे पोर्तुगिजांशी व इतर लोकांशीही चांगले संबंध होते. बार्बोसाने वर्णन केल्याप्रमाणे चौल त्या काळी फार मोठे शहर नव्हते. भिंती बांधीव असून गवताने शाकारलेली घरे होती. पावसाळ्यात गावात जास्त लोक राहत नसत. पावसाळा संपताच डिसेंबरच्या सुरुवातीस व्यापारी लोक माल घेऊन मोठ्या संख्येने येत. त्याआगोदर ते गावाच्या अलीकडे ५ कि. मी. थांबत. डिसेंबर ते मार्च या कालावधीत चौल अतिशय गजबजलेले असे. या काळात व्यापारी लोक बैलांच्या पाठीवरून माल आणत. सुरत व गोवा यांदरम्यान चौल हे सर्वात मोठे व्यापारी केंद्र होते. समुद्रामार्गे पर्शियन आखात आणि अरेबियात मोठ्या प्रमाणात नारळ निर्यात केले जात असत व तेथून प्रामुख्याने खजूर व घोडे आयात केले जात. दक्षिणेस मलबार, गोवा व उत्तरेस गुजरातबरोबर व्यापार होत असे. ही वाहतूक बरेचदा मलबारी जहाजातून होत असे. मलबारहून नारळ, सुपारी, मसाल्याचे पदार्थ, औषधे, ताड, साखर आणत व तो अंतर्भागात तसेच गुजरातमध्ये पाठविला जात असे. चौलहून मलबारी बोटीतून गहू, भाजीपाला, कडधान्ये, तांदूळ, तीळ, तिळाचे तेल, तलम रेशमी कापड, सुती कापड नेत. तलम रेशमी तसेच सुती कापड दीवमार्गे अरेबिया व पर्शियालाही जात असे.

इ. स. १५१६ मध्ये अहमदनगरचा बुरहान निजाम शहा (१५०८–१५५३) याने पोर्तुगिजांना रेवदंडा येथे वखार बांधण्यास परवानगी देऊन चौल बंदरास पूर्वीपेक्षा जास्त मोकळीक दिली. वखार बांधण्याच्या निमित्ताने पोर्तुगिजांनी येथे किल्ला बांधावयास सुरुवात केली. त्याला अनेक अडथळे निर्माण करण्यात आले, पण विरोध मोडून काढत १५२४ मध्ये किल्ला बांधून पूर्ण झाला. पोर्तुगिजांचे बळ वाढले. त्यांनी चौलला वेढा दिला आणि बराच भाग आपल्या आधिपत्याखाली आणला. शेवटी अहमदनगरचा मूर्तजा निजामशहा आणि विजापूरचा सुलतान एक होऊन त्यांनी १६ फेब्रुवारी १५७१ रोजी पोर्तुगीज

चौल येथील पोर्तुगीज किल्ल्याचा नकाशा



चौलला वेढा दिला. साडेचार महिने हा वेढा होता. शेवटी २१ जून १५७१ रोजी मोठा हल्ला होऊन अहमदनगरच्या शहास शांततेचा तह करावा लागला. यानंतर पोर्तुगिजांनी रेवदंडा किल्ल्याच्या रक्षणासाठी दक्षिण किनाऱ्यावर भक्कम तटबंदी बांधली. या काळात चौल रेवदांड्याच्या भरभराटीने शिरोबिंदू गाठला होता. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांपैकी तांबडा समुद्र, ओर्मुज इत्यादी ठिकाणांची सर्वाधिक गलबते चौलला येत असत.

१५८३ मध्ये एका डच प्रवाशाने चौलचे वर्णन तटबंदी असलेले चांगले बंदर व व्यापारासाठी प्रसिद्ध शहर असे केले आहे. खंबायत, सिंध, बंगाल, ओर्मुज, मस्कत आणि तांबड्या समुद्राकडच्या व्यापाऱ्यांना ते सुपरिचित होते. येथील व्यापारी श्रीमंत असून त्यांच्या मालकीची जहाजेही होती. तांदूळ, वाटाणे, डाळी, लोणी, तेल व नारळाचे अमाप उत्पन्न होते. खंबायत व गुजरातमधील व्यापारी तेथे स्थायिक झाले होते. ते विशेषतः हिरेमाणकांचा व्यापार करीत. आसपास राहणारे स्थानिक लोक रेशीम तयार करत. चीनहून आयात केलेल्या कच्च्या रेशमापासून लांब झगे, महिलांचे व श्रीमंती थाटाचे कपडे तयार करत. याशिवाय विविध प्रकारचे बिछाने, खुर्च्या, नक्षीदार पेट्या व कपाटेही करत. येथील हवा चांगली, निरोगी असल्याचेही त्याने वर्णन केले आहे. सन १५८६ मध्ये व्हेनिसहून आलेला प्रवासी सीझर फ्रेडरिक याने बंदराच्या तोंडाशी सर्व बाजूने मजबूत भिंतीने सुरक्षित असलेले रेवदंडा आणि नदीच्या मुखापासून २ किमी. अंतरावरील चौल या दोन शहरांचा उल्लेख केला असून ही दोन्ही मोठी व्यापारी बंदरे होती, असे नमूद केले आहे. त्या काळात पोर्तुगाल, चीन, आफ्रिका इत्यादी देशात आयात निर्यातीच्या क्षेत्रात पश्चिम किनारपट्टीत कल्याण, ठाणे यांच्याइतकेच चौल रेवदंड्याला महत्त्व आले होते.

शिवकाळात १६३६ मध्ये मुघल बादशहाने विजापूरशी तह करून कोकणातील सर्व प्रदेश विजापूरकरांस दिला. इ. स. १६५७ च्या सुमारास शिवाजी महाराजांनी अप्पर चौल जिंकले. इ. स. १६६५–६६ मध्ये इंग्रज मुंबईत स्थायिक झाले आणि व्यापाराचे केंद्र मुंबईकडे सरकले. चौल रेवदंड्याची भरभराट व व्यापार संपुष्टात आला. चौलमधील रेशीम विणकर व कुशल कारागिरांनी मुंबईत स्थायिक व्हावे म्हणून त्यांना इंग्रजांनी प्रोत्साहित केले. त्यांच्यासाठी मुंबईत रस्ते बांधले व इतर सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या. परिणामी चौलचे बरेच सोनार, विणकर, सुतार मुंबईत स्थायिक झाले. त्यांचे मुंबईतील वंशज मूळ गावावरून चेऊली या नावाने ओळखले जातात. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६८१ मध्ये सिद्दीने अप्पर चेऊल लुटले, तेव्हा पोर्तुगीज तटस्थ राहिले. त्याचा



चौल येथील युद्धात पोर्तुगिजांनी वापरलेल्या युद्धनौका. या युद्धात पोर्तुगीज व्हॉइसरॉयचा मुलगा डॉम अलमेडा मारला गेला.

राग येऊन संभाजी राजांनी रेवदंड्याला वेढा दिला. पण पोर्तुगिजांनी प्रतिकार केल्यामुळे शेवटी वेढा उठविण्यात आला. मराठ्यांचे हल्ले मात्र सतत होऊ लागले. यापुढे आपला निभाव लागणार नाही हे पाहून पोर्तुगिजांनी चौल व कोर्लई किल्ले इंग्रजांना दिले. पुढे १७३९ साली चिमाजीआप्पाने वसई जिंकल्यावर व ठाणे अगोदरच घेतल्यामुळे मराठे मुंबईच्या अगदी दारातच उभे ठाकले. तेव्हा इंग्रजांनी बाळाजी बाजीराव पेशव्यांबरोबर तह केला व चौल व रेवदंडा हे दोन्ही किल्ले मराठ्यांना दिले.

१७५० च्या सुमारास येथे फ्रेंचांचा शिरकाव झाला. त्यांनी येथे वखार बांधून सैन्य व तोफखाना ठेवण्यास परवानगी मिळवली. १८१८ साली पेशवाई बुडाली आणि इंग्रजांचे राज्य आले. अनेक ऐतिहासिक घटनांनी भरलेला हा चौलचा इतिहास प्राचीन अवशेषरूपाने आजही आपल्याला पाहता येतो.



रेवदंडा किल्ल्यातील मनोरा




# हिंगुलजा लेणी

हिंगुलजा डोंगरकड्यातील प्राचीन लेणी ही सातवाहन काळातील बौद्ध लेणी आहेत. पायथ्यापासून सुमारे ३०.४८ मीटर उंचीवर ०.५७ × १.६८ मीटरचा दरवाजा असलेले ३.३५ × १.७८ × १.६८ मीटर लांबी, रुंदी, व उंचीचे लेणे आहे. बाहेर ३.३५ × १.५२ मीटरचा सज्जा असून शेड उभारण्यासाठी भोके आहेत. यात कोणतेही कोरीव काम अथवा लेख नाहीत. या गुहेला लागूनच पश्चिमेला २.३१ × १.३२ × २.४४ मीटरचे दुसरे लेणे आहे. समोरची बाजू तुटलेली असून व्हरांडा अरुंद आहे. इथला दगड चांगला नसल्याने या लेण्याचे काम अपुरे ठेवले असावे. या दोन लेण्यांबरोबरच पश्चिम बाजूला तितक्याच उंचीवर पश्चिमाभिमुख असलेल्या हिंगुलजा देवीच्या मंदिराकडे रस्ता जातो. त्या सुमारे १५८ पायऱ्या चढून गेल्यावर मंदिरापाशी आल्यावर त्याच्या उजव्या बाजूलाच दगडात कोरलेल्या ५.२६ × ४.६५ × २.३ मीटर आकाराचे एक लेणे आहे. त्यात आशापुरा देवी आहे. या लेण्यातील दक्षिणेकडील भिंतीत १.३७ × १.०२ मीटर × १.२२ मीटर चौरसाकृती खोल्या आहेत. पश्चिमेकडील भिंतीत खिडकी आहे. लेण्याच्या बाहेर ३० पायऱ्या चढून गेल्यावर दगडात खोदलेल्या पाण्याची दोन टाकी आहेत. पायऱ्यांच्या सुरुवातीला उत्तरेला दरवाजाच्या आत हिंगुलजा देवीचे मंदिर असून त्यासमोर अलीकडे सिमेंट कॉंक्रीटचा सभामंडप बांधला आहे. तसेच तुळशीवंदावन व दीपमाळ आहे. येथून सभोवतालचा प्रदेश अतिशय रम्य दिसतो. येथून जवळच मंदिराच्या बाजूला ओळीने पाच लेणी असून त्यातील एकात अष्टभुजा देवीची मूर्ती आहे. पाच नंबरच्या लेण्याबाहेर स्तुपाचे उठावदार शिल्प कोरलेले आहे. त्याच्या घडणीवरून इ. स. १५० च्या सुमारास सातवाहनकाळात ही बौद्ध लेणी खोदली असावीत.

चौलच्या परिसरात अनेक पुरातन मंदिरे आहेत. त्यात रामेश्वर मंदिर, एकवीरा भगवती देवी, शीतलादेवी मंदिर, महाकाली मंदिर, भोवाळेचे दत्त मंदिर, सोमेश्वर मंदिर, तसेच चौलच्या उत्तरेस असलेल्या मोडकवाडी येथील देवगिरी नृपती यादव रामचंद्रदेव याच्या काळातील शके १२२० विलंबी संवत्सर चैत्र शुद्ध ११ सोमवार २४ मार्च इ. स. १२९८ चा संस्कृत–मराठी मिश्र देवनागरी लिपीतील शिलालेख आहे. शिलालेखाची झीज झाल्यामुळे सुसंगत वाचता येत नाही.

चौलला लेणी, मंदिर, शिलालेख या प्राचीन वस्तु–वास्तुंबरोबरच मध्ययुगीन काळातील गडकोटही आपले अस्तित्व प्रकट करताना दिसतात. त्यात राजकोट, आगरकोट, कलावंतिणीचा वाडा, चर्च, मशिदी, हमामखाना, बंदर इत्यादी तत्कालीन राजवटींचा चौलवरील प्रभाव दाखवतात. त्यामुळे इतिहासप्रेमी पर्यटकांची पावले चौल– रेवदंड्याकडे वळू लागतात.

# नरवीर तानाजी मालुसरे

तानाजी मालुसरे यांची कूळकथा, जन्म, तिथी, वार इतिहासाला ज्ञात नाही; पण कोंढाणा ऊर्फ सिंहगड म्हटला, की नुसत्या नामोच्चारानेच सोनेरी अक्षरात लिहिल्या गेलेल्या इतिहासाची पाने झरझर उलगडली जातात. शिवचरित्रात तानाजी आरंभापासून शिवाजी महाराजांबरोबर होते असे दिसून येते. कवी परमानंद यांनी प्रतापगड युद्धात अफजलखानाच्या स्वारीचे केलेले वर्णन किंवा तळकोकणात महाराजांच्या मोहिमेत संगमेश्वरापाशी सूर्यराव सुर्व्याची तानाजींनी केलेली फजिती किंवा फावल्या वेळात आपल्या एक हजार मावळ्यांसह तळकोकणात केलेले रस्त्याचे काम यातून त्यांच्या कार्याची ओळख होते.

कोंढाणा म्हणजेच सिंहगड हे तानाजी मालुसरेंच्या आहुतीने पावन झालेले पवित्र स्थान आहे. कुलाबा गॅझेटियर मध्ये तानाजींच्या जन्मगावाची माहिती दिली आहे.

**उमरठ– (पोलादपूर तालुका)**. नरवीर तानाजी मालुसरे यांचे राहते घर उमरठ गावी आहे. हे गांव पोलादपूरच्या पूर्वेस १७ कि. मी. वर कायडे, देवळे, साखर, बोरज या गावांच्या गराड्यात सावित्री नदीच्या काठी वसलेले आहे. तानाजी मालुसरे व शेलारमामा यांचे स्मारक येथे आहे. जवळच त्याच्या राहत्या वाड्याच्या ठिकाणी तानाजींचा पूर्णाकृती पुतळा बांधलेला आहे. त्याचे अनावरण १६ एप्रिल १९६५ रोजी करण्यात आले. तेव्हापासून दरवर्षी तानाजींची पुण्यतिथी साजरी केली जाते. ज्या वृक्षाच्या ढोलीत त्यांची व मावळ्यांची शस्त्रास्त्रे सापडली तो वृक्ष अद्याप तिथे आहे.

हे गांव अतिशय निसर्गरम्य असून तानाजींच्या आईने तानाजी व सूर्याजीला घेऊन ज्या गुहेत मुक्काम केला ती घळ व मोरझोत प्रपात जवळच असलेल्या डोंगरात आहे. उमरठहून कांगोरी किल्ला, प्रतापगड, व चंद्रगडावर जाता येते. येथे शासकीय विश्रामगृह आहे. तानाजी व शेलारमामा यांच्या समाधीवर मेघडंबरी आहे. सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या या टुमदार निसर्गरम्य गावाकडे जाताना पोलादपूरला शिवभारतकार कवी परमानंद यांची समाधी आहे. तानाजी मालुसरेंचे जन्मगांव उमरठ येथे शिवप्रेमी नेहमी भेट देतात.







सिंहगड

**मोरझोत प्रपात : ढवळे गावानजीक दोन टप्प्यात कोसळणारा हा निसर्गनिर्मित धबधबा आहे. उंचावरून कोसळणाऱ्या धबधब्याचे पाणी रस्त्यावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांवर उडते. तो अनुभव अविस्मरणीय असतो. पोलादपूरपासून २० कि.मी. अंतरावर आहे.**



**कवी परमानंद स्मारक** :
शिवरायांचे समकालीन संस्कृत कवी परमानंद यांचे स्मारक पोलादपूर बस स्थानकाशेजारी आहे. त्यांनी शिवचरित्र (संस्कृतमध्ये) लिहिले होते.



## द्रोणागिरी

समुद्रसपाटीपासून अंदाजे ३०० मीटर उंचीवर असणारा हा लष्करी किल्ला उरणच्या दक्षिणेस १ कि.मी. अंतरावर आहे. तो यादवांच्या ताब्यात होता. पोर्तुगिजांनी १५३०मध्ये त्याची डागडुजी केली. त्यांनी किल्ल्यावर बांधलेले गार्डहाऊस व एन एस द पेन्हा चर्चचे काही अवशेष पाहावयास मिळतात. डोंगरावर काही पायऱ्या चढून जाता येते.

स्थानिकांच्या मते, हा किल्ला पोर्तुगिजांच्या ताब्यात जाण्याआधी काही काळ मराठ्यांच्या अमलाखाली होता. हा किल्ला संखोजी व संकपाळ व त्यांच्या वारसांच्या ताब्यात होता. किल्ल्यावर गर्गोणी व निजोणी नावाचे दोन मोठे पाण्याचे हौद आहेत. थोडीफार तटबंदी, एक बुरूज व प्रवेशद्वार शिल्लक आहे. किल्ल्याच्या पायथ्याशीच ओएनजीसीचा कारखाना आहे.


# कर्नाळा

(तालुका पनवेल) कर्नाळा हे गाव मुंबई गोवा महामार्गावर पनवेलच्या दक्षिणेला आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे ४७५ मीटर उंचीच्या या किल्ल्याचे दर्शन लांबूनच दिसणाऱ्या सुळक्यामुळे होते. किल्ल्याच्या पश्चिमेस वेगवती नदी आहे. कर्नाळा डोंगरावर दाट जंगल असून तेथे विविध प्रकारचे रंगीबेरंगी पक्षी आढळतात. म्हणून येथे पक्षी अभयारण्य निर्माण केले आहे.

अभयारण्यातून वर चढणाऱ्या चिरेबंदी वाटेने दीड किमी चालून गेल्यावर किल्ल्याचा दरवाजा लागतो. तेथे दगडी पायऱ्या आहेत. आत गेल्यावर डाव्या बाजूस काही इमारतींच्या भिंती व सुळके आहेत. सुळक्यांच्या चहूबाजूस दगडात कोरलेली धान्य साठवण्याची कोठारे व पाण्याची टाकी आहेत. कडे चढण्यात तरबेज असलेले गिर्यारोहकच सुळका चढू शकतात.

सुळक्याच्या पलिकडे तटबुरुजांनी वेढलेला किल्ल्याचा दुसरा भाग लागतो. शिवाजी राजांनी कर्नाळा किल्ला जिंकून घेतला. परंतु मिर्झा राजा जयसिंगबरोबर झालेल्या तहात तो औरंगजेबास द्यावा लागला. १७४० मध्ये या भागांवर पेशव्यांचा अंमल आल्यावर पुन्हा तो मराठ्यांच्या ताब्यात आला. मे १८०३ मध्ये इंग्रजांनी तिसऱ्या बाजीरावाच्या बाजूने गडाचा ताबा घेतला. सन १८१८ नंतर तो कायमचा इंग्रजांकडे आला.

वासुदेव बळवंत फडके यांचे आजोबा १८१८ पर्यंत कर्नाळ्याचे किल्लेदार होते. किल्ल्याच्या पश्चिमेस व नैऋत्येस घनदाट जंगल असून तेथून मुंबई बंदर व अरबी समुद्राचे मनोहारी दर्शन होते. कर्नाळा गावात चैत्र पौर्णिमेला मारुतीची जत्रा भरते.




# प्रबळगड

(तालुका पनवेल) माथेरानच्या पश्चिमेस खोल दरीपलीकडे प्रबळ डोंगरावर हा किल्ला आहे. गडावर जाण्यासाठी पनवेल व माथेरानकडून वाटा आहेत. समुद्रसपाटीपासून जवळपास ७०७ मी. उंचीवरील या गडावर गणेशमंदिर, पडकी तटबंदी व पाण्याचे टाके आहे.

गडाच्या तटबंदीस दोन दरवाजे व ११ बुरूज होते. सन १६५८ मध्ये कल्याण प्रांत मुघलांकडून काबीज करून शिवाजी महाराजांनी हा किल्ला मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आणला. त्यावेळी महाराजांना गडावर बरेच द्रव्य मिळाल्याचे बखरीत लिहिले आहे. सन १८१८ मध्ये इंग्रजांनी गडाची हानी केली.

माथेरान व प्रबळगड यादरम्यान खोल दरी असून येथील हवामान आल्हाददायक आहे.





# कासा (पद्मदुर्ग)

(तालुका : मुरूड) छत्रपती शिवरायांच्या कारकिर्दीत जंजिऱ्याला वेढा देत असताना त्यांच्या नाविक दलाचा प्रमुख दर्यासारंग दौलतखान याने सन १६६१ मध्ये जंजिऱ्यापासून काही अंतरावर, मुरूड शहराच्या किनाऱ्यासमोर कासा खडकावर किल्ला बांधला. हाच तो कासा ऊर्फ पद्मदुर्ग. सिद्दीच्या हालचालींवर नजर ठेवण्यासाठी बांधलेला हा किल्ला तसा छोटासाच, पण सहा बुरुजांची भक्कम तटबंदी उभारून मजबूत केलेला. किल्ल्यातला होड्या लागण्याचा धक्का अजून शाबूत आहे. किल्ल्यावर बऱ्याच ठिकाणी कमळाची चित्रे कोरलेली दिसतात. किल्ल्यात वाड्याचे पडके अवशेष आहेत. शिवाय पाण्याची टाकी आहेत. परंतु पाणी पिण्यायोग्य नाही. जंजिरा किल्ल्यातील कलालबांगडी तोफेच्या माऱ्यामुळे कासा किल्ल्याचा जंजिऱ्याच्या दिशेचा भाग काही अंशी तुटला होता. हा किल्ला कालांतराने सिद्दीने जिंकून त्याचा वापर तुरुंग म्हणून केला.

ऐतिहासिक वास्तूंबाबत प्रेम असणारे पर्यटक या किल्ल्यास आवर्जून भेट देतात. पर्यटकांना खासगी बोटीने किल्ला पाहण्यास जाता येते.









# अवचितगड

(तालुका रोहा) रोह्याच्या उत्तरेला पाच किमी अंतरावर रोहे नागोठणे यांमधील डोंगररांगेत एका स्वतंत्र टेकडीवर हा गड आहे. दक्षिणेकडील रोह्याहून व उत्तरेकडील मेढ्याहून दोन्ही दिशांनी गडावर जाता येते. गडावरील बुरूज व तटबंदी ढासळलेली आहे. समुद्रसपाटीपासून ३९४ मीटर उंच असलेल्या या गडाच्या पायथ्याशी पिंगळसई नावाचे गांव आहे.

गडावर तटबंदी असून उत्तरेकडील फाट्याची लांबी सुमारे अर्धा कि.मी. आहे. तटबंदीच्या प्रत्येक टोकाला ताशीव दगडांचे गोलाकार बुरूज होते. गडाचा दक्षिणेकडील भाग उत्तरेकडील भागापेक्षा अधिक रुंद आहे. उत्तरेकडून दक्षिणेकडे येताना सरदारांच्या इमारतींच्या जोत्यांचे अवशेष आढळून येतात. बालेकिल्ल्याचे प्रवेशद्वार मुख्य प्रवेशद्वारासारखे असून तेथे पाण्याची टाकी आहेत. येथील पायऱ्या असलेल्या बाराकोनी तलावात भरपूर पाणी आहे. जवळच गडाचे हवालदार बाजी पासलकर यांच्या स्मरणार्थ उभारलेली साधी मूर्ती व दीपमाळ आहे. गडाच्या दुसऱ्या मनोऱ्यावरून उत्तरेला पेणचा मिऱ्या डोंगर व रतनगड, पूर्वेस खंडाळा घाटातील ड्यूक्स नोज, दक्षिण व पश्चिमेला कुंडलिका नदीचे खोरे व जंजिऱ्याचे डोंगर दिसतात.

# सांक्षी

(तालुका पेण) पेण पनवेल रस्त्यावरील बळवली गावाजवळून या किल्ल्यावर जाण्यासाठी रस्ता आहे. पेणच्या ईशान्येस जवळपास २०० मीटर उंचीवर हा किल्ला आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी बद्रुद्दीन अवलियाचा दर्गा आहे. त्यामुळे या किल्ल्याला बद्रुद्दीनचा किंवा दर्ग्याचा किल्ला असेही म्हणतात. गडाचा माथा सपाट असून वर वाड्याचे उद्ध्वस्त चौथरे व पाण्याची अनेक टाकी आहेत.


बद्रुद्दिन अवलियाचा दर्गा


पाण्याचे टाके



# कोथळीगड

**(तालुका कर्जत)** कर्जतच्या ईशान्येस सुमारे बावीस किमी अंतरावर हा गड असून त्याच्या पायथ्याशी पेठ गांव आहे. मनोऱ्यासारख्या डोंगरावर वसलेल्या या गडाची चढण अवघड आहे. या गडावरून पूर्वी नाकिंडा आणि कौला खिंडींचे रक्षण करता येई. कुलंबी घाटावरही नजर ठेवता येत असे. प्रवेशाची जागा अतिशय अवघड असल्यामुळे अत्यल्प शिबंदीच्या मदतीनेही मोठ्या चढाईस रोखता येत असे. डोंगरावर जाण्यासाठी पायऱ्या असलेला भुयारी मार्ग आहे. गडाच्या पायथ्याशी असलेल्या दरवाज्याजवळ एक मोठे लेणे व पाण्याची टाकी आहेत. हा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे.

मुघल सरदार मातबर खानने १६८४ मध्ये मराठ्यांच्या ताब्यातील हा किल्ला सर केला. सन १७१३ मधील शाहू – कान्होजी आंग्रे यांच्यातील समेटानुसार या गडाची मालकी कान्होजींकडे आली. नोव्हेंबर १८१७ मध्ये पेशव्यांनी हा गड घेतला. परंतु पुढील एकाच महिन्यात तो इंग्रजांनी जिंकून घेतला.



# कुलाबा किल्ला

**(तालुका अलिबाग)** कुलाबा किल्ला हा अलिबाग शहराच्या समुद्र किनारी असून समुद्राला ओहोटी असताना घोडागाडीने किंवा पायी या किल्ल्यात जाता येते. दरवर्षी माघ महिन्यात म्हणजे जानेवारीत येणारा गणपती उत्सव या किल्ल्यात सरखेल कान्होजी आंग्रेच्या काळापासून चालू आहे. तसेच येथे गेली काही वर्षे दिवाळीच्या दोन दिवस आधी दीपोत्सव साजरा केला जातो. शेकडो दिवे आणि मशाली यांच्या प्रकाशात हा किल्ला उजळून निघतो आणि पुन्हा एकदा इतिहास आणि किल्ला जागा होतो. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून शिवप्रेमी आणि पर्यटक इथे येतात.

कुलाबा म्हणजे समुद्रात गेलेली दांडी अथवा भूशिर. किल्ला नेमका कोणी बांधला हे ज्ञात नाही. परंतु क्रप्ट डफच्या मतानुसार शिवाजी महाराजांनी तो १६६२ च्या सुमारास नव्याने बांधला किंवा डागडुजी करून भक्कम व मजबूत केला.

हा किल्ला पुढे मराठ्यांच्या आरमाराचे मुख्य ठिकाण बनले. इ.स. १६८९ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात जंजिऱ्याचा सिद्दी याकुतखानाने कुलाब्यास वेढा घातला. सिद्दी व मराठे यांच्यात वारंवार युद्धे होत.

कुलाबा किल्ल्यास विशेष महत्त्व प्राप्त झाले ते कान्होजी आंग्र्यांच्या काळात. त्यांच्या भीमपराक्रमाने परकीय सत्तेला स्वराज्याच्या आरमाराची दहशत बसली. कान्होजींचे सर्व राजकारण येथूनच चाले. पुढे ब्रिटिश कारकिर्दीतही कुलाबा किल्ला व येथील परिसराला महत्त्व प्राप्त होऊन ब्रिटिशांनी कुलाबा जिल्हा बनवून त्याचे मुख्यालय अलिबागमध्ये स्थापन केले.

किल्ल्याची तटबंदी ६ ते ७ मीटर उंच आहे. किल्ल्याला नगारखानी, गणेशमाडी, तोफखानी, सूर्य, हनुमान, भवानी, पीर, गोलंदाज, दारूखानी, यशवंतदारी, नाला, घनचक्र, फत्या, दर्या, मनोहंद्रा, बाबदेव असे एकूण १७ बुरूज आहेत.


किल्ल्याच्या उत्तरेला सर्जाकोट नावाची गढी आहे. त्यामागे आरमार उभे असे. सर्जाकोटास उत्तरेकडून १३ पायऱ्या आहेत. या गढीपासून दक्षिणेला किल्ल्यापर्यंत दगडी भिंत आहे. किल्ल्याला दोन प्रवेशद्वार आहेत. एक महादरवाजा व दुसरा यशवंत दरवाजा. मुख्य महादरवाजाबाहेर वाळूत रुतलेले नारळासारखे दिसणारे मोठे लोखंडी बोयरे आहेत. महाद्वारावर द्वारशिल्पे असून त्यात शंकरपाळी, मकरचित्रे, फुले, मेंढ्याचे डोके इत्यादी प्रतिमा असून मध्यभागी श्रीगणेश आहे.

दरवाजातून आत प्रवेश केल्यावर उत्तरेकडील भिंतीत एक चौरसाकृती तळघर आहे. किल्ल्याच्या आत पद्मावती देवी, महिषासुरी, गणपती, शंकर, मारुती, राम आदी देवतांची मंदिरे, एक अष्टकोनी तुळशीवृंदावन, एक तलाव, गोड्या पाण्याची विहीर, भक्कम तटबंदी आदी वास्तू आहेत.









किल्ल्यामधील दगडी बांधकामाचा गोड्या पाण्याचा तलाव (पोखरण) व त्यामागील दगडी दीपमाळ


अष्टकोनी तुळशीवृंदावन


किल्ल्यामध्ये अनेक देवतांची सुरेख मंदिरे आहेत

किल्ल्यातील एका बुरुजावर गाड्यावर
चढवलेल्या उत्तम स्थितीतील दोन तोफा





# खांदेरी

अलिबाग स्थानकापासून ५ कि.मी. अंतरावरील थळ गावाच्या किनाऱ्यापासून अंदाजे ४.५ ते ५ कि.मी. अंतरावर समुद्रामध्ये खांदेरी नावाचा तटबंदी असलेला किल्ला आहे. साधारणपणे ४०० मी. लांब व ३०० मी. रुंद एवढे त्याचे क्षेत्र आहे. किल्ल्यात जाण्यासाठी पक्का धक्का (जेट्टी) असून आजूबाजूच्या खडकाळ भागामुळे या जेट्टीव्यतिरिक्त इतरत्र होड्या लावणे धोकादायक आहे. जेट्टीच्या समोर एक टेकडी असून तेथे वेताळ देवाचे मंदिर आहे. या बेटाच्या भोवतालचा भाग खूपच खडकाळ असल्याने बोटींना मार्गदर्शन म्हणून इ.स. १७६८ साली या बेटावरील सर्वात उंच टेकडीवर दीपगृह बांधण्यात आले. या दीपगृहाची इमारत दोन मजली असून दीपगृहाची उंची ५० फूट आहे. या किल्ल्याला चौफेर तटबंदी असून या तटावरून संपूर्ण किल्ल्याला फेरफटका मारता येतो. मुंबईच्या दिशेला असलेल्या बुरुजावर दोन जुन्या तोफा ठेवलेल्या आहेत. या बेटावर पिण्याच्या पाण्यासाठी गोड्या पाण्याचे तलाव आहेत. दीपगृहाच्या वाटेवर एक प्रचंड शिळा असून या शिळेवर छोट्या दगडाने प्रहार केला असता एखाद्या भांड्यावर दगड मारल्यासारखा आवाज (धातूनाद) येतो.

खांदेरी बेट सध्या भारतीय नौदलाच्या ताब्यात असून पर्यटकांना येथे पूर्वपरवानगीनेच जाता येते. वरसोली अथवा थळ बंदरातून होडी ठरवून स्थानिक कोळी बांधवांसोबत खांदेरीला जाणे सोयीस्कर. खांदेरी किल्ल्याचा तत्कालीन इतिहास थोडक्यात असा आहे... सागरी संरक्षणाचे महत्त्व ओळखून छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमाराची स्थापना केली. त्यांनी मुंबईकर इंग्रजांवर वचक बसविण्यासाठी मुंबईजवळील खांदेरी बेट ताब्यात घेऊन तेथे किल्ला बांधण्यास सुरुवात केली, तेव्हा इंग्रजांनी बांधकाम थांबविण्याचा प्रयत्न केला. १६७९ साली थळच्या किनाऱ्यावर उभयपक्षी अनेक लहान–मोठ्या चकमकी उडाल्या. शेवटी हे बेट इंग्रजांच्या ताब्यात गेले व १७८७ साली राघोजी आंग्रेंनी ताबा घेतला. त्यानंतर १८१४ साली खांदेरीचा ताबा दुसरे बाजीराव पेशवे यांच्याकडे गेला. पेशवाईच्या अस्ताबरोबर हा किल्ला १८१८ साली पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात गेला.

१६ ऑक्टोबर १९९३ रोजी खांदेरी बेटाचे नामकरण सरखेल कान्होजी आंग्रे द्वीप असे करण्यात आले.

यापैकी खांदेरी आणि उंदेरी हे खोल समुद्रात आहेत. तेथे जाण्यासाठी अलिबागपासून ८ कि.मी. अंतरावर असलेल्या थळा गावातून फेरी बोट व्यवस्था आहे.

# उंदेरी

(तालुका अलिबाग) खांदेरी बेटाशेजारीच साधारण पाऊण–एक कि.मी. अंतरावर उंदेरी बेट आहे. किल्ल्याची तटबंदी शाबूत आहे, पण पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. कोळ्यांच्या छोट्या होडीतून थळ किनाऱ्यावरून या किल्ल्यात जाता येते.

तत्कालीन इतिहासात महत्त्व होते ते उंदेरीपेक्षा खांदेरीलाच. खांदेरीवर हल्ले चढवत असतानाच, सिद्दी कासमने १६८० साली उंदेरी बेट ताब्यात घेऊन त्यावर किल्ला बांधला. १७६२ साली सखोजी आंग्रेंनी किल्ल्यावर कब्जा करण्याचा प्रयत्न केला. १७३६ मध्ये चिमाजीआप्पा व मानाजी आंग्रे यांच्या सिद्दीबरोबर झालेल्या लढाईत उंदेरीचा सुभेदार सिद्दी याकूब मारला गेला. पुढे मराठे व सिद्दी यांच्यात चकमकी होतच होत्या. १७५९ मध्ये नानासाहेब पेशवे व सरखेल आंग्रेंनी लढाई केली. १७६० मध्ये पेशवे यांचे आरमार सुभेदार नारो त्र्यंबक यांनी हा किल्ला जिंकून घेतला. १८४० नंतर मात्र उंदेरी कायमचा इंग्रजांच्या ताब्यात गेला.



# सागरगड

(तालुका अलिबाग) अलिबागपासून ७ किमी अंतरावर असलेल्या खंडाळे गावातून साधारण २ ते ३ किमी अंतरावरील डोंगरावर हा शिवकालीन किल्ला आहे. शिवाजी महाराजांनी सागरी किनारपट्टीचे रक्षण करण्यासाठी खांदेरी, कुलाबा, सर्जेकोट या किल्ल्यांची निर्मिती केली परंतु तोपर्यंत सागरकिनाऱ्यापासून ५ मैलावर असलेल्या सागरगडावरच अलिबाग पट्ट्यातील समुद्र किनाऱ्याच्या रक्षणाची भिस्त होती.

हा किल्ला समुद्रसपाटीपासून सुमारे १३५७ फूट उंचावर आहे. येथे जाण्याकरिता अलिबाग-पेण मार्गावरील खंडाळा गावातून रस्ता आहे. गावाच्या पूर्वेला डोंगर दिसतो. त्याच्या पाठीमागे सागरगड आहे. पायथ्यापर्यंत लहान वाहनाने जाता येते. चढण्यासाठी कच्ची पायवाट आणि पायऱ्या आहेत. मग खंडाळा गावातून पाऊलवाटेने गडावर जावे लागते. येथील उभट कडा म्हणजे गडाची भिंत आहे.

गडाचा दरवाजा उत्तरेस असून त्याला दोन बुरूज आहेत. गडाच्या निम्म्या उंचीवर सिद्धेश्वर नावाचे प्राचीन शंकराचे मंदिर आहे. तिथे राहण्याची सोय आहे. पावसाळ्याच्या दिवसात मंदिराजवळच दोन मनमोहक धबधबे वाहत असतात. सिद्धेश्वरपासून साधारणतः पाऊण ते एक तासात डोंगर व जंगलातून चालल्यानंतर सागरगड माची व गडावर येऊन पोहोचतो. माची व बालेकिल्ला अशा स्वरूपात गडाची रचना आहे. बालेकिल्ल्यावर एक लहानसे तळे, मंदिर, दीपमाळ तसेच पडक्या इमारतीचे अवशेष आहेत. गडावर एक बारमाही पाण्याचे कुंड आहे. शेजारी टेहळणी बुरूज होता. गडावर गणपती, मुंजाबा, खेरजाबाई व वेताळाची देवळे तसेच पाण्यासाठी तीन टाकी होती. गडाच्या टोकाला एक सुळका आहे. त्यास वानरटोक असे म्हटले जाते. मात्र सागरगडाकडे जाण्यासाठी सिद्धेश्वर मंदिराच्या पुढे सागरगड आदिवासी वाडी लागते. आपल्या माहितीसाठी व सुखरुप प्रवासासाठी वाटाड्या व माहीतगार सोबत घ्यावा. सागरगडावराच्या पठारावरून संपूर्ण अलिबागचं विहंगम दृश्य नजरेस पडतं. सागरी किनारपट्टीवर नजर ठेवण्यासाठी हा गड नेहमीच उपयुक्त ठरला असणार.





# कांगोरी (मंगळगड)

कांगोरी (तालुका पोलादपूर) या किल्ल्यास मंगळगड नावानेही ओळखले जाते. पोलादपूरच्या ईशान्येस १८ कि.मी. अंतरावर सह्याद्रीच्या उंच सुळक्यावर हा किल्ला आहे. हा किल्ला समुद्रसपाटीपासून ७७४ मी. उंचीवर आहे.

नैऋत्येकडील सडये व उत्तरेकडील पिंपळवाडी या गावातून गडावर जाण्यास वाटा आहेत. गडाचा पूर्वेकडील भाग उंचीने कमी व सपाट आहे. येथे कांगोरी देवीचे लहान देऊळ आहे. गड निसर्गतः संरक्षित असला तरी त्याला तटबंदी व बुरूज आहेत.

सन १६४८ मध्ये शिवाजी महाराजांनी काबीज केलेल्या सात किल्ल्यांमध्ये कांगोरीचा समावेश होता. सन १८१८ मध्ये रायगडचा पाडाव करून कर्नल प्रॉथरने कांगोरी गड काबीज केला.

# कोर्लई

(तालुका मुरूड) रेवदंडा गावासमोर रोहा खाडीच्या डाव्या किनाऱ्यावर कोर्लई हा जलदुर्ग आहे. याच्या दक्षिणेस कोर्लई किंवा कोर्लई हे गांव आहे. सन १५२१ मध्ये अहमदनगरच्या निजामशाहने कोर्लईचा अधिकारी दिओगु सिक्रेरा यास चौल गावास किल्ला बांधण्याची परवानगी दिली असता पोर्तुगिजांनी चौल – रेवदंडा खाडीच्या पलिकडील बाजूस असलेल्या कोर्लईच्या उत्तर किनाऱ्यावर पहिला मजबूत धक्का बांधला. नंतर हा धक्का पाडून टाकला. १७३९ मध्ये चिमाजी व पोर्तुगीज यांच्यामध्ये वसईचा तह झाल्यानंतर पहिला बाजीराव व पोर्तुगीज अधिकारी इंचबर्ड यांच्यातील वाटाघाटींनुसार १७४० मध्ये चौल, कोर्लई किल्ले पोर्तुगिजांकडून मराठ्यांना मिळाले. कोर्लईचा महत्त्वाचा जलदुर्ग पेशव्यांच्या हाती येताच त्याचा ताबा आंग्रेंकडे देण्यात आला. आंग्रेंनी तेथे तोफा उतरविण्याचा कारखाना काढला. मराठ्यांनी बुरुजांची नावे बदलली. सन १८१८ मध्ये पेशवाई समाप्त झाल्यावर कोर्लई दुर्गही इंग्रजांच्या ताब्यात दिला. किल्ल्यावरून मारा करण्यासाठी तटबंदीला गोळीबारासाठी ३०५ जंगी आहेत. किल्ल्यास एकूण ११ दरवाजे असून त्यापैकी ४ बाहेरील तटबंदीस व ७ आतील बाजूस आहेत. मुख्य प्रवेशद्वार उत्तरेस अजूनही सुस्थितीत आहे. त्यावर पोर्तुगीज भाषेतील शिलालेख आहेत. किल्ल्याच्या पश्चिम टोकाजवळ घोड्यांची पाग आहे. येथील बुरुजांवर तीन तोफा आहेत. किल्ल्यास प्रत्येकी दोन बुरुजांचे तीन दरवाजे आहेत. यानंतर लागणाऱ्या चौथ्या दरवाज्याच्या समोर एक खड्डा असून त्याच्या बांधीव दगडी भिंती दिसतात. त्यात पावसाचे पाणी साठविण्यासाठी हौद असावा.





# रेवदंडा आगरकोट

**(तालुका अलिबाग)** अलिबाग स्थानकापासून १७ कि.मी. अंतरावर दक्षिणेला तटबंदीच्या स्वरूपात रेवदंडा–आगरकोट किल्ला आहे. रेवदंडा हे गाव किल्ल्याच्या आत वसलेले आहे. १५५८ मध्ये या आगरकोटाची उभारणी कॅप्टन सोज यांनी केली. गावाबाहेरून फिरत गेलेल्या जवळपास ५–६ कि.मी. परिघाच्या तटबंदीवरून किल्ल्याची कल्पना येते. या तटबंदीखाली भुयारे आहेत. काही संशोधक साहसी वीरांनी या किल्ल्यावरील भुयारांचा अंतर्वेध घेतला. सातखणी बुरूज म्हणून ओळखला जाणारा भाग १५३४ मधील आहे. टप्प्याटप्प्याने हा किल्ला उभा करण्यात आला. इ. स. १७४० मध्ये हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला. नंतर १८०६ साली तो इंग्रजांनी हस्तगत केला. नंतर १८१७ मध्ये तो पुन्हा आंग्रे यांनी जिंकला व १८१८ मध्ये तो पुन्हा इंग्रजांच्या ताब्यात गेला.

# रेवदंडा टेन्ट्स

रेवदंड्याला निळ्याशार समुद्राच्या लाटांची गाज ऐकत कॅम्पिंगची मजा लुटणं हे आजकाल महत्त्वाचं आकर्षण आहे. मोकळ्या जागेत छोटासा तंबू उभा करून रात्रभर मुक्काम करता येतो. त्यासाठी संध्याकाळी चारपर्यंत पोहोचलं तर दुसऱ्या दिवशी सकाळी शाकाहारी न्याहारी करून अकरा वाजता निघताही येतं. रात्री गाणी, कॅम्प फायर, बार्बेक्यू यांची आस्वाद घेता येतो. अर्थात, या सर्व खासगी मालमत्ता आहेत. एक वेगळा अनुभव म्हणून या टेन्ट्मधला निवास लक्षात राहतो.



# जंजिरा

**(तालुका अलिबाग)** राजपुरी खाडीतील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी राजपुरी येथे जावे लागते. मुरूड ते राजपुरी हे अंतर जवळपास ५ कि.मी. आहे. राजपुरीच्या धक्क्यावरून शिडाच्या होडीतून किल्ल्यापर्यंत जाता येते.

किल्ल्याच्या दरवाजाच्या दोन्ही बाजूंना बुरूज आहेत. त्यावर एका सिंहाच्या पायाखाली चार, तोंडात एक व शेपटीत एक, असे सहा हत्ती पकडलेले शिल्प कोरलेले आहे. या मुख्य दरवाजातून आत गेले, की दुसरा दरवाजा लागतो. दरवाजाच्या जवळच पीरपंचायतन असून तेथील पटांगणात पीरमखानच्या जहाजाचे तीन नांगर पाहता येतील. येथून पुढे गेल्यावर एक मोठा गोड्या पाण्याचा तलाव दिसतो. तलावाजवळ खाशा सिद्दीची मशीद असून आजूबाजूला घरांचे पडके अवशेष दिसतात. बुरुजांच्या कमानीतील तोफा, बुरुजांचे बांधकाम, आतील कोठारे, तोफांच्या जंग्या, तटबंदी यांचे परीक्षण करून, पुढे दिसणाऱ्या सुरुलखानाच्या वाड्याकडे आल्यास, वाड्याच्या मागील बाजूस हिंदू शिल्पांचे अवशेष पाहता येतील.

दरवाजाजवळील दोन बुरूज धरून, किल्ल्याला एकूण २४ बुरूज आहेत. प्रत्येक बुरुजाला वेगवेगळी नावे आहेत. जंजिऱ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस नगारखान्याशेजारी असणाऱ्या तीन तोफा. कलालबांगडी, चावरी व लांडा कासम अशी या तोफांची नावे आहेत. किल्ल्याच्या तटावरून पश्चिमेकडे गेल्यास आणखी एक तलाव दिसतो. गडाच्या पश्चिमेकडे एक दरवाजा असून, त्याला दर्या दरवाजा म्हणतात.



**प्रवेशद्वाराच्या वरील बाजूस नगारखान्याशेजारी असलेल्या तीन तोफांना कलालबांगडी, चावरी व लांडा कासम अशी नावे आहेत.**



## तळागड

**(तालुका माणगांव)** तळा गावाच्या पश्चिमेस देवाच्या डोंगराच्या पूर्वेकडील तुटक शिखरावर हा किल्ला असून त्याच्या पायथ्याशीच तळा गांव आहे. मुंबई–गोवा हायवेवरील इंदापूरपासून २५ कि.मी. अंतरावर हे गांव आहे. गडाची समुद्रसपाटीपासूनची उंची साधारण २५६ मीटर आहे.

सुरुवातीला सर्व बाजूंनी चढण्यास सोपा वाटत असला तरी सुमारे सात मी. उंचीपासून पूर्व, दक्षिण व उत्तर बाजूंनी हा गड चढणे उंच व अवघड आहे. गडाची तटबंदी ओबडधोबड असून गडाच्या खालीस उत्तर बाजूस हनुमान दरवाजा आहे. त्यासमोर कातळावर हनुमान मूर्ती आहे. जवळच तळात खोदलेले टाके आहे. दरवाजाजवळ तसेच आग्नेय दिशेस टेहळणी बुरूज आहे. या दरवाज्यापासून दुसरा टेहळणी बुरूज सुरू होतो. पश्चिम तटबंदीस सदर कचेरी, धान्य साठवण्यासाठी गुहा, पाण्याची सहा टाकी, महादेवाचे देऊळ इत्यादी अवशेष आहेत. हा किल्ला राष्ट्रीय संरक्षित स्मारक आहे. १६४८ मध्ये शिवाजी महाराजांनी आदिलशाहीकडून तळागड काबीज केला. १८१८ मध्ये तो इंग्रजांच्या ताब्यात गेला.



## घोसाळगड

**(तालुका रोहा)** रोह्याच्या दक्षिणेस १० कि.मी. वर हा गड आहे. गडावर जाण्यासाठीची मुख्य वाट पायथ्याच्या घोसाळे गावातून असून दक्षिण व पूर्वेकडूनही वाटा आहेत. समुद्रसपाटीपासून गड २६० मी. उंच आहे. गडाच्या कोणत्याही बाजूने पाहिले तरी याचे ठळकपणे चार स्तर दिसतात. हे स्तर एकमेकांवर रचलेले आहेत. पहिल्याच स्तरात लहानसा चढ ६१ मी. दुसऱ्या स्तरात १२१ मी. अशी चढण असून तिसरी चढण ३० मी अगदी उभी व सरळ आहे. चौथा स्तर डोंगर माथ्याचा भाग आहे. गडाच्या उत्तरेस गवळीवाडा गांव असून तेथील दूध गडावर जात असे. म्हणून गावास गोशाळा असेही म्हणत. या शब्दाचा कालांतराने घोसाळा असा अपभ्रंश होऊन घोसाळगड असे नाव पडले असावे.

गडाचा आकार त्रिकोणी असून गडाचा दरवाजा उत्तरेकडे असावा. पडझड झाल्यामुळे त्याची दिशा नेमकी दिसत नाही. दरवाजातून वर आल्यानंतर पश्चिम व उत्तर व दक्षिणेस दुहेरी तटबंदी आहे. पश्चिम टोकाला बुरूज आहे. तटबंदीच्या भिंतीला गोळीबारासाठी जंगी आहेत. दक्षिण तटबंदीस चोर दरवाजा आहे. या ठिकाणी दगडात कोरलेली अंधार कोठडी होती. येथून पुढे पूर्वेकडे दुसरी चढण चढल्यानंतर गडाच्या दक्षिण बाजूला पायवाट आहे. येथे दगडात कोरलेली तीन टाकी आहेत. कडाच्या खाली पडझड झालेली नैसर्गिक गुहा आहे. तेथे आता भवानी देवीच्या किल्ल्याचे जोते शिल्लक आहे. दक्षिण बाजूच्या पूर्व टोकाला तटबंदीचे अवशेष, एक तोफ, पाण्याचा हौद, जोड इमारतीचे अवशेष त्याला लागूनच दारूचे कोठार दगडात कोरलेले पाण्याचे टाके इ. गोष्टी दिसतात. १६६५ च्या पुरंदर तहानुसार घोसाळगडाची मालकी शिवाजी महाराजांकडे राहिली. १८१८ मध्ये तो ब्रिटिशांच्या ताब्यात गेला.



# बीरवाडीचा किल्ला

**(तालुका महाड)** हा किल्ला रोहे–मुरूड रस्त्यावरील चणेरा गावाजवळ रोह्याच्या नैऋत्येस आहे. या किल्ल्याच्या पायथ्याशी बीरवाडी नावाचे गांव आहे. समुद्रसपाटीपासून २३४ मी. उंच असलेल्या या किल्ल्यावरील तटबंदी, प्रवेशद्वार व बुरूज पडक्या अवस्थेत आहेत. गडाचा पश्चिम भाग उंच असून पूर्वेकडील भागाला तटबंदी आहे.

डोंगराच्या पायथ्याशी पडलेल्या घडीव दगडांवरून दिसते की पूर्वी संपूर्ण डोंगरमाथ्याला तटबंदी असावी. पूर्व भागात उत्तराभिमुख दरवाजा असून त्याच्या जवळ चार बुरूज आहेत. या बुरुजांशिवाय तटबंदीस आणखी चार बुरूज आहेत. पूर्व बाजूकडील खालच्या भागात पाण्याची चार टाकी आहेत.

डोंगराच्या पायथ्याशी उद्ध्वस्त कबर आहे. महाड तालुक्यातील बीरवाडीपासून वेगळेपण दिसावे म्हणून पायथ्याच्या गावाला या कबरीवरून शेखची बीरवाडी हे नाव पडले. डोंगर उतारावर भवानी देवीचे जुने देऊळ आहे. सिद्दीपासून या भागाचे रक्षण व्हावे म्हणून तळागड आणि घोसाळगड जिंकल्यावर शिवाजी महाराजांनी बीरवाडीचा गड बांधला.



# लिंगाणा

(तालुका महाड) महाडच्या ईशान्येस रायगड व तोरणा यांच्या दरम्यान हा किल्ला आहे. जंजिऱ्याच्या सिद्दीपासून मध्य कोकण सुरक्षित राहावा म्हणून शिवाजी महाराजांनी या उंच सुळक्यावर किल्ला बांधला. १६६५च्या पुरंदर तहानुसार तो महाराजांकडे होता. परंतु १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने हा गड काबीज केला. या तटबंदी असलेल्या शिखराची चढण अतिशय अवघड आहे. त्यातच पायऱ्यांची नासधूस झाल्यामुळे सुळक्यांवर चढून जाणे अतिशय कठीण होते. माथ्यावर पाण्याची टाकी व गुहा आहेत. पेशवेकालीन तुरुंग म्हणून येथील गुहांचा वापर केला जाई. लिंगाणा हे संरक्षित राष्ट्रीय स्मारक आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे १०८ मी. उंचीवर असलेल्या या किल्ल्याच्या पायथ्याशी पाने नावाचे गांव आहे.





## सोनगड

महाडजवळ हा एक छोटा किल्ला आहे. महाडजवळ पाले लेणी ज्या डोंगरात आहेत, त्या डोंगराच्या माथ्यावर हा किल्ला आहे.





## भिवगड

(तालुका कर्जत) कर्जतच्या पूर्वेस आठ कि.मी. अंतरावर ढाक डोंगराच्या खाली असलेल्या एका शृंगावर हा गड असून पायथ्याशी गौरकामथ हे गांव आहे. कर्जतवरून कर्जत-जांभिवली या बसमार्गावरील गौरकामथ येथे उतरून किल्ल्यावर जाता येते. समुद्रसपाटीपासून २५१ मी. उंचीवर असलेल्या या किल्ल्याची सर्वत्र पडझड झालेली आहे. गडावर दगडात कोरलेली सात टाकी आहेत. त्यापैकी चार टाक्यांमध्ये चांगले पाणी असते.

## बिकटगड (पेब)

(तालुका पनवेल) समुद्रसपाटीपासून ४७४ मी. उंचीवरचा हा किल्ला माथेरानजवळ आहे. पायथ्याशी मालडुंगे गांव असून किल्ला पूर्णपणे भग्नावस्थेत आहे. नेरळहून या गडावर जाण्यासाठी मार्ग आहे.




## रतनगड (रत्नगड)

(तालुका पेण) पेणच्या आग्नेयेस मिऱ्या डोंगराशेजारील डोंगरावर रतनगड आहे. गडावर जाण्यासाठी उत्तरेकडून वाट आहे. पेण खोपोली रोडवरील कामार्ली येथून किल्ल्यावर जाता येते. समुद्रसपाटीपासून ४०० मीटर उंच असणाऱ्या या गडाची पूर्णपणे पडझड झालेली आहे. गडावर किल्ला असल्याची काहीही खूण शिल्लक नाही.

## माणिकगड

(तालुका पनवेल) समुद्रसपाटीपासून ५७२ मी उंचीवरील हा गड पनवेलच्या आग्नेयेस आहे. पनवेलहून वाशिवलीमार्गे वडगांव या पायथ्याच्या गावापर्यंत जाता येते, तर दुसरा मार्ग खोपोली पेण रस्त्यावरून वरसई घोटे या गावातून गडावर चढतो. हा गड आता भग्न अवस्थेत आहे. याच्या पायथ्याशी पूर्वी माणिकगड गांव होते.



## महेंद्रगड (चांभारगड)

महाड–रायगड रस्त्यावर महाडजवळच्या खिंडीशेजारी हा किल्ला आहे. समुद्रसपाटीपासून किल्ल्याची उंची जवळपास २३५ मी. आहे. गडमाथ्यावर काही भग्नावशेष, बुरूज व थोडीशी तटबंदी आहे.





## ईर्शाळगड

मुंबई-पुणे हायवेवरील चौल या गावाजवळ हा किल्ला आहे. ईर्शाळवाडी हे पायथ्याशी असलेले गांव आहे. समुद्रसपाटीपासून या गडाची उंची जवळपास ३७० मी. एवढी आहे.

## सोनगिरी (मिरगड)


(तालुका पेण) पेणच्या आग्नेयेस मिऱ्या डोंगराच्या फाट्यावर हा किल्ला आहे. या किल्ल्यावर जाण्यासाठी पेण नागोठणे रस्त्यावरील पाबळ फाट्यावर उतरून कोंढणी गावापर्यंत जावे लागते. सोनगिरीच्या दक्षिण पायथ्याशी कोंढणी गांव आहे. या किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची जवळपास ३३५ मीटर आहे.

हा किल्ला बाबुराव पाशिलकरने बांधला आणि सोनाबाई देवीच्या नावावरून त्यास नाव दिले असावे अशी समजूत आहे.



## चंद्रगड (ढवळ्या)

(तालुका पोलादपूर) पोलादपूरपासून २२ कि.मी. अंतरावरील ढवळे गावाला खेटून ढवळी नदीकाठी हा किल्ला आहे. हा किल्ला सह्याद्रीच्या पश्चिम उतारावरील एका सुळक्यावर आहे. हा किल्ला दौलतराव चंद्रराव मोरे याने बांधला होता. कृष्णेच्या खोऱ्याच्या माथ्यावरून ढवळे गावाजवळ पायवाट जेथे उतरते तेथून या गडाचा चढ आहे. किल्ल्याची समुद्रसपाटीपासूनची उंची सुमारे ७०२ मीटर आहे.





## ढाक

(तालुका कर्जत) ढाक हे डोंगरी गांव कर्जत–गौरकामथ रस्त्यावरील वदप गावाच्या आग्नेयेस सह्याद्रीच्या एका अवघड शृंगावर आहे. सह्याद्री डोंगररांगेतील ८८३ मी. उंचीच्या गोलाकार टेकडीवर हा किल्ला आहे. थोड्या तटबंदीव्यतिरिक्त गडावर विशेष असे काहीही अवशेष शिल्लक नाहीत. या टेकडीच्या नैऋत्येकडील भागात काही दुर्गम लेणी आहेत.

## सरसगड

(तालुका सुधागड) पालीच्या पूर्वेस १ कि.मी. दक्षिणोत्तर पसरलेल्या डोंगरावर किल्ला असून दक्षिण व उत्तर बाजूंनी वाटा आहेत. उत्तरेकडील वाटेवर कड्याच्या खाली काही ठिकाणी खडकात खोदलेले भुयार आहे. या जलदुर्गाच्या ठिकाणी सागराचे सान्निध्य व परिसराची उंची यामुळे वातावरण अतिशय आल्हाददायक असते. या भागात कड्याला अनेक गुहा व टाकी आहेत. काही गुहांमध्ये दगडी खांब आहेत. वरच्या बाजूला जाण्याचा मार्ग अवघड आहे. माथ्यावर शाहपीर नामक दर्गा, बांधीव तळे व त्याच्या काठी योगेश्वरीचे देऊळ व शंकराचे पडके देऊळ आहे. गडाच्या खालच्या भागात दक्षिणेस खोल दरी आहे. कड्याला लागून कमानदार दरवाजा व दोन मोठे बुरूज आहेत. आतील बाजूस रक्षकांसाठी खोल्या आहेत. येथून खाली उतरण्यासाठी खडकात खोदलेल्या पायऱ्या असून उतरण एकदम सरळ आहे. बालेकिल्ल्याच्या पायथ्याभोवती डोंगरात मोठ्या कोठ्या असून त्यात शिबंदी, धान्य कोठार व लढाईचे सामान ठेवले जाई. उत्तर बाजूस अनेक टाकी आहेत. अलिबाग रस्त्याच्या बाजूने गडाच्या पायथ्याशी असलेली अतिशय कठीण पायवाट येथील धबधब्याच्या मागील पोकळी मध्ये जाते. येथील उभट कड्याचा उपयोग गडाची भिंत म्हणून केला आहे.

सरसगडाजवळील जांभूळपाडा गावातून उंबरखिंडीकडे रस्ता जातो. कोणताही रक्तपात न होऊ देता हजारोंच्या मुघल सैन्याला आपल्या युद्धकौशल्याने छत्रपती शिवाजी महाराजांनी उंबरखिंडीत शरण आणले तो दिवस आजही साजरा केला जातो. त्याची आठवण म्हणून येथे एक स्मारक आहे.

## पेठचा किल्ला

कर्जतच्या ईशान्येस २२ कि.मी. अंतरावर हा किल्ला आहे. या किल्ल्याच्या पायथ्याशी असलेले पेठ हे गांव मुळात बऱ्याच उंचीवर असल्याने यास पेठचा किल्ला असे म्हणतात. गावातून किल्ल्याच्या सुळक्यापर्यंतचा चढ तसा कमी आहे. किल्ल्याच्या माथ्यावर काही अवशेष व पाण्याचे टाके आहे.






# सूरगड

(तालुका रोहा) हा किल्ला रोह्याच्या पूर्वेस १३ कि.मी. अंतरावर असून किल्ल्याच्या पायथ्याशी वैजनाथ नावाचे गांव आहे. किल्ला उत्तर–दक्षिण लांब असून पूर्व–पश्चिम रुंदी फार कमी आहे. डोंगराच्या सर्व बाजू व माथ्यावरील भागांवर कातळ असल्यामुळे फार थोडी झाडी आहे. चोहोबाजूस डोंगराचे कडे तुटलेले आहेत. त्यामुळे फार थोड्या ठिकाणी तटबंदी आहे.

दोन डोंगराच्या कड्यांमधील घळीतून वर जाण्याचा मार्ग आहे. काही ठिकाणी कातळात पायऱ्या खोदल्या आहेत. पूर्वी या घळीत पायऱ्यांची वाट होती. माथ्यावर दक्षिण बाजूस मारुतीचे पडके देऊळ व लहान तळे आहे. येथून उत्तरेकडे जाताना इमारतीचे अवशेष आढळतात. पूर्वी ही अंधारकोठडी होती. तिच्या पश्चिमेस दोन भागांचे पाण्याचे टाके आहे. पूर्वेस पीराचा दर्गा होता. येथून पुढे उत्तरेकडे जाताना पाच टाक्यांचा समूह आहे. या टाक्यांच्या उत्तर बाजूकडे सदर होती. आणखी उत्तरेकडे डोंगराचा सुमारे ६३ मी. रुंदीचा खोलगट भाग आहे. या भागात कड्याजवळ टाके आहे. खोलगट भागानंतर उत्तर बाजू उंच असून तेथे बुरूज आहे. बुरुजापासून डोंगराच्या उत्तरेकडील शेवटच्या भागापर्यंत तटबंदी असून ठिकठिकाणी बुरूज आहेत. आग्नेय बाजूकडील बुरुजाच्या पायथ्याशी एक दगड पडलेला असून त्यावर अरबी व देवनागरी लिपीतील लेख आहे. हा शिलालेख पूर्वी भिंतीत बसवला असावा. या शिलालेखानुसार सिद्दी नवाबाच्या राजवटीच्या दुसऱ्या वर्षी हा किल्ला बांधला. त्याचा वास्तुशास्त्रज्ञ नूरयाजी होता व गडाचा हवालदार तुकोजी हैबत होता. फेब्रुवारी १८१८ मध्ये कर्नल प्रॉथरने अवचित गडासह सूरगडाचा पाडाव केला.



# समुद्रकिनारे







# पीरवाडी सागरकिनारा

(नवी मुंबई) मुंबईपासून अगदी हाकेच्या अंतरावर असलेले उरण म्हणजे रायगड जिल्ह्याचे उत्तरेकडील टोक. धरमतर खाडीचे सान्निध्य लाभलेले उरण हे मुळात मच्छिमार बांधवांचे गांव. इथल्या लोकजीवनावर आगरी आणि कोळी संस्कृतीचा प्रभाव जास्त आढळतो. किनाऱ्यावर माडापोफळीची बने असलेल्या मुंबईनजिकच्या काही मोजक्याच बीचेसमध्ये उरणच्या नागांव येथील पीरवाडी या बीचचा समावेश होतो. बीचकडे जाताना किनारी असलेल्या झाडांच्या फटींमधून दिसणारा आभाळाचा तुकडा आणि सूर्यास्ताच्या बिंबाच्या पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या झाडांच्या गडद छायांमुळे दिसणाऱ्या निसर्गाच्या अद्‌भुत रंगछटा टिपण्यासाठी पर्यटकांची गर्दी असते.





# अलिबाग सागरकिनारा

**(तालुका अलिबाग)** अलिबाग एस.टी. स्थानकापासून सुमारे एक किमी अंतरावर पश्चिमेस, साधारण ४-५ किमी. लांबीचा वालुकामय किनारा आहे. अलिबाग शहरातून बालाजी नाक्याकडून थेट पश्चिमेला किनाऱ्याकडे जाणारा रस्ताही तितकाच स्वच्छ व हवेशीर. किनाऱ्यावर पोहोचल्यावर ऐतिहासिक कुलाबा किल्ल्याचे दर्शन होईल.

किनाऱ्यावरील सुरुची उंच उंच झाडे, त्यांना साथ देणारी नारळाच्या झाडांची शोभा येथले सौंदर्य खुलवते. किनाऱ्यावरील खासगी व सरकारी बंगल्यांमुळे हा किनारा उठून दिसतो. सूर्यास्ताच्या वेळी हा किनारा विविध रंगछटांनी चितारलेला भासतो. अलिबाग एक सुंदर पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्धीस आल्यापासून अलिबाग बीचवर नेहमी प्रवाशांची वर्दळ असते. जरी वर्दळ असली, तरी आवाजाचे प्रदूषण नाही. म्हणूनच हा बीच म्हणजे अलिबागचे एक वैशिष्ट्य आहे. या किनाऱ्यावर वॉटर स्पोर्ट्सची सुविधा उपलब्ध आहे.

## वॉटर स्पोर्ट्स

दूरवर पसरलेला अथांग समुद्र आणि त्यातून एक बोट स्पीडने जातेय... त्या बोटीसोबत आहे सी कायकिंग करणारा एखादा पर्यटक, किंवा मग समुद्रात फिरणाऱ्या मोटारसायकलच्या पाठीमागे बनाना राइड घेत जाणाऱ्या काही व्यक्ती. अलिबाग येथील जवळपास सर्वच समुद्र किनाऱ्यांवर असे वॉटर स्पोर्ट्स पाहायला मिळतात. नागांव हे यातील सर्वात नावाजलेलं ठिकाण आणि त्याखालोखाल मांडवा. या वॉटर स्पोर्ट्समध्ये जॉय राइड्स, पॅरासेलिंग, काइट सर्फिंग, वेक बोर्डिंग, सी कयाकिंग इत्यादींचा आनंद लुटता येतो. मुरुड जंजिरा इथे स्कुबा डायव्हिंगचीही सोयही करण्यात आली आहे. पाण्याखालची ही दुनिया पाहणं हा एक आनंददायी अनुभव ठरतो.

## होम स्टे

होम स्टे ही संकल्पना भारतीयांना आता नवी राहिली नाही. पर्यटकांनी तिथल्याच गावातील रहिवाशांच्या घरी मुक्कामाला थांबायचं आणि सहलीचा आनंद घ्यायचा अशी ही संकल्पना आहे. रायगड इथल्या समुद्रकिनाऱ्याजवळील बहुतांश गावांमध्ये होम स्टेची संकल्पना प्रत्यक्षात साकारताना दिसते. या गावकऱ्यांनी आपल्या घरांमध्ये पर्यटकांसाठी उपयुक्त बदल केले आहेत. हे पर्यटक गावकऱ्यांसाठी उत्पन्नाचे कारण ठरतात. त्याचप्रमाणे पर्यटकांना गावरान वातावरणाचा प्रत्यक्ष आनंद अनुभवता येतो, त्या ठिकाणच्या खाद्यसंस्कृतीचा आस्वादही घेता येतो. इथं राहाणं वाजवी, परवडणारं असतं.







वॉटर स्पोर्ट्स







## वरसोली सागरकिनारा

**(तालुका अलिबाग)** अलिबागला एस.टी. स्थानकावरून बी.व्ही.एम. मल्टीप्लेक्सला वळसा घालून जो रस्ता जातो, तो थेट वरसोली गावात. ७-८ हजार वस्तीच्या सुंदर, सदाबहार, नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या वरसोली गावाचा समुद्रकिनाराही तितकाच विलोभनीय आहे. नारळ-पोफळीच्या बागांनी बहरलेला, सुरुच्या बनांनी नटलेला हा किनारा पर्यटकांना अतिशय आवडणारा आहे. या किनाऱ्यावर वॉटरस्पोर्ट्सचे विविध पर्याय उपलब्ध आहेत.

अलिबाग बस स्थानकावरून साधारणपणे ४ ते ५ किमी अंतरावर मानवी गजबजाटापासून दूर, शांत व रम्य असा हा समुद्रकिनारा आहे. वरसोली खाडीपासून थळ बंदरापर्यंत पसरलेला ३ किमी लांबीचा हा किनारा सुरु तसेच केवड्याच्या बनांनी नटलेला आहे.

## थळ किहीम सागरकिनारा

**(तालुका अलिबाग)** अलिबागपासून १२ किमी. अंतरावर असलेला किहीमचा रम्य किनारा निसर्गप्रेमींना साद घालतो. अलिबाग-रेवस रस्त्यावरील चोंढी-किहीम फाट्यावर उतरल्यावर, पश्चिमेकडे जाणारा रस्ता किहीम गावातून समुद्रकिनारी जातो. नारळी-पोफळींच्या दाट बागा आणि आकाशाला गवसणी घालणारी सुरुची झाडे किनाऱ्याची शोभा वाढवतात. येथील स्वच्छ, नितळ, अथांग सागर पर्यटकांना आकर्षित करतो.

ओहोटीच्या वेळी किहीमचा समुद्रकिनारा खडकाळ दिसत असला तरी हे पूर्वीच्या फिश फार्मिंगचे उत्तम उदाहरण आहे. पूर्वी किनाऱ्यावरील दगडांचा उपयोग करून बंधारे येऊन गेल्यानंतर या बंधाऱ्यांमध्ये अडकलेले मासे पकडण्यात येत असत. आजही काही घरांच्या नावाचे राखीव खडक किनाऱ्यावर आहेत. किहीम गावात अनेक ठिकाणी घरगुती राहण्याची तसेच भोजनाची व्यवस्था होते. या किनाऱ्यावर वॉटर स्पोर्ट्सची सुविधा उपलब्ध आहे.

या सर्वांपेक्षा अतिशय महत्त्वाचे असे एक वैशिष्ट्य म्हणजे श्रावण महिन्यात नारळी पौर्णिमेला समुद्रातून अचानक एक शंकराची दगडी पिंड वरती येते. हा निसर्गाचा चमत्कार अनेक वर्षांपासून चालू असून त्याच्या दर्शनासाठी दूरदूरहून माणसे श्रद्धेने येतात. त्याबद्दलचे कुतूहल संपतच नाही, उलट पुढील वर्षी येण्याचा संकल्प सोडतात.





# आक्षी सागरकिनारा

**(तालुका अलिबाग)** आक्षी–नागांव आणि रेवदंडा हा सदाहरित व नारळी पोफळीच्या बनांचा पट्टा अलिबागच्या दक्षिणेला सुमारे ५ कि.मी. वर वसलेला आहे. आक्षी या गावात साखरखाडीजवळ १.२ हेक्टर क्षेत्रफळाचा एक जुना तलाव आहे. गावात कालिका देवी व सोमेश्वर महादेवाची जुनी देवळे आहे. येथे कोकण शिलाहार वंशीय नृपती केशीदेवराय यादव रामचंद्र देव यांचे शिलालेख सापडले आहेत. या दोन्ही शिलालेखांवर चंद्र व सूर्याची प्रतिमा आहे. स्वच्छ समुद्रकिनारा, पांढरी वाळू आणि सुरुच्या दाट बनांनी आच्छादलेला आक्षीचा समुद्रकिनारा हे अलिबागमधील एक लोकप्रिय पर्यटनस्थळ आहे. अनेक पक्षीनिरीक्षकही येथे आवर्जून भेट देत असतात.


पक्षीनिरीक्षकांसाठी स्वर्ग





# नागांव होमस्टे आणि वॉटर स्पोर्ट्स

**(तालुका अलिबाग)** अलिबागच्या ईशान्येस सुमारे सात किमीवर नागांव समुद्रकिनारा आहे. किनाऱ्यास लागून ग्रामपंचायतीने सुरुच्या झाडांची लागवड केली आहे. वाळूवर चालणाऱ्या क्वाड बाइक राइड, बनाना राइड, पॅरासिलिंग, जेटस्की बाइक्स तसंच पाण्यावरचं स्लिपर राइड, अशा स्पीड बोटने करण्यात येणाऱ्या खेळांची इथे रेलचेल पाहायला मिळते.

इथल्या घरगुती जेवणाचा आणि आदरातिथ्याचा अनुभव घ्यायचा असेल तर इथे होमस्टेचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत. यात पर्यटकांना तात्पुरत्या निवासासाठी एखाद्या घराची निवड करता येते. एक किंवा दोन दिवसांसाठी हे होम स्टे खूप किफायतशीर ठरतात. गावात राहिल्याचा अनुभव घेता येत असल्याने हे होम स्टे तिथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये विशेष प्रसिद्ध आहेत. काही ठिकाणी रात्रीचं कॅम्प फायरही आयोजित केलं जातं.

# काशिद सागरकिनारा

(तालुका मुरुड) मुरूडच्या उत्तरेस जवळपास १८ कि.मी. अंतरावर गोव्यामधील बीचची आठवण करून देणारा, रुपेरी वाळूचा स्वच्छ सुंदर काशिदचा समुद्रकिनारा विदेशी पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे. काशिदच्या किनाऱ्यावरील सुरूच्या बागांमधून विश्रांतीस थांबलेल्या पर्यटकांची गर्दी दिसून येते. शेकडो पर्यटक इथे समुद्रस्नानासाठी जमतात. जाहिराती, टी.व्ही. सिरीयल व सिनेमांचे शूटिंग येथे सातत्याने होत असते. समुद्रकिनारी छोट्या स्टॉलपासून परिपूर्ण सुविधा असणारी हॉटेल्स, रिसॉर्ट्स यामुळे 'काशिद बीच' पर्यटकांचे मोठे आकर्षण बनला आहे. या बीचवर वॉटर स्पोर्ट्सचे अनेक पर्याय उपलब्ध आहेत.





YAMAHA


# श्रीवर्धनचा समुद्रकिनारा

(तालुका श्रीवर्धन) श्रीवर्धनच्या उत्तरेस तांबडी डोंगर असून, या डोंगरावरून पूर्वी गावाचा आकार श्री सारखा दिसत असल्याने, या गावास श्रीवर्धन असे नाव पडल्याचे सांगितले जाते. गावाचा विस्तार साधारणपणे चार-साडेचार चौकिमी असून गावातील बहुतेक रस्ते समांतर वा एकमेकांना काटकोनात मिळणारे असे आहेत. श्रीवर्धन हे गांव रोठा सुपारीसाठी प्रसिद्ध असून, तेथे सोमजाईचे जागृत मंदिर, श्री लक्ष्मीनारायण मंदिर, कुसुमादेवी मंदिर, जीवनेश्वर मंदिर, पेशव्यांच्या घराजवळील पेशवे स्मारक तसेच सुरुच्या बनांनी नटलेला तीन कि.मी. लांबीचा स्वच्छ, सुंदर किनारा अशी अनेक प्रेक्षणीय स्थळे आहेत. हरिहरेश्वर व दिवेआगर या लोकप्रिय पर्यटनस्थळांना जाण्यासाठी श्रीवर्धन हे गांव मध्यवर्ती असून येथे राहण्याच्या तसेच जेवणाच्या उत्तम सोयी आहेत.

श्रीवर्धन एस.टी. डेपोपासून पश्चिमेकडे जवळपास दोन कि.मी. अंतरावर नारळीपोफळींच्या बागांतून पुढे गेले की अथांग सागराचे दर्शन होते. श्रीवर्धनला जवळपास तीन कि.मी. लांबीचा स्वच्छ, सुंदर, प्रदूषणमुक्त समुद्रकिनारा लाभला आहे. रुपेरी चंदेरी वाळूच्या या किनाऱ्यावर सुरुंचे हिरवेगार बन असून उजवीकडे जीवना बंदर तर डावीकडे श्रीवर्धनची खाडी आहे. सायंकाळी येथून दिसणारा सूर्यास्ताचा देखावा अवर्णनीय असून तो प्रत्येकाने अनुभवावा, असाच आहे.







# दिवेआगर

(तालुका श्रीवर्धन) रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर हे नारळीपोफळीच्या बागांचे आखीवरेखीव गांव. निसर्गाची हिरवी श्रीमंती या भागाला भरभरून लाभली असून, या गावाला जवळपास पाच कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. येथील वातावरणही खूप आल्हाददायक आहे. सध्या हे एक उत्तम पर्यटनस्थळ म्हणून नावारूपास आले आहे. त्यामुळे येथे राहण्या–जेवणाच्या सोयी अगदी घरगुती ते थेट रिसॉर्टपर्यंत उपलब्ध आहेत.

दिवेआगर या गावाला जवळपास हजार–एक वर्षाचा इतिहास आहे. या गावात सहाव्या शतकांपासूनचे ताम्रपट सापडले आहेत.





दिवेआगर
किनाऱ्यावरील
सुरूची बाग

# मुरूड समुद्रकिनारा

(तालुका मुरूड) हिरवीगार वनराई, अथांग निळाशार अरबी समुद्र, रुपेरी चंदेरी वाळू, नारळी-पोफळीच्या बागांना लागून असलेला मुरूडचा समुद्रकिनारा खूपच लक्षवेधी आहे. नवाबाच्या राजवाड्यापुढील वळणावर रात्रीच्या वेळी प्रवेश करताना समुद्रकिनारी असलेल्या दिव्यांच्या सोनेरी रोषणाईमुळे तीन डोंगरांच्या कवेतील मुरूडचा किनारा रात्रीच्या काळोखातही सुंदर भासतो.

सकाळच्या कोवळ्या किरणांमध्ये चमकणारी वाळू, निळेशार पाणी यामुळे सुमारे अडीच कि.मी. लांबीचा हा किनारा पर्यटकांना मोहून टाकतो. समुद्रस्नानासाठी इतका उत्तम व सुरक्षित किनारा शोधूनही सापडणार नाही. गोव्यापर्यंत पाहिल्यास असे नैसर्गिक सौंदर्य क्वचितच एखाद्या सागरतटास लाभलेले दिसेल. म्हणूनच हा समुद्रकिनारा पर्यटकांचे मुख्य आकर्षण आहे.





मुरूड येथे नाताळ सुट्टीत पर्यटकांची सुक्या मासळीची मागणी वाढते. म्हणून कोळी महिला खारवलेली मासळी साठवून ठेवतात. ही मासळी टिकाऊ आणि चवीसाठी चांगली असते.

मुरूड किनाऱ्यावरील नवाबी राजवाड्याजवळ आलेले परदेशी पाहुणे– सीगल पक्षी.



मुरूड राजपुरी येथील जंजिरा पर्यटन संस्था व फ्रेंड्स ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने शिडाच्या बोटीची स्पर्धा आयोजित केली जाते. दररोज जंजिरा किल्ल्यात पर्यटकांना सोडणारे बोटवाले विरंगुळा म्हणून दिघी खाडीत ह्या स्पर्धा घेतात. स्पर्धा पाहण्यासाठी पर्यटकांची झुंबड उडते.





जलदुर्ग जंजिरा मुरूडच्या किनाऱ्यावरून





# हरिहरेश्वरचा समुद्रकिनारा

(तालुका श्रीवर्धन) हरिहरेश्वर हे धार्मिक क्षेत्र असून या स्थळाच्या पार्श्वभूमीवरील अनोख्या सागर किनाऱ्याला पर्यटनस्थळाचा दर्जा प्राप्त झाला आहे. पांढऱ्या मऊसूत वाळूच्या या किनाऱ्याबरोबर परिक्रमा मार्गावरील खडकाळ किनाराही या परिसरात आहे.

रायगड जिल्ह्याच्या सीमेवर वसलेले हरिहरेश्वर म्हणजे रायगड जिल्ह्याचे दक्षिणेकडील शेवटचे टोक. एका बाजूला बाणकोटची खाडी, तर दुसऱ्या बाजूला अरबी समुद्र व त्यात घुसलेली गोलाकार टेकडी म्हणजेच श्री क्षेत्र हरिहरेश्वर. श्रीवर्धनपासून आवघ्या १९ कि.मी. अंतरावरील या क्षेत्राला दक्षिणकाशी असेही म्हटले जाते. स्कंदपुराणातील सह्याद्री खंडात या तीर्थस्थानाचे माहात्म्य वर्णन केले आहे.


हरिहरेश्वरला सुंदर सागरकिनारा लाभला असून, किनाऱ्यालगत श्री हरिहरेश्वर व काळभैरव अशी दोन मंदिरे एकमेकांलगत उभी आहेत. या तीर्थक्षेत्रावर अगदी प्राचीन काळापासून लोकांची अफाट श्रद्धा आहे. श्रीवर्धनच्या भट पेशवे घरण्याचे श्री हरिहरेश्वर हे कुलदैवत आहे. श्री हरिहरेश्वराचे स्थान पुरातन असले, तरी आज अस्तित्वात असलेले हे मंदिर पेशवेकालीन मानले जाते. इ.स. १७२३ मध्ये पेशव्यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. या जीर्णोद्धाराचा उल्लेख आजमितीस श्री काळभैरव मंदिराच्या प्रवेशद्वारावर आहे.

या तीर्थक्षेत्राला छत्रपती शिवाजी महाराज, समर्थ रामदास, छत्रपती संभाजी राजे, कान्होजी आंग्रे तसेच पेशवे घराण्यातील अनेक व्यक्तींनी भेट दिल्याच्या इतिहासात नोंदी आहेत. अशा या निसर्गरम्य धार्मिक क्षेत्राला महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पर्यटन क्षेत्राचा दर्जा दिला असून, मंडळातर्फे तंबू निवासाची सोय या ठिकाणी करण्यात आली आहे.



# धबधबे व गिरिस्थाने







# माथेरान

**(तालुका कर्जत)** १८५० च्या सुमारास मुंबई शासन फौजेसाठी उन्हाळी आरोग्यधामाच्या शोधात होते. त्या शोधाचा एक भाग म्हणून ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी एचपी मॅलेट यांनी माथेरानचे सर्वेक्षण केले. माथेरानला हिलस्टेशनचे रूप देण्याचे श्रेय मॅलेट साहेबांना द्यायला हवे. त्याने तेथील निरनिराळ्या पॉईंटवर जाण्याच्या वाटा मोकळ्या केल्या. १८५१ मध्ये माथेरानला 'बाईक' नावाचा एक दगडी बंगला बांधला. सन १८५२ मध्ये रामबाग मार्गे चौक ते माथेरान रस्ता पायी चढण्यायोग्य केला. याच सुमारास कॅप्टन डे व कॅप्टन पाँसॉनबिन यांनी माथेरानचा नकाशा तयार केला.

१८५५ ते १८५८ च्या दरम्यान मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड एल्फिन्स्टन यांनी माथेरानच्या विकासासाठी खूप प्रयत्न केले. निरनिराळ्या पॉइंट्सना जाणारे रस्ते त्यांच्याच मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आले. सन १८५५ मध्ये त्यांनी माथेरानला पहिला दवाखाना बांधला. त्यांनी आपले निवासस्थानही महाबळेश्वरवरून माथेरानला हलवले. बरेच शासकीय निर्णय माथेरानहून घेतले जात व या ठिकाणाला छोट्या राजधानीचे स्वरूप आले. छोडो भारत आंदोलनातही माथेरान अग्रेसर होते. येथील विठ्ठल लक्ष्मण कोतवाल ऊर्फ भाई कोतवाल १९४२ च्या छोडो भारत आंदोलनात पोलिसांद्वारा २ जानेवारी १९४३ ला सिद्धगडावर पोलिसांद्वारे मारले जाऊन हुतात्मा झाले. सिद्धगड पायथ्याशी त्यांचे स्मारक आहे. नवरोजी लॉर्ड गार्डमध्येही त्यांचा अर्धपुतळा उभारण्यात आला आहे.





PATEL'S
KITCHEN



# नेरळ–माथेरान रेल्वे

१५ एप्रिल १९०७ रोजी सुरू झालेली ही रेल्वे सुरू करण्याचे श्रेय मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी सर आदमजी पीरभॉय यांना जाते. या रेल्वे उभारणीमागेही एका घटनेची पार्श्वभूमी आहे. १९०० च्या सुमारास आदमजी माथेरानला जाण्यासाठी मुंबईहून नेरळला आले. येता येता संध्याकाळ उलटून गेली. तेव्हा नेरळचे सर्व भाडोत्री घोडे, रिक्षा व पालख्या आधीच निघून गेल्यामुळे त्यांच्यासमोर पायी चढण्याशिवाय मार्ग उरला नाही. शेवटी त्यांना मुंबईला परत जावे लागले ते माथेरानला रेल्वे नेण्याची प्रतिज्ञा करूनच!
अतिशय कठीण चढ असलेल्या या रेल्वेमार्गाचा प्रवास पर्यटकांसाठी निसर्गसौंदर्याची एक पर्वणीच असते.



दस्तुरी पॉइंटकडे
जाणारा नागमोडी रस्ता








माउंट बॅरी व गव्हर्नर हिल या जुळ्या टेकड्या आहेत. गव्हर्नर हिल विस्ताराने मोठी व उंच आहे. येथे दस्तुरी नाक्यापासून जावे लागते. गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टनच्या नावावरून गव्हर्नर हिल आणि माथेरानचा सुपरिंटेंडंट ॲन्ड्र्यू बॅरीच्या नावावरून माउंट बॅरी ही नावे या टेकड्यांना दिली गेली. माउंट बॅरीवरील मैदान बिलिअर्ड लँडप्रमाणे दिसते. तेथून नेरळचा विशाल प्रदेश दृष्टिपथात येतो. माउंट बॅरीवरून नेरळ–माथेरान रेल्वे घोड्याच्या नालेप्रमाणे दिसते.

माथेरान येथे पॅनोरमा पॉइंट, कॉरबेट पॉइंट, दस्तुरी, माउंट बॅरी व गव्हर्नर हिल, सिम्प्सन लेक, हार्ट पॉइंट, मंकी पॉइंट, मॅलेट स्प्रिंग, आर्थर पॉइंट, लुईसा पॉइंट, हनिमून पॉइंट, शार्लोट लेक, अलेक्झांडर पॉइंट, वन ट्री हिल, बर्ड वूल पॉइंट इत्यादी नितांतसुंदर स्थळे आहेत. याशिवाय पिसरनाथ मंदिर, शिव मंदिर, राम मंदिर, सेंट पॉल चर्च, रोमन कॅथलिक चर्च इत्यादी धार्मिक स्थळे आहेत.






वन ट्री हिल पॉइंट

**पिसरनाथ मंदिर** : शार्लोटच्या ५० मीटर दक्षिणेस पिसरनाथ मंदिर आहे. जॉर्ज बर्डवुडच्या मते पशुनाथावरून पिशरनाथ, पिसरनाथ असे नाव पडले असावे. पिसरनाथ हे माथेरानचे ग्रामदैवत आहे. सन १९२९ पर्यंत पिसरनाथ मंदिराच्या ठिकाणी साधा चबुतरा होता. त्याच वर्षी भाविकांनी हे मंदिर बांधले.






सेंट पॉल चर्च



शार्लोट लेक



**शार्लोट लेक** : या तलावास मुंबई प्रांताचा गव्हर्नर लॉर्ड एलफिन्स्टनची पत्नी शार्लोट हिचे नाव देण्यात आले. एलफिन्स्टन दूरदर्शी होता. त्याने पाणीपुरवठ्यासाठी कायम धरण बांधण्याच्या कामास १८५५ मध्ये प्रारंभ केला. ते १८५८ पर्यंत सुरू होते. परंतु १८५८ मध्ये अतिवृष्टीमुळे तलावास मिळणाऱ्या मुख्य झऱ्याचे तोंड बुजले व हे बांधकाम बंद पडले. आताचा शार्लोट तलाव हा मूळ तलावाच्या बराच पुढे बांधण्यात आला आहे. १८६० पर्यंत या तलावास तीन बांध घालण्यात आले होते. चौथा बांध १८६६ मध्ये घालण्यात आला. सन १९५० मध्ये तलावाच्या रुंदीकरणाचे काम पुन्हा हाती घेण्यात येऊन ते १९५६ मध्ये पूर्ण झाले.



हनिमून पॉइंट

# सवतकडा धबधबा

**(तालुका अलिबाग)** मुरूड शहराजवळ गारंबी धरणाकडे जाताना शिघ्रे गाव लागते. या गावातून सायगांवमार्गे सवतकडा धबधब्यावर जाता येते. धबधब्यापर्यंत गाडी जाऊ शकत नाही. पायवाटेने डोंगर व शेतातून वनश्रीचा आनंद घेत चालत अर्ध्या तासात धबधब्यापर्यंत पोहोचता येते. पावसाळ्यात हा जलप्रपात इतका प्रचंड असतो, की थेट पाण्याखाली जाणे अशक्यच. तरीही हिवाळ्यापर्यंत धबधब्याचा आनंद घेता येतो. जानेवारीनंतर मात्र पाण्याचा स्रोत आटून धारा बारीक होतात.





## सिद्धेश्वर धबधबा

**(तालुका अलिबाग)** अलिबागला जर सागरगड किल्ल्याला भेट दिली तर तिथे पोहोचण्यासाठी आपल्याला खंडाळे गावातून एक पायवाट तिथे घेऊन जाते. ही उभी चढण आहे. साधारण अर्धा तास ही चढण चढल्यावर आपल्याला २ वाटा लागतात. त्यातील उजव्या हाताच्या वाटेने चालत गेलं की एक धबधबा लागतो. जवळ गेल्यावर लक्षात येतं की तो एक धबधबा नसून एक छोटी नदी आहे, जी उंचावरून पडत असल्यामुळे तिला धबधबा म्हणतात. या धबधब्याचं नाव आहे सिद्धेश्वर धबधबा. इथे काही काळ विश्राम करता येतो. धबधबा जिथे खाली पडतो तिथे छोटा डोह तयार झाला आहे. तिथलं पाणीही अतिशय स्वच्छ असतं. थोडावेळ तिथे थांबून पुन्हा धबधब्याकडून पुन्हा त्याच वाटेने पाठी आलो की काही अंतर चालत गेल्यावर अर्ध्या तासात आपण सिद्धेश्वर मंदिरात पोहोचतो. तिथून पुढे थोडं अंतर गेलं की सागरगड लागतो.




## फणसाड धबधबा

**(तालुका मुरूड/रोहा)** फणसाड धबधब्यावर जाण्यासाठी अलिबाग–मुरूड रोडवर बोर्ली येथे उतरावे लागते. बोर्लीपासून साधारणपणे तीन ते साडेतीन किमी अंतरावर फणसाडचा धबधबा आहे. तेथे जाण्यासाठी बोर्लीहून तीन किंवा सहा आसनी रिक्षांची सोय आहे. स्वतःचे वाहन असेल तर (दुचाकी किंवा लहान कार) काजूवाडीपर्यंत जावे. तेथून समोरच फणसाडचा नयनरम्य फेसाळणारा धबधबा दृष्टीस पडतो. काजूवाडीवरून पाऊलवाटेने ५ मिनिटात धबधब्यापर्यंत पोहोचता येते.


निसर्गाच्या कुशीत वसलेल्या या धबधब्याचा आनंद फक्त वर्षाऋतूतच घेता येतो. धबधब्याच्या आजूबाजूचा परिसर वनभोजनाचा आनंद घेण्यासाठी अतिशय रमणीय आहे.








हेमाडपंती
बांधणीचे वीरेश्वर
मंदिर



सह्याद्रीच्या अवघड
पायऱ्यांवरून लीलया
खळाळत येणारा झेनिथ
धबधबा

# खोपोलीचा झेनिथ धबधबा

(तालुका खालापूर) खालापूरच्या आग्नेयेस साडेसहा किमी अंतरावर मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटाच्या पायथ्याशी खोपोली हे गाव वसलेले आहे. पूर्वी हे गाव चामकोली नावाने प्रसिद्ध होते. सुंदर तलाव आणि महादेव मंदिर असलेले खेडे असे याचे वर्णन केले गेले आहे. येथून मुंबई – पुणे रस्त्याचे विहंगम दृश्य दिसते. येथील दीड हेक्टरवरील अंडाकृती तलाव व त्याला लागून असलेले वीरेश्वर महादेव मंदिर नाना फडणवीसांनी १८०० च्या सुमारास बांधले. तलावाच्या दगडी भिंती दीड ते दोन मीटर जाड आहेत. तलावाचा परीघ सुमारे एक किमी असून त्यात उतरण्यासाठी जागोजागी पायऱ्या आहेत. वीरेश्वर मंदिर सुमारे २० मीटर उंच व साध्या हेमाडपंती बांधणीचे आहे. येथून पावसाळ्यात सह्याद्रीतील धबधबे दिसतात. येथील झेनिथ धबधबा प्रसिद्ध आहे.



# भिवपुरी



कर्जत आणि नेरळ रेल्वे स्थानकांच्या दरम्यान भिवपुरी रोड हे रेल्वे स्टेशन आहे. मुंबईपासून लोकलने जाता येण्यासारखा परिसर असल्यामुळे येथे पर्यटकांची बरीच वर्दळ असते. साईबाबांचे मंदिर हे येथील एक आकर्षण आहे. टाटा पॉवरचे जलविद्युत निर्मिती केंद्र देखील येथून जवळच आहे. डोंगराळ परिसर असल्यामुळे येथे पावसाळ्यात अनेक धबधबे दुथडी भरून वाहत असतात. राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ ने देखील भिवपुरी येथे सहज पोहोचता येते.

मुंबई, नवी मुंबई या दोन महानगरांच्या जवळ असल्यामुळे भिवपुरीचा विकास जलद गतीने होत आहे.



# ताम्हिणी घाट

माणगांवच्या ईशान्येस सुमारे २३ कि.मी. अंतरावर विले गावापासून जाणारे ताम्हिणी, देवस्थळी व थिबा हे घाट आहेत. सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यांमधून जाणाऱ्या या घाटांमधला प्रवास विलक्षण नयनरम्य असतो. पावसाळ्यात सर्वत्र फुललेली हिरवाई आणि शुभ्र धुक्यांमधून अधूनमधून दृष्टीस पडणारे विलोभनीय धबधबे मन मोहून टाकतात. हे सर्व घाटमार्ग पूर्वी पायवाटांच्या स्वरूपात होते व त्यांची चढण उभी व कठीण होती. आता डांबरी रस्त्यांमुळे पावसाळ्यात या वाटांवरून केलेला प्रवास तुलनेने सुलभ, तरीही अविस्मरणीय ठरत आहे.




## मंडाळा

पोलादपूर घाटातून महाडपर्यंत जाताना रस्त्यात हे ठिकाण लागते. पावसाळ्यात सुमारे सत्तर फूट उंचीवरून खाली कोसळताना होणाऱ्या जलप्रपाताच्या आवाजावरून त्यातील प्रचंड गतीची कल्पना येते.

नावाजलेल्या पर्यटनस्थळांमध्ये असलेली पर्यटकांची गर्दी टाळून त्याच तोडीचे निसर्गसौंदर्य अनुभवायचे असल्यास मंडाळा घाटास अवश्य भेट द्यावी.





## वरदायिनी

मुंबई गोवा महामार्गावर नागोठणे-पाली जंक्शननंतर राष्ट्रीय महामार्ग ६६ वर हे फारसे परिचित नसलेले पर्यटनस्थळ आहे. एक दिवसाच्या वर्षा सहलीसाठी हे ठिकाण अतिशय योग्य आहे. खेरवाडी येथे वाहन ठेवून सुमारे अर्धा तास चालून या ठिकाणापर्यंत पोहोचता येते. स्थानिक लोकांमध्ये अतिशय श्रद्धापूर्ण स्थान असलेल्या वरदायिनी देवीवरून या धबधब्याला वरदायिनी हे नाव पडले आहे.

## पांडवकडा

उरणजवळून रेल्वे आणि रस्ता या दोन्ही मार्गांनी सहज पोहोचता येईल असे हे ठिकाण आहे. त्यामुळे येथे पर्यटकांची बरीच वर्दळ असते. येथे सुमारे १०० फूट उंचीच्या सरळसोट कड्यावरून कोसळणारा धबधबा आहे. ट्रेकर्स, सायकलिस्ट्स, वॉटर रॅपलर्स अशा प्रकारच्या साहसी पर्यटकांमध्ये हा धबधबा अधिक लोकप्रिय आहे. जवळच इस्कॉन मंदिर असल्यामुळे पर्यटकांची संख्या वाढत आहे.








# भीमाची काठी


(तालुका पोलादपूर) कुडपण गावाजवळ ८०० फूट उंचीचा भीमाची काठी नावाचा सुळका आहे. साहसी मार्गक्रमण व निसर्गसौंदर्य येथे भरभरून अनुभवावयास मिळते. पावसाळ्यात येथे अनेक नयनरम्य धबधबे कोसळत असतात. हे ठिकाण रॅपलिंग, क्लाइंबिंग यांकरिता प्रसिद्ध आहे.







# झुलता पूल


पोलादपूर तालुक्यातील वाकणजवळ सावित्री नदीवरील झुलता पूल हे अतिशय निसर्गरम्य ठिकाण आहे...स्थानिक लोक व अन्य पर्यटक आवर्जून या ठिकाणी भेट देतात...धो धो वाहणाऱ्या सावित्री नदीचे रौद्र रूप या ठिकाणी दिसते.






# धरणे







# डोलवाला धरण

(तालुका कोलाड) कोलाडच्या सह्याद्री रांगांमध्ये घनदाट जंगलात हे धरण आहे. धरणाच्या आजूबाजूचा परिसर अतिशय निसर्गरम्य आहे. धरणाच्या पाण्याचा वापर शेतीसिंचनासाठी केला जातो. त्यासोबतच येथे जलविद्युतनिर्मिती केंद्र देखील आहे.



# शहापाडा धरण

पेण तालुक्यातील शहापाडा धरण रोडे ग्रामपंचायतीच्या हद्दीत पिण्याच्या पाण्यासाठी बांधण्यात आले आहे. हे धरण मुंबई–गोवा हायवेवरील वाशी नाक्यासमोरील रोडे फाट्यापासून ११ कि.मी. अंतरावर आहे. संपूर्ण दगडी बंधाऱ्याचे हे धरण असून त्याची उंची ४० फूट व लांबी ७२० फूट आहे. हे धरण रायगड जिल्हा परिषदेच्या अंतर्गत आहे.



# हेटवणे धरण

पेण तालुक्यातील हेटवणे हे धरण मध्यम सिंचन प्रकल्पांपैकी एक असून महाराष्ट्र पाटबंधारे तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत अंतर्भूत करण्यात आले आहे. पेण खोपोली मार्गावर पेणपासून ९ कि.मी. अंतरावरील वाकरूळ गावानजीक हा महत्त्वाचा सिंचन प्रकल्प आहे. भोगेश्वरी नदीचे पाणी अडवून या प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली. हे धरण ४८.२ मी. उंचीचे असून त्याची लांबी ७६५ मी. आहे.



# गारंबी धरण व धबधबा

सिद्दी वंशाचा शेवटचा नवाब सिद्दी अहमद खान याने हे धरण राणी व्हिक्टोरियाच्या स्मरणार्थ बांधले होते. त्यामुळे हे धरण व्हिक्टोरिया ज्युबिली वॉटर वर्क्स या नावाने देखील ओळखले जाते. धरणाची रचना व आसपासचा परिसर अतिशय रमणीय आहे. संध्याकाळी विविध प्रकारचे पक्षी येथे मोठ्या संख्येने जमतात व त्यांचे सुमधुर ध्वनी आसपासच्या परिसरात घुमत राहतात. त्यामुळे हे ठिकाण निसर्गप्रेमींसाठी संस्मरणीय ठरते. सुमारे १०० मीटर उंचीवरून कोसळणारे स्फटिकासारखे शुभ्र पाणी डोळ्यांचे पारणे फेडते. पावसाळ्यात या परिसरातील धबधब्याला अवश्य भेट द्यायला हवी.





# मोर्बे धरण

खालापूर तालुक्यातील मोर्बे हे धरण पनवेल-कर्जत मार्गावर असून ते पाताळगंगेची उपनदी असलेल्या धावरी नदीवर बांधण्यात आले आहे. पूर्णपणे मातीच्या असलेल्या या धरणाची क्षमता १६५.३७ दशलक्ष घनमीटर इतकी आहे.

# बंदरे









बंदरावरील मासळी लिलाव

## जीवना बंदर

(तालुका श्रीवर्धन) श्रीवर्धनहून समुद्रकिनारामार्गे दिवेआगरला जाणाऱ्या रस्त्यावर श्रीवर्धन एस.टी. डेपोपासून जवळपास तीन कि.मी. अंतरावर जीवना बंदरावरून पूर्वी जलमार्गे वाहतूक चालत असे. या बंदराजवळ कोळी बांधवांची वस्ती असल्याने सध्या या बंदराचा उपयोग मच्छिमारीचे ट्रॉलर्स, होड्या इ. लावण्याकरिता केला जातो.

## रेवस

(तालुका अलिबाग) रेवस गावापासून सुमारे अडीच किमी अंतरावर वाहतुकीसाठी इंग्रजी टी आकाराचा धक्का बांधलेला आहे. धक्क्यावर दिवे असून तिथे प्रतीक्षागृहसुद्धा बांधलेले आहे. मूळ धक्का १९१३ साली बांधण्यात आला व १९४० साली त्याचा विस्तार करण्यात आला. रेवस बोटसेवा नियमित सुरू आहे. अलिबागच्या प्रवाशांना बोटीने मुंबईस जाता यावे म्हणून अलिबाग–रेवस एसटी वाहतूक सेवादेखील उपलब्ध आहे.







# जे.एन.पी.टी. (पंडित जवाहरलाल नेहरू बंदर/ न्हावाशेवा बंदर)

**(तालुका पनवेल)** भावी काळाचा व गरजांचा विचार करून मुंबई बंदरावरील भार कमी करण्यासाठी सन १९८० मध्ये मुंबई बंदराच्या समोरच १० कि.मी. अंतरावर न्हावाशेवा येथे उत्कृष्ट बंदर निर्माण करता येईल हा विचार निश्चित झाला. सन १९८२ मध्ये या संकल्पित बंदरासाठी न्हावाशेवा पोर्ट ट्रस्टची स्थापना झाली. न्हावा गांव पनवेल तालुक्यात असून येथून अरबी समुद्रातील ठाणे खाडीत लहानसे द्वीपकल्प निर्माण झाले आहे. शेवा गांव उरण तालुक्यात असून न्हावा व शेवा मध्ये सुरक्षित खाडीसारखा भाग आहे. या दोन्ही गावांवरून या प्रकल्पास न्हावाशेवा प्रकल्प असे नाव पडले. १९८९ मध्ये या बंदराचे उद्घाटन करण्यात आले व हे बंदर मालाच्या चढउतारासाठी खुले करण्यात आले. त्यावेळी त्याचे नामाभिधान पंडित जवाहरलाल नेहरू बंदर असे करण्यात आले. मालवाहतूक करणाऱ्या कन्टेनरच्या सोयीनुसार कमाल ४० टन माल साठविण्यासाठी योग्य असे पोलादी पत्र्याचे कन्टेनर स्वयंचलितरित्या जहाजावरून चढवता व उतरवता आले पाहिजेत अशी सुधारित पद्धतीची सोय या बंदरात उपलब्ध आहे.

बंदर उभारणीसाठी २५०० हेक्टर जमिनीचा विकास करण्यात आला आहे. त्याशिवाय १५० हेक्टर जमीन समुद्रात भराव घालून प्राप्त करण्यात आली. बंदरात पाण्याची खोली भरपूर असून कमाल ८० हजार टन भारापर्यंतची जहाजे उभी राहू शकतात. अशी सोय मुंबई बंदरातदेखील नाही. २०२१-२२ मध्ये या न्हावाशेवा बंदरातून एकूण ७६ लाख टन वजनाच्या कंटेनर्सची ने आण झाली आहे. यावरून याच्या भव्यतेची कल्पना येईल.

न्हावाशेवा बंदर हे जगातील प्रमुख ३५ कंटेनर बंदरांपैकी एक आहे. हे पोर्ट राष्ट्रीय महामार्ग ३४८ द्वारे रस्त्याने तर पनवेल न्हावा शेवा रेल्वे लाईनने जोडलं आहे. हे भारतातील दुसऱ्या क्रमांकावरील कंटेनर हाताळणारं बंदर आहे. या ठिकाणी जेएनपीटी टाऊनशिपही पाहायला मिळते. जेथे विविध कंपन्यांची वेअरहाऊसही आहेत.



# दिघी बंदर

**(तालुका श्रीवर्धन)** दिवेआगरपासून जवळपास १४ कि.मी. अंतरावर दिघी बंदर आहे. या बंदरातून मुरूड तालुक्यातील राजपुरी व आगरदांडा या ठिकाणी जाण्यासाठी मोटरलाँच सेवा उपलब्ध आहे. लाँचच्या वेळेनुसार राजपुरी तसेच आगरदांडा येथून मुरूड व पुढे जाण्यासाठी एस.टी. ची तसेच तीन व सहा आसनी रिक्षांची उत्तम सोय आहे. दिघी बंदरातून जंजिरा किल्ला पाहण्यासाठी मोटार लाँचची सोय उपलब्ध आहे. जवळपास ४५ मिनिटे थांबून, तीच लाँच पर्यटकांना घेऊन पुन्हा दिघीला येते. जून महिन्यापासून नारळी पौर्णिमेपर्यंत ही लाँचसेवा बंद असते. दिघी ते आगरदांडा ही लाँचसेवा मात्र पावसाळ्यातही अनुकूल हवामान पाहून चालू असते.

समुद्राची खोली १४.५ मीटर असलेलं दिघी हे महाराष्ट्रातील सर्वात खोल बंदर आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्गो हाताळण्यासाठी इथे मुबलक मोकळी जागा, आधुनिक सोईसुविधा (स्टॉकयार्ड आणि वेअरहाऊस) आहेत. बॅकअप एरिया म्हणून १६०० एकर जमीन उपलब्ध आहे.

मुंबईपासून हे बंदर दक्षिणेकडे ४२ सागरी मैल अंतरावर आहे तर जमिनीवरून १७० किमी अंतरावर आहे. बंदराच्या उत्तरेला राष्ट्रीय महामार्ग १७, ९२ आणि ९६ तर दक्षिणेला राष्ट्रीय महामार्ग ९७ व ९८ आहेत. भविष्यात महामार्ग २ ला महामार्ग ४ शी जोडण्यासाठी रस्ते बांधणीचं काम सुरू आहे. कोकण रेल्वेचं सर्वात जवळचं स्टेशन इथून ४७ किलोमीटरवर आहे.



# मांडवा

**(तालुका अलिबाग)** गेल्या काही वर्षात मुंबईहून अलिबागला समुद्रमार्गे जाण्यासाठीची सर्वात गजबजलेली जेट्टी म्हणून मांडव्याचा उल्लेख करता येईल.

अलिबागच्या उत्तरेस सुमारे १९ किमी. अंतरावर हे बंदर-गाव आहे. छोट्या खाडीच्या मुखाशी वसलेल्या या गावच्या सभोवताली नारळीपोफळीच्या बागा पाहायला मिळतात. मुंबईतील भाऊचा धक्का किंवा गेट वे ऑफ इंडियावरून मांडवा इथे जायला थेट फेरी उपलब्ध आहेत. स्पीड बोट, फेरी बोट व ज्यांना आपल्या वाहनांनी अलिबागला जायचं आहे त्यांच्यासाठी 'महाराष्ट्र मरिटाइम बोर्ड' (एमएमबी) ची 'रोल ऑन रोल ऑफ' म्हणजे (रो रो बोट) सर्व्हिसही उपलब्ध आहे. स्पीड बोटीने पंधरा ते वीस मिनिटांत अलिबागला पोहोचता येतं तर तासाभराच्या रो रो किंवा फेरी बोटीच्या प्रवासाने मांडवाला उतरलं की रेवस आणि किहीम समुद्रकिनारे इथून काही मिनिटांच्या अंतरावर येतात. या बोटींच्या फेरी सकाळी लवकर ते संध्याकाळी उशीरापर्यंत सुरू असतात.


खरं तर मांडवा हे नाव ऐकलं की सर्वात आधी डोळ्यांसमोर येतात ते अमिताभ बच्चन आणि हृतिक रोशन यांचे बॉलिवूड चित्रपट. पण मांडवा केवळ बॉलिवूड चित्रपटांसाठीच प्रसिद्ध नसून इथून जवळच जेट स्काय राइड्स, बनाना राइड्स, बम्पर राइड्स, कयाकिंग अशा वॉटरस्पोर्ट्सची सोय करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे जवळचा कुलाबा फोर्ट, किहिम बीच, बुद्धकालीन गुहेतील चर्च, हमाम खाना आणि पोर्तुगीजांच्या राजवटीचे काही अवशेष पाहता येतात.

२०१४ पासून मांडवा जेट्टीच्या सुधारणांकडे केंद्र सरकारतर्फे विशेष लक्ष दिलं गेलं. सार्वजनिक आणि खासगी सहभागाने ही जेट्टी संपूर्ण विकसित करण्यात आली. इथल्या सुविधांमुळे पर्यटकांचा ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. उच्च दर्जाची रेस्टॉरण्ट, समुद्रकिनारी बांधण्यात आलेले कट्टे, पर्यटकांसाठी बांधण्यात आलेली प्रसाधनगृहं व इतर सोयी उत्तम आहेत. 'बीच बॉक्स प्रोजेक्ट'मध्ये जुन्या कंटेनरचा वापर करण्यात आला आहे. कंटेनरचा वापर मनोरंजनाच्या हेतूने करण्याचा हा देशातील पहिलाच प्रयत्न आहे. ओपन एअर ॲम्फीथिएटरही बांधण्यात आलं आहे. पर्यटनामुळे इथल्या स्थानिकांना मोठ्या प्रमाणात रोजगार लाभत आहे.


रो रो टर्मिनस



# अभयारण्ये










# फणसाड अभयारण्य

**(तालुका : मुरूड)** नांदगांव-मुरूड रस्त्यावर उसरोली फाट्यावर डावीकडे वळून, सुपेगांवच्या अलिकडे, डावीकडे रस्त्यावरच अभयारण्याचे प्रवेशद्वार आहे. अलिकडच्या केसोली गावात नवाबाचे पडके वाडे, विहीर व आमराई आहे. नवाबकाळात हे जंगल त्यांच्या शिकारीचे राखीव क्षेत्र होते. ५२.७१ चौ. कि.मी. क्षेत्र १९८६ साली महाराष्ट्र शासनाने अभयारण्य म्हणून घोषित केले. इथले वैशिष्ट्य म्हणजे बारमाही वाहणारे झरे. स्थानिक लोक त्याला 'गाण' म्हणतात. अशी एकंदर तीस 'गाणी' या अभयारण्यात आहेत. बिबटे, रानमांजर, खोकड, तरस, भेकर, सांबर, रानडुक्कर, माकडे, ससे आणि शेकरू नामक मोठी खार आदी १७ प्रकारचे वन्यजीव तर १६४ प्रकारचे विविध पक्षी या अभयारण्यात आढळल्याच्या नोंदी आहेत. याबरोबरच ७१८ जातींच्या वनस्पती, औषधी झाडे, ९० प्रकारची फुलपाखरे, नाग, धामण, अजगर, फुरसे असे किमान २७ प्रकारचे सर्प येथे पाहायला मिळतात. मात्र त्यासाठी भडक रंगाचे कपडे न वापरणे, अजिबात आवाज न करणे तसेच पर्फ्युम न लावणे असे किमान संकेत पाळावे लागतात.






















सकाळी ६ ते ५.३० पर्यंत हे अभयारण्य खुले असते. रानातल्या कच्च्या रस्त्यावरून छोटे चारचाकी वाहन तीन कि.मी. पर्यंत जाऊ शकते. पुढे मात्र वेगवेगळ्या जंगलवाटांनी पायी फिरण्यासाठी किमान २-३ तास तरी हवेत. प्रौढांना वीस रुपये तर बारा वर्षाखालील मुलांना दहा रुपये प्रवेश शुल्क आहे. वनखात्यातर्फे तंबू भाड्याने घेऊन एखाद्या पाणवठ्यावर, योग्य स्थळी परवानगी काढून मुक्काम करता येऊ शकतो. पूर्वसूचनेनुसार महिला बचतगटामार्फत (फक्त) शाकाहारी जेवणाची व्यवस्था होऊ शकते.

मुरूडजवळील फणसाड अभयारण्यात पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी वन खात्याने बांबू व सुपारीची छोटी घरे बांधली आहेत, तसेच तंबूमध्ये राहण्याची सोय केली आहे. त्यामुळे पर्यटकांच्या संख्येत वाढ झाली आहे.










# बायो डायव्हर्सिटी पार्क, पेण


वेगवेगळ्या प्रकारच्या वनस्पती, फुलं, पानं यांची लागवड पेण इथल्या नेटिव्ह बायोडाव्हर्सिटी पार्कमध्ये पाहायला मिळते. आजूबाजूच्या प्रदेशातील आता दृष्टीस न सापडणाऱ्या अतिशय दुर्मीळ वनस्पती इथे दिसतात. त्यांना पाहिल्यावर भारतीय वनस्पती शास्त्राची एक वेगळी ओळख होते. या विविध वनस्पतींमुळे फुलपाखरांचा भरपूर वावर दिसतो.


इथल्या मुख्य रस्त्यावरून जाताना हे उद्यान एखाद्या जंगलासारखंच वाटतं. मूळ ४० एकरच्या या उद्यानाला आता अधिक व्यापक जागेत म्हणजे १०० एकरात वाढवण्यात आलं आहे. इथे येऊन वनस्पती विज्ञानाशी निगडीत असलेले विद्यार्थी अभ्यास अथवा संशोधन करतील असा त्यामागचा उद्देश आहे. पर्यावरण अध्ययन आणि पर्यटनचा विकास तसेच नष्ट होणाऱ्या वनस्पतींच्या जातींचं संवर्धनही या उद्यानाच्या माध्यमातून केलं जात आहे.






















# कर्नाळा अभयारण्य

**(तालुका पनवेल)** कर्नाळा येथे १२.११ चौ.कि.मी. क्षेत्रावर पक्षी अभयारण्य आहे. किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या या अभयारण्यामध्ये १५० हून अधिक प्रजातींचे विविध पक्षी पहायला मिळतात. हिवाळा आणि पावसाळा अशा दोन्ही ऋतूंमध्ये वेगवेगळ्या पक्ष्यांचे दर्शन होते. पावसाळ्यात रॉबिन, पॅराडाईज फ्लायकॅचर, मलबार थ्रश असे पक्षी भेट देण्यासाठी येतात. या पक्षी अभयारण्यात विविध प्रकारचे बगळे, गिधाडे, घारी, ससाणे, जलकपोत, कबुतरे, होले, पारवे, घुबड, पिंगळा, तांबट, सुतार हे पक्षी वास्तव्यास येतात. या पक्ष्यांसाठी अनेक पक्षीघरे आहेत.

पक्षी निरीक्षकांसाठी या अभयारण्याची भेट म्हणजे पर्वणीच असते.





# खारफुटीची जंगलं

खारफुटीची जंगलं मानवाच्या आयुष्यात महत्त्वाची आहेत. अलिबागमधून विविध नद्या समुद्राला येऊन मिळाल्याने तिथे खारफुटीच्या जंगलांचं साम्राज्य तयार झालं आहे. खारफुटी ही केवळ समुद्राच्या लाटांना रोखणारी एक जैवविविधता नसून हवेतील कार्बनडायऑक्साइड जमिनीत मुरायला त्याची मदत होते. त्याला 'ब्ल्यू कार्बन' असं म्हणतात.

यामुळे हवेतील कार्बनडाय ऑक्साईडच्या प्रमाणाचा समतोल राखण्यास मदत होते. या जैवविविधतेवर गुजराण करणारे पक्षीही या खारफुटीत असतात. त्यामुळे खारफुटीची जैवविविधता राखणे ही बाब इथले गावकरी महत्त्वाची समजतात व त्यासाठी प्रयत्नही करताना दिसतात. काही जगप्रसिद्ध तसेच राष्ट्रीय संस्थांचा या कामी हातभार आहे.

चिखलात सापडणारे छोटे मासे, खेकडे पकडून त्यांचा व्यवसाय केला जातो. परंतु त्यामुळे खारफुटीच्या जंगलांचं अस्तित्व धोक्यात येऊ नये यासाठी विशेष लक्ष पुरवलं जातं. सिडकोनेही अलीकडे रायगड जिल्ह्यातील २१९ हेक्टर खारफुटीच्या जंगलाच्या संवर्धनाचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.






# ऑलिव्ह रिडले टर्टल्स

**(तालुका श्रीवर्धन)** जगातील दुसऱ्या क्रमांकाचं छोटं कासव असं ज्याचं वर्णन केलं जातं ते रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या समुद्रकिनारी पाहायला मिळतं.

काळसर हिरवट म्हणजे ऑलिव्हच्या रंगाशी मिळता जुळता याचा रंग असल्याने यांना ऑलिव्ह रिडले टर्टल्स असं म्हणतात. यांचा विणीचा हंगाम असतो फेब्रुवारी ते एप्रिल. या काळात शेकडोंच्या संख्येने ही ऑलिव्ह रिडले टर्टल्स समुद्रकिनाऱ्यावर येतात. रात्रीच्या थंड वातावरणात किनाऱ्यावरील ठराविक ठिकाणी खड्डा खणून मादी त्यात ते १०० ते १५० अंडी घालते व वरून खड्डा वाळूने बुजवून टाकून पुन्हा समुद्रात जाते. असं म्हणतात की या माद्या त्यांच्या जन्माच्या ठिकाणीच अंडी घालण्यासाठी आलेली असतात.

ऑलिव्ह रिडलेच्या संवर्धनासाठी हॅचिंग सेंटर उभारण्यात येतात. यामध्ये किनाऱ्यावरच्या कासवांची अंडी शोधून काढून त्यांना एका सुरक्षित ठिकाणी उबदार वातारणात ठेवण्यात येतं. या अंड्यातून ४५ ते ६० दिवसांनी कासवांची छोटी पिलं बाहेर आली की त्यांना सकाळी आणि संध्याकाळी अशा ठराविक वेळेला समुद्रात सोडलं जातं. प्रत्येक टोपलीखालील अंड्यातून पिलं कधी बाहेर येणार याप्रमाणे पर्यटकांना आमंत्रण दिलं जातं.  किनाऱ्यावर सोडलेली कासवाची पिलं समुद्राच्या लाटांचा आवाज ऐकत त्या दिशेने आपला प्रवास सुरू करतात. अडखळतात, मार्ग चुकतात पण समुद्राच्या पाण्यापर्यंत पोहोचतात. हा सर्व सोहळा पाहाण्याजोगा असतो.

समुद्रात सोडलेली सर्वच पिलं नशीबवान ठरत नाहीत. त्यातील काहींना मोठ्या माशांनी खाल्यामुळे, तर काही मासेमारीच्या जाळ्यात अडकून तर काही उपासमारीने मरतात. त्यातील मोजकीच पिलं मोठी झालेली पाहायला मिळतात. आणि त्यातल्या माद्या त्यांच्या विणीच्या हंगामात त्याच समुद्रकिनाऱ्यावर अंडी घालण्यासाठी काही वर्षांनी पुन्हा येतात.




# जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या (ओरिएण्टल ड्वार्फ किंगफिशर)

खंड्या पक्षीगणातील सर्वात छोटा म्हणजे केवळ १३ सेंटीमीटर लांबीचा एक रंगीबेरंगी पक्षी– ओरिएण्टल ड्वार्फ किंगफिशर म्हणजेच तिबोटी खंड्या. रायगड जिल्ह्याचा अधिकृत ‘जंगल पक्षी’ अशी त्याला मान्यता देण्यात आली आहे. नारंगी चोच, भेदक काळेभोर डोळे, पिवळे पोट आणि डोक्यापासून शेपटापर्यंत विविध रंगछटा यामुळे हा पक्षी अतिशय मनमोहक दिसतो. पावसाळ्यात भूतान, श्रीलंका अशा देशातून तो महाराष्ट्राच्या कोकण किनारपट्टीत केवळ दोन तीन महिन्यांसाठी स्थलांतर करतो. इथं येण्याचं त्याचं एकमेव प्रयोजन असतं ते प्रजनन. ते काम झालं की ही नरमादीची जोडी हिमालयाच्या पायथ्याच्या दिशेने स्थलांतरीत होते.

याचं असणं सहजासहजी दिसून येत नाही. मातीच्या कपारीत, तलाव, ओढे, भुसभुशीत जमीन यांमध्ये तो आडवे बिळासारखे घरटे करून राहतो. त्याचं खाणं म्हणजे किडे, पाली, किटक आणि खेकडे. या पक्ष्याला मासे पकडण्यात फारसं स्वारस्य नसतं. मादीला रुंजी घालण्यासाठी तो एक प्रकारची शीळ वाजवतो. त्याला प्रतिसाद देत मादी त्याच्या जवळ येते. प्रजनन झालं की पुढील काही दिवस पिलांच्या संगोपनात जातात. त्यानंतर मात्र ते तिथून दुसऱ्या प्रवासाला निघतात.

सुरुवातीला हा पक्षी कर्नाळा पक्षी अभयारण्यात दिसे. परंतु पर्यटकांच्या वाढत्या राबत्याने त्यांची तिथली संख्या कमी झाली. या पक्ष्याचं आयुर्मान केवळ चार ते पाच वर्षांचं असतं. मानवी हस्तक्षेपामुळे त्याचा अधिवास नष्ट होण्याचा धोका निर्माण होतो. तसं होऊ नये त्यामुळे त्याला रायगड जिल्ह्याचा राष्ट्रीय पक्षी घोषित करण्यात आलं आहे.

# धार्मिक स्थळे







बल्लाळेश्वर मंदिर







बल्लाळेश्वराची स्वयंभू मूर्ती



अलिबाग शहरात बरीच जुनी मंदिरे आहेत. त्यापैकी काही पेशवाईत तर काही त्याही आधी बांधलेली आहेत. त्यात बालाजी मंदिर, उमामहेश्वर मंदिर, मारुती मंदिर, काशीविश्वेश्वर मंदिर, गणपती मंदिर, कलंबिकादेवी मंदिर, आंग्रेवाड्यातील विष्णू मंदिर, राममंदिर, वरसोलीचे विठोबा मंदिर इत्यादींचा समावेश होतो. अलीकडे बांधलेल्या मंदिरांमध्ये लक्ष्मी नारायण मंदिर, विठ्ठल रखुमाई मंदिर, कामत आळीतील गणपती मंदिर, घरत आळीतील गणपती मंदिर, राम मंदिर, इंग्रजी शाळेजवळील मारुती आणि मरीआईचे मंदिर, कोळीवाड्यातील दत्त मंदिर, मुसलमानांच्या दोन मशिदीही आहेत, त्या अनुक्रमे २२५ व १०५ वर्षांपूर्वी बांधलेल्या आहेत. तसेच ज्यू (बेने इस्राइल) लोकांचे एक सिनेगॉगही असून ते १५० वर्षांपूर्वी बांधलेले आहे.

## बल्लाळेश्वर मंदिर

(तालुका सुधागड) अष्टविनायकांपैकी एक स्थान असलेले श्री बल्लाळेश्वर हे मंदिर मुंबई-गोवा महामार्गावरील वाकणपासून सुमारे ८ कि.मी. अंतरावरच्या पाली या गावात आहे. पाली हे गांव सरसगडाच्या पायथ्याशी वसलेले आहे. श्री बल्लाळेश्वराचे मंदिर प्रशस्त व श्रीकारी धाटणीचे असून ते पूर्वाभिमुख आहे. यामुळे दक्षिणायनात सूर्योदयाच्या वेळी मूर्तीवर सूर्यकिरणे पडतात. आतील गाभाऱ्याचे सहा बहिर्कोन व पुढील गाभाऱ्याचे पुढील दोन आंतर्कोन मिळून अष्टदिशा साधल्या आहेत. बल्लाळेश्वराची स्वयंभू मूर्ती डाव्या सोंडेची आहे. भाद्रपद शु. प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत व माघ शु. प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत दोन मोठे उत्सव येथे साजरे होतात.

सध्याच्या पाषाणी देवालयापूर्वी हे देवालय लाकडी होते. १७७०च्या सुमारास नाना फडणवीसांचा चुलतभाऊ बाबुराव फडणवीस व त्यांचा मुलगा मोरोबादादा यांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला. मंदिराच्या सभोवती दगडी फरसबंदी करून समोर दोन तलाव बांधले.




# वरदविनायक मंदिर मढ (महड)

**(तालुका खालापूर)** मुंबई पुणे महामार्गावर खोपोलीच्या अलिकडे महड येथे जाणारा रस्ता लागतो. महामार्गापासून महड गांव जवळपास १ ते १.५ किमी आत आहे. अष्टविनायकांपैकी श्री. वरदविनायक हे एक स्थान आहे. वरदविनायकाचे मंदिर पूर्वाभिमुख असून देवळाच्या मागे तलाव आहे. याच तलावात एका गणेशभक्ताला दृष्टांत होऊन वरदविनायकाची मूर्ती सापडली होती. श्री गणेश जयंती (माघ शु. ४) व भाद्रपदातले ५ दिवस येथे मोठा उत्सव असतो.





सिद्धीविनायक मंदिर



गणपतीची स्वयंभू मूर्ती

# नांदगावचा सिद्धीविनायक

**(तालुका मुरुड)** मुरुडच्या उत्तरेस जवळपास ९ कि.मी. अंतरावर हे नांदगावचे प्राचीन सिद्धीविनायक मंदिर आहे. या मंदिरातील गणपतीची मूर्ती उजव्या सोंडेची असून ती स्वयंभू मानली जाते. हे मंदिर समस्त श्रद्धाळूंचे श्रद्धास्थान आहे.

माघ महिन्यातील शुक्ल चतुर्थीला येथे माघी गणेशोत्सव धूमधडाक्यात साजरा होतो. येथील एकदिवसीय यात्रेचे मोठे आकर्षण असते. दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीला असंख्य भक्त सिद्धीविनायकाच्या दर्शनास आवर्जून येतात.



विक्रम विनायक मंदिर



मंदिराच्या परिसराचा रात्रीचा देखावा



मंदिराचा सभामंडप



मंदिराच्या सभोवतलाचा परिसर

# श्री विक्रम विनायक मंदिर

**(तालुका अलिबाग)** रेवदंडा गावानंतर कुंडलिका नदीच्या खाडीवरील साळाव पूल ओलांडताना डावीकडे नदीचे विशाल पात्र, त्यामधील लहान-मोठ्या नावा, रेवदंड्याच्या नारळ-पोफळीची हिरवळ तर उजवीकडे खाडीच्या टोकाशी समुद्रात घुसणारा कोर्लई किल्ला आणि क्षितिजाला भिडणारा अथांग सागर असे सुंदर निसर्गदृश्य दिसते. अलिबागपासून सुमारे २० कि.मी. तर मुरूडपासून ३२ कि.मी. अंतरावर साळाव या निसर्गरम्य गावी उंच टेकडीवर श्री विक्रम विनायक मंदिर बिर्ला उद्योगसमूहाने बांधले आहे.

पांढऱ्याशुभ्र संगमरवरातून साकारण्यात आलेल्या मंदिराचा भव्य कळस अतिदूरवरूनही नजरेस पडतो. टेकडीच्या पायथ्याशी प्रवेशद्वार आहे. येथून मंदिराकडे जाणारा रस्ता पायऱ्यांचा आहे, तसेच पायऱ्यांच्या जवळूनच नागमोडी वळणाचा, वाहनांसाठी बनवलेला रस्ताही आहे. मंदिराच्या सभोवताली नयनरम्य बाग आहे. मंदिराचा सभामंडप चारही बाजूंनी मोकळा असून, छत पारदर्शक पॉलिकार्बोनेट शीटचे असल्यामुळे सभामंडपात प्रकाश व मोकळ्या हवेचा संचार असतो. मंदिराच्या चौकोनी गाभाऱ्यात श्री गणेशाची भव्य मूर्ती आहे. बाजूच्या लहान मंदिरांतून राधा-कृष्ण, शंकर-पार्वती, देवी दुर्गामाता, रिद्धी-सिद्धी आणि सूर्यदेव यांच्या मूर्तीची स्थापना करण्यात आलेली आहे. मंदिराच्या परिसरातील बागेमध्ये स्व. आदित्य बिर्ला यांचा पूर्णाकृती पुतळा आहे. बागेचा परिसर व मंदिर यांतील विद्युत रोषणाई नेत्रदीपक व आकर्षक आहे. हे भव्य, प्रसन्न आणि अतिशय स्वच्छता असलेले सुंदर मंदिर आहे. याचे नाव 'विक्रम विनायक' असले तरी परिसरात लोक याला 'बिर्ला गणेश' म्हणून ओळखतात.

अल्पावधीतच या मंदिराची किर्ती महाराष्ट्राबाहेर पोहोचल्यामुळे या ठिकाणी भक्तगण तसेच पर्यटक सतत येत असतात. सकाळी ९.०० आणि संध्याकाळी ७.१५ वाजता मंदिरात आरती व पूजा होते. सकाळी ६.०० ते ११.३० व संध्याकाळी ४.३० ते ९.०० या वेळेतच मंदिरात प्रवेश दिला जातो. अलिबागपासून मंदिरापर्यंत तसेच रेवदंड्यापासून मंदिरापर्यंत एस.टी. तसेच तीन व सहा आसनी रिक्षांची उत्तम सोय आहे. भक्तांना मनःशांती व सुखसमाधान देणारे हे ठिकाण आहे.




मुगवली गणपती मंदिर



गणपती स्वयंभू मूर्ती



मुगवली गणपती मंदिर

# मुगवली स्वयंभू गणपती मंदिर

माणगांव लोणेरे रोडवर मुगवली गावात गणपतीचे स्वयंभू मंदिर आहे. माघ महिन्यात उत्सवाला गणपतीला नैवेद्य दाखवतात. इथे नवस फेडण्यासाठी नेहमीच गर्दी असते.

मुंबई-गोवा महामार्गावर माणगांवपासून ३ कि.मी. अंतरावर मुगवली फाटा आहे. तेथून अवघ्या दीड किमी अंतरावर हे स्वयंभू गणेश मंदिर आहे. मुगवली हे शंभर ते सव्वाशे घरांचे छोटे गांव आहे. गांव जरी छोटे असले, तरी या गणपतीमुळे त्याची ख्याती सर्वदूर पसरली आहे.

मुगवली ग्रामस्थांनी व परिसरातील नागरिकांनी सुप्तावस्थेत असलेल्या या जागृत गणेशासाठी सुरुवातीस एक कुडाचे मंदिर उभारले. त्यानंतर प्राचीन काळातील या मंदिराचा ३५ वर्षांपूर्वी जीर्णोद्धार करून गाभाऱ्यात संगमरवरी दगड बसविण्यात आला व मंदिरही थोडे प्रशस्त करण्यात आले. १९६८ साली मुगवलीच्या स्थानिक स्वयंभू गणेश मंडळाने गणेश व्यवस्थापन समिती स्थापन करून श्रींच्या भोवती उत्तमपैकी छोटासा गाभारा बांधला आणि दररोजच्या गणेशपूजेची व्यवस्था केली. पूर्वीच्या जुन्या कौलारू मंदिराचे रूपांतर आता भव्य अशा सिमेंट काँक्रीटच्या २२ फूट रुंद व ३० फूट लांब अशा सुंदर मंदिरात झाले आहे. मंदिराचे शिखर मुगवली फाट्याजवळूनही दिसते. येथील गणेशमूर्ती पूर्वाभिमुख आहे. त्यामुळे गणेशांच्या मूर्तीवर दररोज सूर्यकिरण पडावेत अशीही कल्पकता मंदिर बांधताना योजण्यात आली आहे. मुंबई-पुण्यातून भाविक मोठ्या प्रमाणात येथे दर्शनासाठी येत असतात.





मंदिराचा गाभारा

# श्री हरिहरेश्वर काळभैरव मंदिर

**(तालुका हरिहरेश्वर)** हरिहरेश्वर येथील एस.टी. च्या थांब्यापासून २-३ मिनिटांच्या अंतरावर मंदिराचे प्रवेशद्वार आहे. मंदिर परिसरात प्रवेश केल्यावर डाव्या बाजूस एक विहीर (ब्रह्मकूप) असून तेथे गणपती व मारुतीचे मंदिर आहे. जवळच दोन दगडी दीपमाळा असून त्यांच्यासमोर श्री हरिहरेश्वर व काळभैरव या जागृत देवस्थानांची दोन स्वतंत्र मंदिरे एकमेकांना लागून आहेत. काळभैरव मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर काळभैरव व त्याच्या डावीकडे योगेश्वरी अशा दोन उभ्या मूर्ती दिसतात.

काळभैरव मंदिराच्या पूर्वेस हरिहरेश्वर मंदिर आहे. पश्चिमेच्या लाकडी मुख्य प्रवेशद्वारातून आत गेल्यावर डाव्या बाजूस नंदी, तर उजव्या बाजूस गणपती तसेच गरुड या मूर्ती आहेत.

दोन दगडी दीपमाळा







काळभैरव व योगेश्वरी माता मूर्ती

# हरिहरेश्वर क्षेत्राची परिक्रमा

**(तालुका हरिहरेश्वर)** श्री हरिहरेश्वर क्षेत्री ब्रह्मा, विष्णू, महेश आणि आदिमाया पार्वती डोंगररूपाने बसले आहेत, अशी आख्यायिका सांगितली जाते. या चार डोंगरांच्या कडेकडेने खडकांवरून समुद्रकिनाऱ्याने चालत प्रदक्षिणा घातल्यावर परिक्रमा संपूर्ण होते. या परिक्रमेला जवळपास दोन तास लागतात. प्रदक्षिणा वाटेवरचा समुद्रकिनारा खडकाळ असून, समुद्रही खोल आहे. म्हणून माहीतगार माणसासोबत भरती–ओहोटीची वेळ पाहून ही परिक्रमा करणे चांगले. ही झाली दीर्घ परिक्रमा. त्यापेक्षा फक्त ब्रह्मदेवाच्या पर्वताची प्रदक्षिणा (लघुपरिक्रमा) जवळपास ४० ते ५० मिनिटांमध्ये पूर्ण होते.

मंदिराच्या पाठीमागे असणाऱ्या जांभ्या दगडाच्या जवळपास सत्तर–एक पायऱ्या चढून आपण पर्वतमाथ्यावर येतो आणि समोर नजरेस पडतो, तो थेट क्षितिजापर्यंत पसरलेला निळाशार समुद्र. दोन खडकांमधील खिंडीतून खाली उतरणाऱ्या पायऱ्या अन् पायथ्याशी विसावलेल्या खडकांवर चाललेले लाटांचे तांडवनृत्य! या पायऱ्या उतरण्याआधी उजवीकडे एक पायवाट जाते. येथून पुन्हा खाली येऊन दोन कड्यांमधील लोखंडी कठडे लावलेल्या पायऱ्या सावकाश उतरल्यावर आपण समुद्रकाठी पोहोचतो. येथील खडकाळ किनाऱ्यावर शुक्लतीर्थ नावाचे कुंड आहे. येथून डोंगराच्या कडेने समुद्रकाठच्या खडकांवरून सावकाशपणे पुढे चालत गेल्यावर अनुक्रमे विष्णुपाद, गायत्रीतीर्थ, शूलतीर्थ, चक्रतीर्थ, नागतीर्थ, गौरीतीर्थ व पुढे पांडवतीर्थ अशी तीर्थस्थाने लागतात. यापैकी पांडवतीर्थावर मृत्यू पावलेल्या लोकांची क्रियाकर्मे करतात. पांडवतीर्थाजवळून पुन्हा मंदिरात प्रवेश करून ही लघुपरिक्रमा पूर्ण केली जाते.

**हरिहरेश्वर मंदिराच्या मागे समुद्राच्या लाटांमुळे कातळाला भेगा पडून नैसर्गिक शिल्पं तयार झाली आहेत.**

फोटोः अपर जिल्हाधिकारी श्री. अमोल यादव



**हरिहरेश्वर क्षेत्र प्रदक्षिणा मार्ग**





## चौलचे 'श्री रामेश्वर मंदिर'

(तालुका अलिबाग) अलिबाग रेवदंडा रोडवर अलिबागपासून सुमारे १४ कि.मी. अंतरावर प्राचीन चंपावती नगरीच्या काळातील रामेश्वर मंदिर आहे. मंदिर पूर्वाभिमुख असून, समोर पुष्करिणी आहे. घडीव दगडात बांधलेले हे मंदिर हेमाडपंती पद्धतीचे वाटते. परंतु ते केव्हा व कुणी बांधले, याचा उल्लेख सापडत नाही. सदर मंदिराचा जीर्णोद्धार अनेकदा झाल्याच्या आंग्रेकालीन नोंदी आहेत.

आजही कौलारू छप्पर असलेल्या मंदिरासमोर प्रशस्त पाण्याची टाकी आहे. दिवाळीत हजारो पणत्यांनी हा परिसर उजळून टाकला जातो, ते दृश्य पाहण्यासारखे असते. रामेश्वर मंदिराच्या गाभाऱ्यात मध्यभागी जमिनीपासून थोडी उंच पितळी पत्र्याने मढवलेली शाळुंका आहे.

गाभाऱ्याच्या जमिनीपासून सुमारे ७.६२ मीटर उंच असलेल्या शिखराचे व संपूर्ण गाभाऱ्याचे बांधकाम दगडी आहे. गाभाऱ्याची संपूर्ण इमारत स्वतंत्र असून, ती बाहेरील उंच शिखर असलेल्या घडीव दगडी मंदिरात समाविष्ट आहे. गाभाऱ्याच्या समोर सभामंडप असून त्यात तीन कुंडे आहेत. रामेश्वराच्या दर्शनासाठी सभामंडपात उभे राहिले असता, उजव्या बाजूस पर्जन्यकुंड, डाव्या बाजूस वायुकुंड, तर मध्यभागी अग्निकुंड आहे.

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी येथे दर्शनासाठी भाविकांची रीघ लागते. महाशिवरात्रीच्या वेळी मोठा उत्सव साजरा केला जातो.

# श्री कनकेश्वर

**(तालुका अलिबाग)** अलिबागपासून सुमारे १३ कि.मी. अंतरावर, अलिबाग शहराच्या ईशान्य दिशेस कनकेश्वराचा ९०० फूट उंचीचा डोंगर आहे. त्यात शिवशंकराचे स्वयंभू प्राचीन मंदिरही आहे. श्रावण महिन्यात हजारो भाविकांची गर्दी दर्शनासाठी असते. समुद्रसपाटीपासून देवस्थानाची उंची सुमारे १२७५ फूट इतकी होईल. कनकेश्वरला जाण्यासाठी दोन मार्ग आहेत, एक मापगांव मार्गे व दुसरा झिराड मार्गे. बहुतांश पर्यटक हे मापगांवमार्गे कनकेश्वराच्या दर्शनास जातात. नागमोडी वळणाने चालताना जवळपास ५००० फूट गड चढावा लागतो. पायथ्याशी असलेल्या दत्तमंदिरापासून चढायला सुरुवात केल्यावर साधारणतः १००० फूट अंतर पायऱ्यांनी गेल्यावर उजव्या बाजूस मोहनगिरी व बालगिरी या दोन तपस्वींच्या समाधी आहेत. येथून पायऱ्यांचा अवघड चढ सुरू होतो. तो चढ जवळजवळ ५०० फुटांचा असून, तेथे विश्रांतीसाठी दगडी ओटे बांधले आहेत. या ठिकाणास नागोबाचा टप्पा म्हणतात. नागोबाच्या टप्प्यापासून जांभळीचा टप्पा ७५० फुटांवर असून, तेथून १०० फुटांवर एक पायरी लागते. तिला 'देवाची पायरी' असे म्हणतात. नीट निरीक्षण केले असता, या पायरीवर संपूर्ण पावलांचा ठसा दिसतो. या पायरीनंतर गायमांडी लागते. गायमांडीवर गायीची घडीव दगडाची बसलेली लहान मूर्ती आहे. येथून चढ संपून, सपाटीचा रस्ता सुरू होतो. आसमंतातील रमणीय दृश्ये, दक्षिणेकडचा सागरगडचा डोंगर व पश्चिमेकडील अरबी समुद्राचे विहंगम दृश्य दिसते. गायमांडीच्या पुढे पालेश्वर हे घुमटीवजा शिवमंदिर आहे. त्याच्या पुढे गेल्यावर ब्रह्मकुंड आहे. या कुंडाचे बांधकाम कलात्मक आहे. शेजारीच मारुतीचे मंदिर आहे. ब्रह्मकुंडापासून पुढे जात असता, उजव्या बाजूला बलराम कृष्ण मंदिर लागते. येथून मंदिराचा परिसर सुरू होतो. मंदिर परिसर गाठताच तेथील रमणीय परिसर पाहून प्रवासाचा शीण कुठल्याकुठे पळून जातो. येथे चिरेबंदी अष्टकोनी पुष्करिणी असून, पुष्करिणीच्या पश्चिमेला लागूनच श्री शंकराचे भव्य मंदिर आहे. पुष्करिणीचे वैशिष्ट्य म्हणजे यात बाराही महिने पाणी असते. देवळाचे बांधकाम यादव घराण्यातील राजे रामदेव यांच्या कारकिर्दीत झाले आहे. मंदिराची उंची ५४ फूट आहे. प्रवेशद्वार पश्चिमेला असून, या दरवाज्यातून गाभाऱ्यात जाता येते. दरवाज्याच्या उंबरठ्याजवळ दोन्ही बाजूस सिंहांची शिल्पे आहेत. देवळासमोर दीपमाळ आहे. गाभाऱ्यात मध्यभागी श्री कनकेश्वराची उत्तराभिमुख पिंड आहे. शाळुंकेची लांबी ४ फूट असून, वर चांदीचा पत्रा बसवलेला आहे. मात्र सकाळच्या वेळी पूजाविधी चालू असताना, खऱ्या शिवलिंगाचे दर्शन घडते. देवळाच्या घुमटावरील कोरीव काम अत्यंत आकर्षक आहे. प्रवेशद्वारासमोर तुळशीवृंदावन असून, त्याला लागूनच शंकराची धुनी आहे. दीपमाळेच्या पलीकडे नगारखाना असून, नगारखान्याच्या नैऋत्य दिशेला भीमकुंड आहे. त्याला लागून देवाची फुलबाग आहे. देवालयाच्या पश्चिम बाजूला थोडे खाली गेल्यावर पात्रुबाईचे मंदिर आहे. या ठिकाणाहून खालच्या परिसराचे व अरबी समुद्र तसेच मुंबईचे मनोहर दृश्य दिसते. पुष्करिणीच्या वरील बाजूस असणाऱ्या श्रीरामसिद्धीविनायक मंदिराच्या अंगणापासून उत्तरेकडे ७०० ते ८०० फूट अंतरावर गायमुख असून, तेथपर्यंत पायऱ्या बांधलेल्या आहेत. वर गायीचे मुख असून, त्यातून खाली विष्णुकुंडात पाणी पडते. कनकेश्वर डोंगराच्या परिसरात अनेक वनौषधींची झाडे आढळतात. शिवाय पक्षीनिरीक्षणासाठीही इथे पक्षीप्रेमी येतात. वन्यजीवप्रेमींना इथे जंगलात खूप विविधता पाहता येईल. कनकेश्वर हे एक प्राचीन स्वयंभू शिवस्थान आहे. येथे दरवर्षी कार्तिक महिन्याच्या पौर्णिमेला फार मोठी जत्रा भरते.

अशा या निसर्गसंपन्न ठिकाणी भाविक व पर्यटकांच्या राहण्याची तसेच घरगुती जेवणाचीही उत्तम सोय आहे. राहण्यासाठी मंदिराची धर्मशाळा तसेच रामसिद्धीविनायक देवस्थानाने बांधलेल्या खोल्या आहेत.


कनकेश्वर मंदिर



जीवनेश्वर मंदिराचे प्रवेशद्वार



# जीवनेश्वर मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** जीवना बंदराकडे जाणाऱ्या रस्त्यावर जीवनेश्वर हे भगवान शंकरांचे कौलारू मंदिर आहे. मंदिराच्या आजूबाजूला प्रशस्त मोकळी जागा असून, मंदिरासमोर दोन मोठ्या दगडी दीपमाळा आहेत. मंदिरात शिरताना उजव्या बाजूस एक छोटीशी पुष्करिणी आहे. मंदिराच्या बाहेरील सभामंडप प्रशस्त असून, ते काष्ठकलेचे उत्तम नमुने आहेत. या खांबांवर फणा काढलेला नाग व त्याची शेपटी तोंडात पकडलेले मुंगूस तसेच पक्षी, प्राणी, योद्धे, देवदेवता अशी विविध प्रकारची नक्षी कोरलेली आहे. प्रत्येक खांबावरील नक्षीकाम पाहिल्यावर ते करणाऱ्या अज्ञात कलाकारांना मनोमनी दाद दिल्यावाचून राहवत नाही. दरवर्षी महाशिवरात्रीला या ठिकाणी मोठा उत्सव साजरा केला जातो.



योद्धे



खांबावरील फणा काढलेल्या नागाचे नक्षीकाम



शंकराचे कौलारू मंदिर व मंदिर परिसरातील दीपमाळ



सभामंडपातील काष्ठकलेचा उत्तम नमुना



नागाची शेपटी तोंडात धरलेले मुंगूस



इतर कोरीव काम



नंदी




# कुसुमेश्वर मंदिर, देवखोल

**(तालुका श्रीवर्धन)** श्रीवर्धनहून बोर्लीपंचतनकडे जाताना श्रीवर्धनपासून सुमारे ९ ते १० कि.मी. अंतरावर उजव्या बाजूस देवखोल फाटा लागतो. तेथून अडीच ते तीन कि.मी. अंतरावर दाट झाडीत कुसुमेश्वर हे शंकराचे पवित्र स्थान आहे. मंदिराच्या सभोवताली डोंगर व दाट झाडी असून, त्यात मध्यंतरीच्या काळात अनेक भग्नमूर्ती सापडल्या आहेत, ज्यामध्ये काही वीरगळ, सतीशिळा, देवांच्या मूर्ती यांचा समावेश असून सध्या त्या मंदिराच्या भिंतीलगत ओळीने मांडून ठेवल्या आहेत.

मुख्य मंदिरात मोठे शिवलिंग असून, सभामंडपात छोटे शिवलिंग आहे. बाहेरील बाजूस कौलारू छताच्या मंदिरात विष्णू व शिवपार्वतीची मूर्ती आहे. महाशिवरात्रीच्या वेळी येथे मोठा उत्सव साजरा केला जातो.



मंदिराच्या भिंतीलगत ओळीने मांडून ठेवलेल्या वीरगळ, सतीशिळा, देवांच्या मूर्ती



नवनाथांच्या मूर्ती

# दिवेआगर सुवर्ण गणेशमंदिर


**(तालुका श्रीवर्धन)** दिवेआार हे पर्यटनस्थळ प्रसिद्ध आहे ते तिथं १९९७ मध्ये सापडलेल्या दीड किलो वजनाच्या सोन्याच्या गणेश मूर्तीसाठी. २०१२ मध्ये ही पुरातन मूर्ती काही दरोडेखोरांनी चोरली आणि त्यांना पकडण्याआधीच वितळवली. सध्या या मंदिरात त्याच सोन्यापासून बनवलेली परंतु मूळ मूर्तीसारख्या दुसऱ्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे.

दिवेआगर हे अतिशय संपन्न गाव. नारळी, सुपारी आणि केळीची वाडी हे इथले पारंपरिक उद्योग. या गावावर पूर्वी पोर्तुगीज व अरबी चाच्यांचे सारखे हल्ले होत. लूटमार होई. या सर्वांपासून गावातील सुवर्ण गणेशमूर्तीचे संरक्षण व्हावे म्हणून गावकऱ्यांनी ही मूर्ती व दागदागिने जमिनीत पुरून ठेवले होते. १९९७ मध्ये गावकऱ्यांना ही पेटी गवसली. त्यात सापडलेल्या गणेश मूर्ती, दागिने यांची देवळात स्थापना करण्यात आली. या बाप्पाच्या मंदिराची ख्याती सर्वदूर पसरली. त्याच्या दर्शनासाठी आलेल्या पर्यटकांना दिवेआगरचा शांत सागरकिनाराही भावला. श्रीवर्धन येथील रूपनारायण आणि सुंदर नारायण यांच्या सुंदर मूर्तीही त्यामुळे प्रकाशझोतामध्ये आल्या. रूपनारायणाची मूर्ती उंच व सुबक असून एका अखंड शिळेतून घडवली आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूंना दशावतार कोरले आहेत. रूपनारायण मंदिराजवळ सुबक पायऱ्यांची विहीर आहे. दिवेआगरला येणारे पर्यटक हरिहरेश्वर व श्रीवर्धन या ठिकाणीही भेट देतात.




दिवेआगर सुवर्णगणेश मूर्ती










# उत्तरेश्वर मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** दिवेआगर गावाच्या उत्तर टोकाला असलेले हे एक शिवमंदिर आहे. पूर्वी हे मंदिर दीपमंदिर म्हणून ओळखले जाई. पेशवे घराण्याचे हे परंपरागत श्रद्धास्थान आहे. या मंदिराच्या प्रांगणात शंकर, काळभैरव व मारुतीचे मंदिर आहे. सध्या या मंदिराची पुनर्बांधणी करण्यात आली आहे.




# वीरेश्वर मंदिर,

**(तालुका महाड)** महाडमधील हे एक आराध्य दैवत आहे. मंदिर खूप प्राचीन असून पेशव्यांच्या काळात या मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. छत्रपती शिवाजी महाराज वीरेश्वराच्या दर्शनास अनेक वेळा येऊन गेल्याचे इतिहास सांगतो. महाशिवरात्रीपासून आठवडाभर या ठिकाणी यात्रा भरते. वीरेश्वराचा छबिना दरवर्षी फाल्गुन शुद्ध द्वितीयेला निघतो. यात झुलाई देवी, बहिरीनाथ, रवळनाथ, जाखमाता, कुटेश्वरी माता इत्यादींच्या पालख्याही इथे येतात. हे शंकराचे स्वयंभू व जागृत स्थान मानले जाते.

देवळाची बांधणी घडीव दगडी बांधकाम पद्धतीची असून बांधकामासाठी लागलेला दगड हा देवळासमोरील जागेतूनच खोदून काढण्यात आला होता. या दगडाच्या खाणीतून आपोआपच एक सुंदर तलाव तयार झाला. मंदिर व नंदींची मेघडंबरी यांच्यामध्ये भव्य सभामंडप उभारण्यात आला आहे.



शंकराचे स्वयंभू व जागृत स्थान



महाशिवरात्रीची यात्रा



भुवनेश्वर मंदिर



# भुवनेश्वर मंदिर, नारंगी

**(तालुका अलिबाग)** अलिबागपासून १५ कि.मी. व रेवसपासून १० कि.मी. अंतरावर असलेल्या नारंगी गावातील श्री शिव शंकराचे प्राचीन भुवनेश्वर मंदिर हे जागृत देवस्थान आहे. येथे शंकराच्या पिंडीवर जटाधारी शंकर विराजमान झालेले असून शेषाने फणा काढलेली मूर्ती आहे. हे एक पर्यटनस्थळही आहे. इथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.


श्री भोनेश्वराचे श्री क्षेत्र भुवनेश्वर हे श्री कनकेश्वराच्या पूर्वेकडील डोंगर पायथ्याशी आहे. मंदिराच्या दक्षिणेस श्री गंगा सतत वाहत असून उत्तरेकडे तलाव आहे. त्या तलावाच्या कोपऱ्यावर श्री वृक्ष (बेलाचे झाड) होते. 'श्री गंगेत स्नान करून श्री वृक्षाची पाने घेऊन श्री तीर्थाचे दर्शन करावयाचे,'अशी पूर्वापार प्रथा होती असे समजते. मंदिराची बांधणी शिवकालीन असल्याचे दिसून येते. सध्या अस्तित्वात असलेल्या मंदिरासमोर श्री पंडित यांच्या जमिनीवर पुरातनकालीन मंदिराचे भग्न अवशेष पहावयास मिळतात.

**या ठिकाणी पोहोचण्यासाठी** अलिबाग हाशिवरे मार्गे रेवस एस.टी. दर तासाला असते. अथवा सहाआसनी रिक्षाद्वारे अलिबाग-मुंबई मार्गावरील कार्लेखिंड येथून भुवनेश्वरला जाता येते.



# शितळादेवी मंदिर, चौल-आग्राव

**(तालुका अलिबाग)** अलिबाग स्थानकापासून सुमारे १७ कि.मी. अंतरावर, तर चौल नाक्यावरून अंदाजे तीन कि.मी. अंतरावर पुरातन असे शितळादेवी मंदिर आहे. मंदिरात जाण्यासाठी अलिबाग स्थानकातून अलिबाग-रेवदंडा एसटीने चौलनाका येथे उतरावे लागते. तेथून मंदिरापर्यंत जाण्यासाठी रिक्षांची सोय आहे.



शितळादेवी माता

स्वतःचे वाहन असल्यास थेट मंदिरापर्यंत जाता येते. हे आंग्रेकालीन मंदिर लाकडी व कौलारू होते. त्याचा १९९० मध्ये जीर्णोद्धार करण्यात आला. मंदिरास पूर्वाभिमुख मुख्य प्रवेशद्वाराशिवाय उत्तर व दक्षिण बाजूसही प्रत्येकी एक प्रवेशद्वार आहे. येथील देवीचे स्थान हे जागृत समजले जाते. त्यामुळे या मंदिराला बरेच भाविक पर्यटक आवर्जून भेट देतात.

सोमजा देवीची मूर्ती





# सोमजाई मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** श्रीवर्धनच्या मुख्य रस्त्यावर सोमजाईचे जागृत देवस्थान आहे. मंदिराच्या पटांगणातून वर मंदिरात जाण्यासाठी पायऱ्या बांधून काढण्यात आल्या आहेत. देवीचे मूळ मंदिर कौलारू असून, मंदिराबाहेर भव्य सभामंडप आहे.

या मंदिराची स्थापना अगस्ती मुनींनी केली असल्याचे मानले जाते. सोमजाई देवी शाळिग्राम स्वरूपात असून, शिव, भवानी, नंदी, वासुकी या चार शक्तिंचा सोमजाई या नावात संगम झाला आहे. मंदिर पंचायतन पद्धतीचे असून, सोमजाईच्या मुख्य स्थानाबरोबर मंदिराच्या चतु:सीमेस कंकाळी, भद्रकाळी, कात्यायनी, चामुंडायनी या चार शिवशक्तींच्या घुमट्या आहेत. सोमजाई व हरिहरेश्वर दर्शन एकाच दिवशी करण्यासाठी भाविक येथे येत असतात.

दत्त मंदिर



मंदिरापर्यंत जाणाऱ्या पायऱ्या



त्रिमुखी दत्त मूर्ती





# दत्तमंदिर, चौल-भोवाळे

**(तालुका अलिबाग)** अलिबागपासून १६ कि.मी. अंतरावर, तर चौल नाक्यावरून २ कि.मी. अंतरावर भोवाळे या निसर्गरम्य गावातील डोंगरावर हे दत्तमंदिर व मठ आहे. डोंगराच्या पायथ्याशी उभे राहिल्यावर पायऱ्या-पायऱ्यांनी मंदिराकडे जाणारा रस्ता अत्यंत विलोभनीय वाटतो. साधारण पाचशे पायऱ्या चढून गेल्यावर डाव्या हाताला लहानसा 'श्री स्वामी समर्थ अक्कलकोट निवासी' मठ आहे. पुढे साधारण पंचवीस-तीस पायऱ्या चढून गेल्यावर श्री दत्तमंदिर विश्रांतीस्थान म्हणून सद्गुरू श्रीमंत श्री. हिराजीनाथ पी. बेडेकर महाराज सभागृह लागते. पुढे सुमारे दीडशे पायऱ्यांनंतर सच्चिदानंद साधना कुटी आहे. त्यापुढे हरे राम विश्रामधाम, त्यानंतर हरे राम बाबांचे धुनीमंदिर, त्यापुढे औदुंबर मठ पाहावयास मिळतो. मंदिराच्या दक्षिणेला माई जानकीबाई व हनुमानदासबाबा यांचा मठ आहे.


दत्तमंदिरातील दत्तमूर्ती त्रिमुखी, सहा हात असलेली, पाषाणाची आहे. देवळाभोवती प्रदक्षिणेसाठी मोकळी जागा आहे. इथे प्राचीन काळापासून एक अध्यात्म केंद्र होते. दरवर्षी पाच दिवस दत्तजयंतीचा उत्सव साजरा केला जातो. या पाच दिवसांत फार मोठी जत्रा भरते. येथे एकमुखी दत्ताची मूर्ती असून सर्व पंथांचे व धर्माचे लोक भक्तिभावाने येत असतात.


# दत्तमंदिर, मुरूड

**(तालुका मुरूड)** मुरूड शहराच्या उत्तरेस छोट्या टेकडीवर प्राचीन दत्तमंदिर आहे. मंदिराच्या टेकडीला दत्ताचा डोंगर म्हणून ओळखतात.

सरखेल कान्होजी आंग्रे यांचे आध्यात्मिक गुरू ब्रह्मेंद्रस्वामी यांनी दत्तपादुका स्थापून हे मंदिर उभारल्याचे म्हटले जाते. साधारण तीनशे-सव्वातीनशे पायऱ्या चढून मंदिरात जावे लागते. दत्तमंदिराचे स्वरुप आता जीर्णोद्धारामुळे आमूलाग्र बदलले आहे. मंदिराच्या चहुबाजूंस विस्तीर्ण मोकळी जागा आहे. या ठिकाणाहून शहराचे दर्शन घेतल्यास, पूर्णपणे नारळी-पोफळीच्या बागा दिसतात. काही वर्षांपूर्वी डोंगराच्या दक्षिण दिशेस अलकापुरी या ठिकाणापासून मंदिरापर्यंत जाण्यासाठी रस्ता तयार करण्यात आला. त्यामुळे पर्यटकांना गाडीने थेट मंदिरापर्यंत जाता येते.

कासा किल्ल्याजवळ सायंकाळी होणारा सूर्यास्त या ठिकाणावरून पाहणे म्हणजे निसर्गप्रेमींसाठी पर्वणी असते. अस्त पावणारा सूर्य जेव्हा समुद्राच्या पाण्यात क्षितिजाकडे आपले रंग मिसळतो, तेव्हा पाहणाऱ्याचे देहभान हरपते.





दत्ताची मूर्ती






रूपनारायणाची मूर्ती



सुंदरनारायणाची मूर्ती



# रूपनारायण व सुंदरनारायण मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** दिवेआगरच्या समुद्रकिनाऱ्याजवळ श्री रूपनारायणाचे मंदिर व शेजारी एक पुष्करिणी आहे. पुष्करणीच्या मागे सुंदरनारायणाचे मंदिर आहे. या मंदिरांचा जीर्णोद्धार करण्यात आला आहे.

रूपनारायणाची मूर्ती ही दाक्षिणात्य शिल्पकलेचा अजोड नमुना असून, ती शिलाहारकालीन म्हणजेच इ.स. ८०० ते १२६५ या काळातील असावी. सुमारे दीड मीटर उंचीची शिल्पसौंदर्याचा अद्भुत आविष्कार असणारी ही मूर्ती अत्यंत रेखीव, सुबक व नाजूक कलाकुसरीची आहे. मूर्तीच्या प्रभावळीत दशावतार कोरलेले आहेत. एका अखंड पाषाणातून कोरून घडविलेल्या या मूर्तीला 'रूपनारायण' का म्हणतात, ते मूर्तीचे सौंदर्य पाहिल्यावर लगेच लक्षात येते.

सुंदरनारायण मंदिर





## साजगांवचा बोंबल्या विठोबा


पेण खोपोली मार्गावर खोपोलीजवळील साजगांव येथील एका छोट्या टेकडीवर बोंबल्या विठोबाचे मंदिर आहे. या ठिकाणी कार्तिकी एकादशीपर्यंत १५ दिवस मोठी यात्रा भरते. संत तुकाराम महाराजांच्या काळापासून स्वत: महाराज बाजार करण्यासाठी या जत्रेला येत.



**मासळी बाजार**

**यात्रा**





# विठ्ठल मंदिर, वरसोली

**(तालुका अलिबाग)** प्रतिपंढरी म्हणून संपूर्ण अलिबाग तालुक्यात ओळखल्या जाणाऱ्या वरसोलीच्या श्री विठ्ठल रखुमाई मंदिराची स्थापना सन १७७१ मध्ये श्रीमंत राघोजीराजे आंग्रे यांच्या पत्नी नर्मदाबाई यांनी केली. सध्या मंदिराचा जीर्णोद्धार झाला असून मंदिर नवीन स्वरूपात उभे आहे. कार्तिक महिन्याच्या एकादशीला मंदिर परिसरात ५ दिवस मोठी यात्रा भरते. प्रत्येक एकादशीस मंदिर परिसरात पंधरवडा बाजार भरतो.






# लक्ष्मीनारायण मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** सोमजाई मंदिरापासून पुढे जवळपास अर्ध्या कि.मी. अंतरावर नारायण पाखाडीत लक्ष्मी नारायण मंदिर असून ते भट पेशवे घराण्याचे एक प्रमुख उपास्य दैवत आहे.

श्रीवर्धन गावाचे भूषण असलेल्या लक्ष्मीनारायण मंदिराचे प्रांगण प्रशस्त असून त्यात एक पुष्करिणीदेखील आहे. गाभाऱ्यातील श्री लक्ष्मीनारायणाची मूर्ती खूप प्राचीन म्हणजेच जवळपास अकराव्या शतकातील शिलाहारकालीन असावी, असे जाणकार लोक सांगतात. सुमारे दोन फूट उंचीची, काळ्या पाषाणाची ही मूर्ती दक्षिण भारतीय शैलीची आहे. अतिशय रेखीव, प्रमाणबद्ध असलेल्या या मूर्तीच्या उजव्या पायाशी विष्णूचे वाहन गरुड व डाव्या पायाशी लक्ष्मी आहे. याशिवाय जयविजय दोन्ही बाजूस उभे आहेत. प्रभावळीवर किर्तीमुखाच्या दोन्ही बाजूंस दशावतार कोरलेले आहेत. सभामंडपात प्रवेशद्वाराकडून दुसऱ्या चौकोनी वाशावर देवनागरी लिपीतील एक काष्ठलेख नजरेस पडतो. त्यावरून २९ मार्च १७७५ रोजी मंदिराचा जीर्णोद्धार झाला असे समजते.



## उन्हेरे

पाली येथून दीड कि.मी. अंतरावरील या गावी गरम पाण्याचे झरे आहेत. पाण्यातील औषधी गुणधर्मामुळे बरेच लोक येथे स्नानासाठी येतात.



पेशवे मंदिर



# पेशवे मंदिर,

**(तालुका श्रीवर्धन)** श्रीवर्धनमधील पेशवे पाखाडीत गेल्यावर आपल्याला छोटेखानी बुरूज, प्रवेशद्वार, वर नगारखाना व सभोवताली तट असे अलिकडच्या काळातील बांधकाम नजरेस पडते. हेच ते पेशवे मंदिर. या ठिकाणी पहिले पेशवे श्रीमंत बाळाजी विश्वनाथ भट यांचा जन्म झाला होता.

पेशवे घराण्याच्या मूळ वास्तूची पडझड झाल्याने त्या जागी नवीन वास्तू उभारली गेली. परंतु, काळाच्या ओघात तीही नष्ट झाली व सन १९६१ मध्ये पुन्हा नवीन इमारत उभारली गेली. आज येथे असलेली ही इमारत जरी अलिकडील असली, तरी त्याचे जोते ही पेशव्यांच्या पूर्वीच्या घराची खरी निशाणी आहे. या इमारतीसमोर असलेला श्रीमंत बाळाजी विश्वनाथ पेशवे यांचा पूर्णाकृती पुतळा ११ मार्च १९८८ रोजी उभारण्यात आला. या पुतळ्याच्या चौथऱ्यावर समोरच्या बाजूस बाळाजी विश्वनाथ पेशवे यांची मुद्रा शिल्पांकित केलेली असून एका बाजूस शाहू महाराज व दुसऱ्या बाजूस ब्रह्मेंद्रस्वामी यांची शिल्पे आहेत.

धावीर महाराज मंदिर





# धावीर महाराज मंदिर,

**(तालुका रोहा)** रोहे गावाचे हे ग्रामदैवत. हे मंदिर मोरे नावाच्या भक्ताने इ. स. १८४४ मध्ये बांधले. सर्व जातिधर्मांच्या लोकांचे हे श्रद्धास्थान असून येथे दरवर्षी मोठा उत्सव साजरा केला जातो. धावीर महाराजांच्या उत्सवाच्या वेळी या देवस्थानास पोलिसांची मानवंदना देण्याची ब्रिटिशकालीन पद्धत आजही सुरू आहे.

शहराच्या पश्चिम बाजूला हनुमान टेकडीच्या पायथ्याशी असलेल्या या भव्य मंदिरामध्ये गाभाऱ्यात श्री धावीर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा, वाघबाप्पा, मागे तीन वीरा यांचे स्थान आहे.






सिद्धनाथ मूर्ती


केदारनाथ मूर्ती


सिद्धनाथ भैरव मंदिर


केदारनाथ भैरव मंदिर

# श्रीसिद्धनाथ भैरव व श्रीकेदारनाथ भैरव मंदिर

**(तालुका श्रीवर्धन)** गावात श्रीकेदारनाथ भैरवाचे एक कौलारू मंदिर असून, त्याच रस्त्याने थोडे पुढे गेल्यावर लागणारे दुसरे कौलारू मंदिर म्हणजे श्रीसिद्धनाथ भैरव मंदिर. दगडी बांधकामाच्या या मंदिराजवळ भरपूर मोकळे पटांगण असून, त्यामध्ये एक खांब रोवलेला आढळतो.




सुंदर मठाचे मुख्य प्रवेशद्वार

# शिवथरघळ

**(तालुका महाड)** महाड – शिवथर रस्त्याने सुमारे ३४ किमीवर ही निसर्गनिर्मित गुहा आढळते. मराठी वाङमयात शिवथरघळीला महत्त्व आले ते समर्थ रामदासस्वामींच्या वास्तव्याने. सुमारे ३८ मी. लांब व २३ मी. रुंद असलेल्या या घळीत अंदाजे १२५ माणसे बसू शकतात. प्रवेशाजवळ डाव्या बाजूस एक निसर्गनिर्मित दगडी खांब घळीच्या तळापासून छतापर्यंत गेल्याने घळीची बळकटी वाढली आहे. उजव्या बाजूस सुमारे १५ मी. उंचीवरून कोसळणारा धबधबा डोळ्यांचे पारणे फेडतो. सन १६५०च्या सुमारास रामदासांनी चाफळला राम मंदिराची स्थापना केल्यानंतर ते शिवथरघळीत राहण्यास आले. त्यानंतर ते इतर ठिकाणी आले गेले, तरी शिवथर हेच त्यांच्या वास्तव्याचे मुख्य ठिकाण होते. १६७६ पर्यंत ते येथे राहिले. या वास्तव्यात समर्थांनी दासबोध या महान ग्रंथांचा बराच भाग लिहिला असे मानतात.

१९५० नंतर शिवथरघळीच्या जीर्णोद्धाराचे कार्य हाती घेण्यात आले. सिमेंट प्लास्टरच्या



सुंदर मठ



सुंदरमठालगतच्या विहिरीजवळ गुरांसाठी पाणपोई


शिवथरघळ



दासबोध ग्रंथाचे जन्मस्थळ


रामदास स्वामी राहत असलेली गुहा



१५ मी. उंचीवरून
कोसळणारा धबधबा

सुमारे २२५ ग्रॅम वजनाच्या रामदास स्वामी व कल्याणस्वामींच्या बैठ्या मूर्तींची माघ शुद्ध ८, शके १८८१ रोजी घळीत मध्यभागी असलेल्या उंचवट्यावर प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. रामदासांच्या डाव्या बाजूस पाठीमागच्या दगडात एक मारुतीची मूर्ती बसविली आहे. त्याच बाजूच्या कोपऱ्यात दि. २० मार्च १९६१ रोजी राम, सीता व लक्ष्मण यांच्या लहान परंतु मनमोहक संगमरवरी मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. घळीच्या परिसरात ७ खोल्यांचा साधक आश्रम, भोजन मंडप, सभागृह तसेच निवासासाठी कल्याण मंडप व त्यावर ध्यानमंदिर इत्यादी वास्तू आहेत.






समर्थ रामदास स्वामी 'दासबोध ग्रंथ'
कल्याण स्वामींना सांगताना



राम, सीता व लक्ष्मण यांच्या
मनमोहक संगमरवरी मूर्ती



दासबोध श्लोक



नागेश्वर मंदिर

## आवास

**(तालुका अलिबाग)** नागेश्वराचे जिल्ह्यातील एकमेव मंदिर. साप चावल्यावर इथे आणल्यास विष उतरते, अशी भाविकांची आजही श्रद्धा आहे. दिवाळीनंतर इथे मंदिराची खूप मोठी जत्रा भरते. दोन दिवस चालणाऱ्या जत्रेत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक येतात.

आवास समुद्रकिनारी एक प्राचीन मंदिर आहे. त्यात एक छोटी होडी आहे. महाभारतात पांडव अज्ञातवासात याच होडीतून इथे आले व मग पुढे गेले अशी आख्यायिका आहे.



मंदिराचे प्रवेशद्वार




मुख्य प्रवेशद्वार



नागेश्वराची मूर्ती



आवास बीच



## गगनगिरी आश्रम

खोपोलीमध्ये पाताळगंगा नदीकिनारी गगनगिरी महाराजांच्या वास्तव्याने पुनीत झालेला आश्रम आहे. शांत व निसर्गरम्य परिसरातील या आश्रमात भाविकांची गर्दी असते.

# शंकरगिरी महाराज मठ

**(तालुका अलिबाग)** अलिबागला लाभलेले आणखी एक अध्यात्म क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व म्हणजे शंकरगिरी महाराज. अलिबागपासून १५ ते १८ किमी अंतरावरील रेवस बोडणी गावाजवळ महाराजांचा मठ आणि समाधीस्थान आहे. दरवर्षी त्यांच्या प्रकट आणि समाधी दिवसाला जगभरातून अनुयायी येतात.

कनकेश्वराच्या पायथ्याशी शंकरगिरी महाराजांचा मठ आहे. येथून सुमारे २ ते ३ कि.मी. अंतरावर जंगलात श्री. शंकराचे पुरातन देवालय आहे. गोल आकाराची भव्य पुष्करणी, अनेक छोटी–छोटी मंदिरे, धर्मशाळा, मनाबाईचा मठ, केतकीचे बन व आमराई यांनी हा परिसर विलोभनीय झालेला आहे. श्रावणी सोमवार, शिवरात्र, त्रिपुरारी पौर्णिमा असे अनेक धार्मिक उत्सव व सण येथे नेहमीच साजरे होत असतात. मुंबई जवळ असल्याने अनेक भाविक पर्यटक नेहमीच येथे येत असतात.

कनकेश्वर आणि म्हात्रोळी गांव या दोन्ही ठिकाणी वास्तव्य केलेली संत शंकरगिरी महाराज ही विभूती. गिरनार येथे दीर्घकाळ तपश्चर्या केल्यानंतर त्यांनी कनकेश्वर येथे डोंगराच्या कपारीमध्ये वास्तव्य केले. तेव्हा त्यांनी त्यातील जंगली श्वापदांना आपलेसे केले होते.

गिरनार पर्वतावर असणारा त्यांचा धुनीमठ त्यांनी करंजा येथील एका गुजराती भक्ताच्या प्रेमाखातर सोडून प्रथम द्रोणागिरी व नंतर कनकेश्वर असे प्रयाण केले.

जवळच मनाआई नावाच्या योगिनीची तपसाधनेची जागा व अश्वत्थ वृक्ष आहे. जवळच अन्नपूर्णा मातेचे स्थान आहे. या योगिनी कुंभमेळ्यासाठी गेल्या असता त्यांची भक्ती, त्यांचे तपोसामर्थ्य जाणून इतर साधुसंतांनी त्यांना आदराने गौरविले. कनकेश्वर येथे असणारा दीपस्तंभ श्रावणी सोमवार, शिवरात्र, त्रिपुरारी पौर्णिमा यावेळी सुशोभित केला जातो. आवास येथील नागेश्वराची यात्रा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी येथील यात्रा असते. ह्या दिवशी हा दीपस्तंभ प्रज्वलित केला जातो.


शंकरगिरी महाराजांनी कनकेश्वराच्या सान्निध्यातूनच पायथ्याशी असणाऱ्या म्हात्रोळी गावामध्ये भक्तांच्या सान्निध्यात राहण्यासाठी वास्तव्य केले. तिथे त्यांची मठी आहे. याचबरोबर त्यांनी म्हात्रोळी येथील करंजादेवी मंदिराचा जीर्णोद्धार व्हावा यासाठी स्वत: हजर राहून जुन्या शिलांची विधीपूर्वक मांडणी करून सभामंडप व नवीन मंदिराची उभारणी केली. ग्रामदेवतेची पूजाअर्चा ग्रामस्थांच्या उन्नतीला कारणीभूत ठरते असा संदेश त्यांच्या कृतीद्वारे ग्रामस्थांना मिळाला.

शंकरगिरी महाराज मठ





शंकरगिरी महाराज



शंकरगिरी महाराज समाधी



काळ नदीवरील पूल व वरदायिनी देवी मंदिर




वरदायिनी माता

# वाळणकुंड

**(तालुका महाड)** महाडच्या ईशान्येस सुमारे २० किमी अंतरावर दापोलीजवळ काळ नदीतील हे नैसर्गिक कुंड त्यातील पवित्र बनलेल्या हजारो रंगीबेरंगी माशांसाठी प्रसिद्ध आहे. इथले लोक मासे खाण्यासाठी मारत नाहीत, तर त्यांना देव मानून पूजतात. हे कुंड ९० मी लांब व १० मी रुंद आहे. याची खोली मोजता येत नाही असा समज आहे. कुंडात विविध प्रकारचे मासे आहेत. दरीवर उंच पूल आहे. त्यावरून पाव वा खाण्याचा पदार्थ टाकल्यास पाण्यातून हजारो लहानमोठे मासे वर येतात. इथे देवीची जत्रादेखील भरते.




काळ नदी



वाळणकुंडातील विविध प्रकारचे मासे

# सव

**(तालुका महाड)** महाडच्या पश्चिमेस तीन कि.मी. अंतरावर सावित्री नदीच्या तीरावरील सव या गावी गरम पाण्याचे तीन झरे आहेत. या झऱ्यांभोवती दगडाचे हौद बांधलेले असून झऱ्याचे पाणी गंधकमिश्रित आहे. या पाण्यात स्नान केल्याने त्वचारोग बरे होतात असे म्हटले जाते. मुंबई गोवा महामार्गावरून खाडीच्या पलिकडे असलेल्या सव गावात जाण्यासाठी होडीची सोय आहे.



गरम पाण्याचे कुंड




साविती नदी



होडीची सोय





गरम पाण्याची कुंडे

## उद्धर

**(सुधागड तालुका)** पालीजवळील या गावी एका टेकडीवर पुरातन रामेश्वर मंदिर आणि गरम पाण्याची कुंडे आहेत. येथे रामाने जटायूचा उद्धार केला होता. त्यावरून या गावास उद्धर व मंदिरास उद्धर रामेश्वर असे नाव पडले असावे. नदीच्या काठी रामेश्वराचे देवालय असून या अष्टकोनी देवळासमोर सभामंडप व ९ मी. उंचीची दीपमाळ आहे. देवळाच्या भिंतीवर देवीच्या मूर्ती कोरलेल्या आहेत व दक्षिण बाजूस एका कोनाड्यात आस्तिक ऋषींच्या पादुका आहेत. त्यासमोर एक शिळा आहे. महाशिवरात्रीला येथे यात्रा भरते.



अस्थिविसर्जन कुंड



## अफनासी निकितीन स्मृतिस्तंभ - रेवदंडा

**(तालुका अलिबाग)** रेवदंड्याच्या मुख्य रस्त्यावर, सरदार रावबहादूर तेंडुलकर विद्यालयाच्या आवारात भारतात पाचशे वर्षांपूर्वी आलेला पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन याचा स्मृतिस्तंभ आहे. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात रशियात जन्मलेल्या या प्रवाशाने चौल ते पाली, पाली ते मुंब्रा आणि मुंब्रा ते जुन्नर असा एकूण चोवीस दिवस प्रवास केला. या प्रवासाच्या नोंदी व वर्णने त्याने लिहून ठेवली आहेत. इ. स. १४७० मध्ये केलेल्या या प्रवासाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा काळा, संगमरवरी लादी लावलेला, निमुळता स्तंभ भारत-रशिया मैत्रीचे प्रतीक म्हणून भारतातील रशियन वकिलातीस १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, १७ जानेवारी २००२ रोजी उभारण्यात आला.

कोकण एज्युकेशन सोसायटी, अलिबाग आणि रशियन सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रेवदंडा येथील तेंडुलकर विद्यालयाच्या प्रांगणात भारतात येणारा पहिला रशियन प्रवासी अफनासी निकितीन यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ एक स्मृतिस्तंभ उभारण्यात आला आहे. अफनासी निकितीन या रशियन प्रवाशाने जवळपास ५०० वर्षांपूर्वी भारतास भेट दिली होती. त्यावेळी तो प्रथम रेवदंडा बंदरावर उतरला होता. म्हणून त्याचे स्मारक या ठिकाणी बांधण्यात आले. या रशियन प्रवाशाच्या भारतातील प्रवासवर्णनामुळे त्याकाळी भारताबद्दलची योग्य ती माहिती भारताबाहेर पोहोचली.



# ईदगाह

**(तालुका मुरूड)** दत्तमंदिरापासून सुमारे दीड किमी अधिक उंचीवर गेल्यास नवाबकालीन ईदगाह दिसतो. ईदगाहवरून सूर्यास्त तर दिसतोच, शिवाय दत्तमंदिराची टेकडी इथून खूपच विलोभनीय भासते. आजूबाजूस जंगल व उंच डोंगर यामुळे नैसर्गिक शांतीची वेगळीच अनुभूती या परिसरात अनुभवण्यास मिळते.




हजरत अली शाह दरबार

# हजरत अली शाह दरबार

**(तालुका अलिबाग)** हिंदू व मुस्लीम धर्मियांच्या ऐक्याचे प्रतीक असलेला हा दर्गा अलिबागमधील जुन्या नगरपालिकेच्या इमारतीजवळ आहे. दर्ग्यात तीन समाधी असून त्यापैकी एक बाबांची तर इतर दोन त्यांच्या शिष्यांच्या आहेत. हजरत अली शाह हे एक फकीर होते व ते कान्होजी आंग्रे यांना गुरूस्थानी होते. त्यामुळेच कान्होजींनी या शहराचे अलिबाग असे नामकरण केले.



प्रार्थना मंदिर

# बेने इस्रायली आळी

**(तालुका अलिबाग)** ज्यू लोकांचे हे प्रार्थनामंदिर सन १८४० मध्ये अलिबाग येथील इस्रायल आळी येथे बांधण्यात आले. इंग्रज लष्करातील इस्रायली लोकांचे पेन्शनर बांधव यांनी बांधलेले हे मंदिर लहान असल्याने नंतरच्या काळात मूळ जागेवरच नवे प्रार्थनामंदिर बांधण्यात आले. २५ डिसेंबर १९१० रोजी हे मंदिर उघडण्याचा संस्कार करण्यात आला व त्याचे मागेन आबोथ (वडिलांची ढाल) असे नामकरण करण्यात आले. येथे दर शुक्रवारी सायंकाळी ज्यू बंधुभगिनी प्रार्थना करतात. तसेच या मंदिरात ज्यू लोकांचे विवाह संपन्न होतात.

इस्रायल आणि जगभरातील विविध देशांत मराठी भाषा बोलणारे जवळपास ८० हजार लोक आहेत. त्यांना बेने इस्रायली असे संबोधले जाते. इस्रायलच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रातून बहुतांशजण त्यांच्या कुटुंबीयांसह तिथे स्थलांतरित झाले. मात्र मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांच्याशी जोडली गेलेली त्यांची नाळ आजही कायम आहे.

साधारणपणे दोन हजार वर्षांपूर्वी ज्यू लोकांना घेऊन जाणारे एक जहाज अलिबागजवळील एका खडकावर आदळून फुटले. या जहाजावरील अनेक लोक मृत्युमुखी पडले तर १४ जण वाचले. त्यात सात महिला आणि सात पुरुषांचा समावेश होता. ते नवगांव येथील किनाऱ्याला आले. जहाज अपघातात मृत्युमुखी पडलेल्या साथीदारांचे त्यांनी नवगांव समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या एका जागेत अंत्यसंस्कार केले. भारतातील ज्यू लोकांची ही पहिली दफनभूमी म्हणून ओळखली जाते. बोटीत मृत्युमुखी पडलेल्या लोकांच्या स्मरणार्थ येथे एक स्मारक उभारण्यात आले आहे. तेथे जगभरातून हजारो इस्रायली बांधव भेट देत असतात.

ज्यूंवर होत असलेल्या अत्याचारांमुळे ते जगभरात स्थलांतरित झाले. मात्र ते जिथे गेले तिथे त्यांच्यावर अत्याचार झाले. भारत हा एकमेव असा देश होता ज्या देशाने त्यांना आपलेसे केले. त्यांना प्रेम दिले. भारतात राहून आपला धर्म आणि संस्कृती जोपासण्याचे स्वातंत्र्य त्यांना मिळाले. त्यामुळे भारताबद्दल बेने इस्रायली लोकांमध्ये आदर आहे.




बेने इस्रायली आळी




बेने इस्रायली लोकांच्या स्मरणार्थ बांधलेले स्मारक

# इतर







# घोणे यांचे काष्ठशिल्प संग्रहालय

**(तालुका रोहा)** मुंबई गोवा महामार्गावर कोलाड रेल्वे स्थानकाजवळ प्रतिभासंपन्न अशा श्री. रमेश घोणे यांचे काष्ठशिल्प संग्रहालय आहे. वाळून निष्पर्ण झालेली झाडे, लाकडाचे ओंडके, टाकाऊ शुष्क लाकडे यातून टिकाऊ सौंदर्य निर्मिण्याची कला श्री. घोणे यांनी जोपासली आहे. निर्जीव काष्ठातून जिवंत शिल्प साकारण्याची कला त्यांच्या अंगी आहे. कोलाडमधील या संग्रहालयात लाकडापासून बनवलेले मुखवटे, देवांच्या मूर्ती, फ्लॉवरपॉट अशा विविध प्रकारच्या वस्तू आहेत.



# करमरकर शिल्पालय

**(तालुका अलिबाग)** अलिबागपासून सुमारे १८ किमी अंतरावर सासवणे गावाजवळ असलेले करमरकर म्युझियम म्हणजे कलाप्रेमींसाठी जणू पर्वणीच. विनायक करमरकर या जगविख्यात शिल्पकाराने घडवलेली अक्षरश: जिवंत वाटणारी अशी अनेक शिल्पे आजही या म्युझियममध्ये कलारसिकांना नेत्रसुख देत दिमाखात उभी आहेत. यामध्ये मानवी शिल्पांचा समावेश होतो. त्यातही मानवी चेहऱ्यांवरील भावभावना विशेष आकर्षक आहेत.








मोरा धक्का



# उरण


**(तालुका मुख्यालय)** हे गांव मुंबईच्या आग्नेयेस समुद्रमार्गे ११ कि.मी. वर आहे. उरणजवळील मोरा ते मुंबई लाँच सेवा सुरू असते. उरणचे प्राचीन नाव उरूण किंवा उरणे असे असावे. चाणजे इ.स. १२६० व रानवड इ.स. १२५९ शिलालेखांमध्ये उरण विभागाचा उल्लेख आला असून त्यावरून हे गांव मुख्य ठाणे असावे. उरण हे गांव कारंजा बेटावर वसले आहे. या परिसरात द्रोणागिरी डोंगर, करवली डोंगर, पुरातन शंकर मंदिर, मोरा धक्का, पोर्तुगीज किल्ल्याचे बुरूज, जामा मशिद, कॅथॉलिक चर्च, भीमाळे तलाव ही प्रेक्षणीय स्थळे आहेत. उरणला फार पूर्वीपासून मिठागरे आहेत. येथून मिठाची निर्यात होते.

कारंजा बेटावरील प्राचीन अवशेषांमध्ये करवली किंवा खारवली डोंगराच्या पूर्वेस बौद्ध लेणी व द्रोणागिरी डोंगरावर काही साध्या गुहा आहेत. द्रोणागिरी म्हणजेच कारंजा टेकडीवर पूर्वी किल्ला होता. १५३० मध्ये पोर्तुगिजांनी त्याची डागडुजी केली. किल्ल्यावर गार्डहाऊस व चर्चचे अवशेष पाहावयास मिळतात.

किल्ल्यावर गर्गोणी व निजोणी हे पाण्याचे हौद आहेत. शहरात अजून जुनी व नवी देवळे आहेत. एका तळ्यात सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी विठ्ठलदास रामजीला सापडलेल्या बालाजी मूर्तीची स्थापना बालाजी मंदिरात केलेली आहे. या परिसरात भेंडखळची गांवदेवी, चाणजेची पूर्णावती, भुवनेश्वर व जैन मंदिर, बोरीचा होणेश्वर, रानवडचा गणपती, मोराचा उमरदेव, मांगीर देव ही जुनी दैवते आहेत.




द्रोणागिरी मंदिर



शुद्धता माता चर्च


नागोबा मंदिर


नऊ नागांची प्रतिमा

# नागांवची मंदिरं

नागांव येथील समुद्रकिनारा पर्यटकांनी गजबजलेला असतो. नागांव येथे भीमेश्वर, वंकनाथ, नागनाथ, गणपती, राम, विठोबा, मारुती, बहिरी देवी इ. देवदेवतांची मंदिरे आहेत.


गावाच्या सुरुवातीलाच नऊ नागांची शिल्पे असलेले छोटे मंदिर आहे. मंदिरात एका चौथऱ्यावर नऊ नागांची शिल्पे मांडून ठेवली आहेत. या नऊ नागांच्या शिल्पामुळे गावाला नागांव हे नाव पडले असावे.

गावातील दुसरे मुख्य मंदिर सिद्धीविनायकाचे. रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या ह्या मंदिरात गणपतीची उजव्या सोंडेची सुंदर मूर्ती आहे. गणपतीच्या बाजूला चवरीधारी रिद्धी-सिद्धी आहेत. ह्या गणपतीचा उजवा हात नेहमीसारखा आशीर्वाद देताना नसून त्याने उजव्या हातात जपमाळ धरलेली आहे. इतर हातांमध्ये परशु, पुष्प आणि लाडू आहे. गणपती कमळावर आसनस्थ असून रिद्धी-सिद्धीसुद्धा कमळावर उभ्या आहेत. गर्भगृहाच्या प्रवेशद्वारावर खंडित झालेला देवनागरी लिपीतील आणि मराठी भाषेतील शिलालेख आहे. शिलालेखाचा बराचसा भाग नष्ट झालेला असल्यामुळे शिलालेख सलग वाचता येत नाही. शिलालेखातील मोजकीच अक्षरे वाचता येतात.

नागांव हटाळे परिसरात नागेश्वर मंदिर आहे. मंदिर साधारणपणे २००-२५० वर्ष जुने असून मंदिरासमोर मोठा तलाव आहे. मंदिराचे बांधकाम दगडी असून कळस विटांनी बांधला आहे. सभामंडपात नंदी, गणपती आणि भैरव यांच्या मूर्ती आहेत.

नागांव येथून चौलकडे जाताना रस्त्याच्या उजव्या बाजूला वंकनाथाचे मंदिर आहे. सध्याच्या मंदिराचा आधुनिक पद्धतीने जीर्णोद्धार केला आहे. तथापि या मंदिराचा अहिल्याबाई होळकर यांनी १७९० साली जीर्णोद्धार केला अशी कुलाबा गॅझेटमध्ये नोंद आहे. मंदिरात गणपती आणि भैरवाची मूर्ती आहे. गर्भगृहात शिवलिंगाच्या पाठीमागे पार्वतीची मूर्ती आहे. तसेच गर्भगृहाच्या ललाटबिंबाच्या वरती श्रीकृष्णाची आणि अंतराळाच्या छतावर कृष्णाच्या जीवनाशी संबंधित शिल्प कोरलेले आहे. मंदिरासमोर दगडी व बांधीव पुष्करिणी आहे.


सभामंडपातील गणेशाची मूर्ती


सभामंडपातील भैरवाची मूर्ती


तळ्याच्या काठावर असलेला नंदी



नागेश्वर मंदिर आणि मंदिरासमोरील विस्तीर्ण तलाव



सिद्धीविनायक मंदिर



वंकनाथ मंदिरातील गर्भगृहाच्या ललाटबिंबावर कोरलेली श्रीकृष्णाची मूर्ती



सिद्धीविनायक मंदिरातील शिलालेख



वंकनाथ मंदिरातील द्वारपाल



वंकनाथ मंदिर



ललाटबिंबावर असलेली गणेशाची प्रतिमा


नऊ नागांच्या शिल्पांच्यापासून भीमेश्वर हे मंदिर हाकेच्या अंतरावर आहे. कोकणातील इतर मंदिरासारखेच हे मंदिर आहे. कोकणाधिपती हंबीरराव याचा शके १२८९ (सन १३६७-६८) सालातील शिलालेख ह्या मंदिरात आहे.

पूर्वाभिमुख भीमेश्वर मंदिराच्या समोर पाण्याची पुष्करिणी आहे. कुंडात उतरण्यासाठी पायऱ्यांची सोय केलेली आहे. कुंडाजवळ देवीची आणि भैरवाची मूर्ती ठेवलेली आहे. देवीच्या डोक्यावर जटामुकुट आहे. जटामुकुटाच्या मागे असलेल्या प्रभावळीमध्ये स्त्रीप्रतिमा कोरलेली आहे. भैरवाच्या उजव्या हातात तलवार आणि डाव्या पायाजवळ श्वानमूर्ती आहे. सभामंडपात प्रवेश करण्यासाठी पूर्व आणि उत्तर दिशेला प्रवेशद्वार आहे. पूर्वेकडील प्रवेशद्वारातून मंदिरात प्रवेश केल्यानंतर समोरच दगडी नंदी आपले लक्ष वेधून घेतो. गर्भगृहात शिवलिंग असून गर्भगृहाच्या जवळ असलेल्या देवकोष्टकांमध्ये भैरव आणि गणपतीची मूर्ती आहे. गर्भगृहाच्या द्वारशाखेवर द्वारपाल आणि हत्ती, नरसिंह आणि कृष्ण इ. शिल्पे कोरलेली आहेत. मुख्य मंदिरातच अजून एक छोटे मंदिर आहे.


उत्तर दिशेला असलेल्या प्रवेशद्वारातून बाहेर पडल्यानंतर उजव्या बाजूला असलेल्या पायरीवर शिलालेखाची शिळा बसवण्यात आलेली आहे. गावातील जुन्या लोकांच्या मते पूर्वी हा शिलालेख मोकळा होता. पुढे पेशव्यांच्या काळात भीमेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार झाला, तेव्हा शिलालेख कोरलेला दगड पायरीत आणून बसवला.



वंकनाथ मंदिरातील गणपती



वंकनाथ मंदिरातील भैरव




वंकनाथ मंदिरातील पार्वती




वंकनाथ मंदिरातील शिवलिंग

भीमेश्वर मंदिर आणि पुष्करिणी






गणपती



गर्भगृहाची द्वारशाखा आणि शिवलिंग



मुख्य मंदिरातच एक मंदिर असून त्यात देवीची प्रतिमा दिसते





हंबीररावांचा शिलालेख कोरलेला दगड



कुंडाजवळील देवीची प्रतिमा



कुंडाजवळील भैरवाची प्रतिमा



मुख्य मंदिरातील नंदी

## हंबीररावांच्या शिलालेखाचा ठसा

भीमेश्वर मंदिरातील शिलालेखाच्या सुरुवातीच्या तीन संस्कृत ओळी सोडल्यास बाकी मराठी भाषेत आहे. लेखात शक आणि हिजरी अशा दोन्ही कालगणना दिलेल्या आहेत. २८ ओळींचा हा लेख बराचसा सुस्थितीत आहे. फक्त १६ ते १९ या चार ओळीतील एखाददुसरेच अक्षर नष्ट झाले आहे.

नागांवच्या लेखात शक संवत्सराबरोबर हिजरी सनाचा उल्लेख आलेला आहे. त्यावरून हिजरी सनाचा स्वतंत्ररित्या उल्लेख करण्याइतके मुसलमान राजे स्वतंत्र झाले होते.

रोजच्या धावपळीत थोडासा विरंगुळा म्हणून ऐतिहासिक आणि निसर्गरम्य आक्षी–नागांवची एकदिवसीय मस्त सफर होऊ शकते.




# चुंबकीय वेधशाळा

**(तालुका अलिबाग)** जगातली सर्वात जुनी आणि प्रमाणभूत चुंबकीय लहरी आणि घडामोडींचा अचूक वेध घेणारी इंग्रजकालीन वेधशाळा आहे. तेथे जुन्या वेधशाळेतील यंत्रे आणि विविध प्रकारच्या खगोलीय वस्तूंचे संग्रहालय असून येथे त्यांची अद्ययावत कार्यप्रणाली पाहता येते. अंटार्क्टिका मोहिमेवर गेलेले शास्त्रज्ञ इथे भेट देतात. इ. स. १८२३ साली मुंबई येथे कुलाबा वेधशाळेची स्थापना होऊन १८४० पासून तेथे भू-चुंबकीय निरीक्षणास व नोंदीस सुरुवात झाली. इ.स. १९०० साली ट्राम्सच्या विद्युतीकरणाचा निर्णय झाला. या विद्युतीकरणाचा परिणाम वेधशाळेतील भू-चुंबकीय मापनावर होण्याच्या शक्यतेमुळे कुलाबा वेधशाळेला पर्यायी वेधशाळा स्थापित करण्याची गरज भासू लागली. त्यावेळी कुलाबा वेधशाळेचे प्रमुख डॉ. नानाभॉय मूस यांनी मुंबईपासून जवळच अनैसर्गिक विद्युत चुंबकीय परिणामांपासून मुक्त अशा अलिबागची वेधशाळा स्थापन करण्यासाठी निवड केली आणि एप्रिल १९०४ मध्ये मुंबई येथील कुलाबा वेधशाळेशी संलग्न अशा अलिबाग भू-चुंबकीय वेधशाळेची स्थापना झाली.

पृथ्वीच्या पोटातील चुंबकीय हालचाली आणि सौरवादळामुळे निर्माण होणाऱ्या चुंबकीय वादळांची नोंद ठेवणाऱ्या जगातील १३ नामांकित वेधशाळांपैकी एक अशी ही अलिबागची वेधशाळा आहे. या वेधशाळेतील नोंदींचा फायदा जागतिक स्तरावर झाला असून अशा प्रकारची नोंद ठेवणारी ही आशियातील एकमेव वेधशाळा आहे. ही वेधशाळा दोन इमारतींमध्ये विभागलेली असून एका इमारतीत मॅग्नेटोमीटर्स बसविलेले आहेत. त्यांच्या साहाय्याने भू-चुंबकीय क्षेत्रामध्ये दररोज होणाऱ्या बदलांची नोंद केली जाते. दुसऱ्या इमारतीत सौरवादळांमुळे होणाऱ्या भू चुंबकीय वादळांची नोंद ठेवणारी विविध उपकरणे आहेत. दर १२ मिनिटांनी माहितीची येथून देवाणघेवाण होते. या इमारतीच्या बांधकामामध्ये चुंबकीय गुणधर्म नसलेले पोरबंदर वाळूचे दगड, ब्रास आणि तांब्याच्या वस्तू वापरल्या आहेत.

या वेधशाळेमध्ये होत असलेल्या भू-चुंबकीय क्षेत्राच्या नोंदींचा उपयोग भू-चुंबकीय वादळाची तसेच इतर अनेक चुंबकीय कार्यप्रक्रियांची माहिती मिळण्यास होतो. या वेधशाळेचे वैज्ञानिक जगतास असलेले योगदान लक्षात घेऊन भारत सरकारने सन १९७१ मध्ये या वेधशाळेची पुनर्स्थापना केली व भारतीय भू-चुंबकीय संस्था, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाअंतर्गत ती कार्यरत केली. सदर वेधशाळा पाहण्यासाठी इच्छुक असणाऱ्या व्यक्तिंनी वेधशाळेकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

# अलिबागचं कारागृह (हिराकोट)

हिराकोट ही गढी अलिबाग किनाऱ्यापासून केवळ शंभर यार्डावरच आहे. कान्होजी आंग्रे यांनी सतराव्या शतकाच्या शेवटाला बांधलेली ही गढी आज 'भारत सरकारचे अधिकृत कारागृह' म्हणून ओळखले जाते.

आपल्याकडील संपत्ती आणि जडजवाहिर सुरक्षित राहावेत या भावनेतून आंग्रे यांनी ही दगडी गढी उभी केली. त्यासाठी त्यांनी काळ्या बसाल्टचा वापर केला. या गढीची तटबंदी पाहूनच ती किती सुरक्षित आहे त्याची कल्पना येते. या बसाल्टचे दगड सूर्यप्रकाशात चमकतात यामुळे गढीचं नाव हिराकोट पडलं, असं म्हणतात.

१७४० मध्ये बाळाजी बाजीराव पेशवे आणि त्यांचा सावत्र भाऊ संभाजी यांच्यात तुंबळ युद्ध झालं त्यावेळी कान्होजींनी तरुण बाळाजींना लढाईत साहाय्य केलं. शेवटी संभाजी याला कैदी बनविण्यात आलं. त्यावेळी बाळाजी आणि त्यांच्या सेनेने याच गढीत सुरक्षित आसरा घेतला होता.

अठराव्या शतकात हिराकोट गढी ही कान्होजींची बहीण आनंदीबाई यांच्या अधिपत्याखाली आली. १७९३ मध्ये जयसिंग या एका मराठ्याने त्यावर हल्ला केला पण त्याची अभेद्य भिंत तो भेदू शकला नाही. आनंदीबाईंच्या मृत्यूनंतर जयसिंगने हिराकोट काबिज केला. मात्र शिंदे घराण्यातील बाबूराव नावाच्या सरसेनापतीने जयसिंगचा शेवट केला आणि हिराकोट जिंकला. पुढे जयसिंगच्या मोठ्या मुलाने १८०७ मध्ये त्यांचा पराभव केला. त्याचा पराभव करून गढी पुन्हा आंग्रेंच्या अधिपत्याखाली आणली गेली. १८४० पर्यंत या किल्ल्यावर आंग्रेंचं राज्य होतं. मात्र त्यानंतर ब्रिटिश सरकारने ही गढी काबिज केली. असं म्हणतात की एकेकाळी या गढीवर पाचशेच्यावर तोफा होत्या परंतु आज त्यातील काहीच तोफा इथं शिल्लक आहेत. स्वातंत्र्यानंतर हिराकोटला मध्यवर्ती कारागृहामध्ये बदलण्यात आलं. अलिबागला भेट देताना हिराकोटला भेट द्यायलाच हवी. त्याचा लाकडी मुख्य दरवाजा आणि त्याबाजूचं गणपतीचं मंदिर लक्षवेधी आहेत. त्याच्या आजूबाजूचा परिसरही अतिशय देखणा आहे. आज ही गढी तहसीलदारांचं ऑफिस आणि कारागृह असल्यामुळे त्यातील काही भागात फिरण्यास मनाई करण्यात आली आहे.







# चिरनेर जंगल सत्याग्रह

१९३० चा जंगल सत्याग्रह हा असहकार आंदोलनाचा भाग होता. गांधीजींनी केलेला मिठाचा सत्याग्रह व असहकार चळवळ काँग्रेसच्या नेत्यांनी ही शांततेत विविध मार्गाने पुढे नेण्याचे प्रयत्न सुरू ठेवले. त्यातलाच एक प्रयत्न होता म्हणजे जंगल सत्याग्रह. इंग्रजांनी गुरांना जंगलात चरायला नेण्यासंबंधी आणि सरणासाठी लाकूड जमा करण्यावर बंदी घातली होती. त्याच्याविरोधात देशभरातील जंगलांच्या ठिकाणी असलेल्या गावकऱ्यांनी आवाज उठवला. तो दडपून टाकण्यासाठी ब्रिटिश अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांच्या चरायला गेलेल्या जनावरांना जप्त करायला सुरुवात केली. महाराष्ट्रातील चिरनेर जंगलात काही सत्याग्रही याविरोधात एकत्र आले. तो दिवस होता २५ सप्टेंबर १९३०. या दिवशी चिरनेर, काल्हे आणि चावणे या खेड्यापाड्यातून लोक जमा झाले होते. या अहिंसक सत्याग्रहींना पोलिसांकडून बेड्या घातल्या गेल्या. मात्र तहसिलदाराने त्याला प्रतिकार केला. त्या वेळी इंग्रज अधिकाऱ्याकडून गोळीबारही करण्यात आला. त्यात तहसीलदारासोबत सात ते आठ सत्याग्रही मृत्यूमुखी पडले. त्यांचं स्मारक चिरनेरला उभारण्यात आलं आहे.











# गेल (इंडिया) लिमिटेड

**(तालुका अलिबाग)** गेल (इंडिया) लिमिटेड ही केंद्र सरकारच्या अखत्यारीतील कंपनी असून ती नैसर्गिक वायूवरील प्रक्रिया, पेट्रोकेमिकल्स, एलपीजी, प्रेषण आणि दूरसंचार या क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. नैसर्गिक वायूचे वितरण, इतर सहयोगी कंपन्यांच्या सहभागाने नव्या साठ्यांचा शोध घेणे आणि वापरायोग्य उत्पादन करणे या क्षेत्रांमध्ये कंपनीने नव्याने काम सुरू केलं आहे.

भारतात 'गेल'चे ५ ठिकाणी रिकव्हरी प्लान्ट्स आहेत. त्यापैकी रायगड जिल्ह्यातील उसार इथे १९९८ मध्ये एक प्लान्ट उभारण्यात आला होता. परंतु ओएनजीसीकडून पुरेशा प्रतीचा वायूसाठा उपलब्ध होत नसल्यामुळे २०१५ पर्यंत प्लान्टचे संपूर्ण कार्यान्वयन करण्यात आले नव्हते. त्यानंतर सुमारे ८ हजार कोटी रुपये खर्चून पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स उभारण्याबाबतचा प्रस्ताव मंजूर झाला. यामध्ये पॉलीप्रोपिलीन युनिटसह ५०० केटीए प्रोपेन डीहायड्रोजनेशन युनिट प्रस्तावित करण्यात आलं. अशा प्रकारचा म्हणजे प्रोपिलीनच्या उत्पादनासाठी प्रोपेन डीहायड्रोजनेशन तंत्रज्ञानाचा वापर करणारा हा भारतातील पहिलाच प्लान्ट आहे. यामध्ये आंतरराष्ट्रीय कंपन्यांना सहभागी करून घेण्यात आलं असून २०२५ पर्यंत हा प्रोजेक्ट पूर्णत्वास येत आहे.

या प्लान्टमुळे रायगडसह संपूर्ण राज्यातील अर्थकारणाला चालना मिळेल. मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. त्याचप्रमाणे लघुउत्पादक व सेवा पुरवठादारांसाठीही नवीन संधी उपलब्ध होतील.



# रेवदंड्याचे नानासाहेब व अप्पासाहेब धर्माधिकारी






रेवदंड्याचे नाव महाराष्ट्रभूषण आदरणीय डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांनी सुरू केलेल्या बैठकीमुळे जगप्रसिद्ध झाले. त्यांच्या ज्ञानदानाने लाखो पीडितांचे संसार सुखाचे होत गेल्याने रेवदंडा हे शहर सर्वत्र प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या पश्चात त्यांची गादी चालविणारे डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी, श्रीकृष्ण धर्माधिकारी तसेच सचिनदादा धर्माधिकारी, राहुलदादा धर्माधिकारी व उमेशदादा धर्माधिकारी या सर्वांचे कार्य सर्वश्रुत आहे. समाजसुधारणांचे महान कार्य पाहूनच भारत सरकारकडून अप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'पद्मश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. त्यांनी स्थापन केलेल्या 'नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान' या ट्रस्टद्वारे महाराष्ट्रात झालेल्या आरोग्यशिबिरांचा जागतिक विक्रम होऊन त्याची नोंद गिनीज बुकमध्ये करण्यात आली आहे. तसेच डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'स्वच्छता दूत' म्हणून महाराष्ट्र शासनाने नियुक्त केल्यानंतर बैठकीच्या सदस्यांनी भारतभर स्वच्छता अभियान राबविले. ट्रस्टद्वारे उभ्या महाराष्ट्रात राबवलेला 'झाडे लावा, झाडे जगवा' हा उपक्रम अनुभवण्यासारखा आहे. त्याचबरोबर स्वच्छता अभियानात राज्य प्रशासनाला जी साथ दिली, तीसुद्धा वाखाणण्यासारखी असल्याने रेवदंडा हे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिद्ध होत आहे. अनेकांना कुतूहल म्हणून अप्पासाहेबांची भेट घेण्याची इच्छा असते.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यामार्फत वृक्षलागवड, आरोग्यशिबिर, स्वच्छता मोहीम, तलावातील गाळ काढणे आदी उपक्रम राबविण्याचे कार्य सुरू आहे. त्यांच्या श्री संप्रदायाचे हजारो अनुयायी रेवदंडा येथे येत असतात.



अप्पासाहेब धर्माधिकारी यांना पद्मश्री पुरस्कार





कांदिवली येथील वृक्ष संवर्धन अभियान



जंजिरा किल्ल्याची स्वच्छता मोहिम



नानासाहेब धर्माधिकारी यांच्या अनुयायाकडून १०० टन कचरा संकलित राज्यव्यापी स्वच्छता मोहिमेची विक्रमांच्या यादीत नोंद (Limca book of records)



नदीतून गाळ गोळा करणे


# पनवेल

कोकण आणि संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातून मुंबईत येणाऱ्यांसाठी पनवेल हे प्रवेशद्वार आहे. पूर्वी पनवेल हे सेकंड होम खरेदी करणाऱ्यांचं माहेरघरही होतं. नवी मुंबई इथल्या आंतरराष्ट्रीय विमानतळापासून जवळच असल्यामुळे पनवेल हे दळणवळणाच्या दृष्टीने सोईस्कर आहे. पनवेलला ३०० वर्षांचा इतिहास आहे. कोकण आणि घाट परिसराला जोडणारा पनवेल हा एकमेव दुवा म्हणता येईल. विविध भाषिक मंडळी इथं गुण्यागोविंदाने एकत्रित राहताना दिसतात. 'जुनं पनवेल' च्या जागी 'नवं पनवेल' उभं राहत आहे. मुलांच्या शिक्षणासाठी सोयी, आरोग्याच्या सोयीसुविधा, जीवनावश्यक वस्तूंची बाजारपेठ हे सगळंच नव्या स्वरूपात इथं उभं राहिलेलं दिसतं. पनवेलच्या जवळून जाणारा मुंबई पुणे एक्सप्रेस वे यामुळे तर पनवेल पुण्याशी काही तासांच्या प्रवासाने जोडलं गेलंय. त्याचप्रमाणे २१.८ किलोमीटर लांबीचा मुंबई ट्रान्सहार्बर लिंक (एमटीएचएल) ज्यामुळे नवीमुंबई ते मुंबई हे अंतर कमी होत आहे. यामुळे मुंबई पनवेलच्या जवळ येईल. त्यासोबतच, पनवेल ते सीएसटी धावणारी एसी लोकल ट्रेन यामुळे पनवेलच्या विकासात खूप फरक पडेल. मेट्रो रेल्वेच्या दोन लाइन्स तर आहेतच. विस्तारित जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) आणि पनवेलच्या आजूबाजूचा भाग 'स्पेशल इकॉनॉमिक झोन' म्हणजेच 'सेझ'मध्ये येतो. त्यातून तिथं राहाणाऱ्या लोकांना उद्योगाच्या नवनवीन संधी उपलब्ध होतील. 'नवी मुंबई एअरपोर्ट इन्फ्लूएन्स्ड नोटीफाइड एरिआ' म्हणजेच (NAINA) यामुळेही पनवेलच्या प्रगतीत हातभार लागेल. 'द सिटी ॲण्ड इण्डस्ट्रिअल डेव्हलपमेण्ट कॉर्पोरेशन' म्हणजेच सिडकोने NAINAसाठी एक सुधारणा आराखडाही तयार केला आहे. तज्ज्ञाच्या मते पनवेल आज ज्या प्रकारे सर्व प्रकारच्या दळणवळणांच्या साधनांनी युक्त होत आहे ते पाहता, इथं कामासाठी येणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल. 'दिल्ली मुंबई इण्डस्ट्रिअल कॉरिडॉर'चाही यात महत्त्वाचा वाटा आहे. आजूबाजूला पसरलेले डोंगर आणि त्यातून वाहणारी गढी नदी, हा पनवेलचा नजाराच खूप देखणा असतो. या नजाऱ्याला आता प्रगतीची साथ मिळाली की मॉर्डन पनवेल काही फार दूर नाही.











# राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्स लिमिटेड

खते आणि रसायन उत्पादनात भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील एक महत्त्वाची कंपनी म्हणून राष्ट्रीय केमिकल्स आणि फर्टिलायझर्सचा (आरसीएफ) उल्लेख केला जातो. ६ मार्च १९७८ रोजी स्थापन झालेल्या या कंपनीचे पूर्वीचे नाव फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया असे होते. कालांतराने तिचे फर्टिलायझर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एफसीआय), हिंदुस्तान फर्टिलायझर कॉर्पोरेशन लिमिटेड (एचएफसी), प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडिया लिमिटेड (पीडीआयएल), नॅशनल फर्टिलायझर्स लिमिटेड (एनएफएल) आणि राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ) अशा पाच कंपन्यांमध्ये रूपांतर करण्यात आले. १९९७ मध्ये भारत सरकारतर्फे आरसीएफला 'मिनीरत्ना'चा दर्जा बहाल करण्यात आला.

आरसीएफद्वारे मुंबईतील ट्रॉम्बे आणि रायगड जिल्ह्यातील थळ येथील प्लांटमधून विविध उत्पादनांची निर्मिती केली जाते. यामध्ये नीम युरिया, कॉम्प्लेक्स फर्टिलायझर्स, बायो फर्टिलायझर्स, मायक्रो न्युट्रिएंट्स, पाण्यामध्ये संपूर्णपणे विद्राव्य असलेली खते यांचा समावेश आहे. उज्ज्वला आणि सुफला यांसारखे खतांचे ब्रँड त्यांचा उत्तम दर्जा आणि वितरण व्यवस्थेमुळे संपूर्ण देशात सुपरिचित आहेत. अमोनिया, मिथॅनॉल, मिथाईलअमाईन, अमोनिअम नायट्रेट, अमोनिअम बायकार्बोनेट, सौम्य आणि तीव्र नायट्रिक ॲसिड, सल्फ्युरिक ॲसिड, सोडिअम नायट्रेट, डायमिथाईल फॉर्मेमाईड, डायमिथाईल ॲक्टामाईड, फॉर्मिक ॲसिड, अरगॉन इ. रसायनांच्या निर्मितीमध्ये आद्य उत्पादक म्हणूनही आरसीएफची स्वतंत्र ओळख आहे.

२०१८ मध्ये थळ येथील उत्पादन केंद्रामध्ये उच्च क्षमतेच्या अत्याधुनिक गॅस टर्बाईन जनरेटर आणि हीट रिकव्हरी सिस्टिम जनरेटरचे कार्यान्वयन करण्यात आले. त्यापूर्वी २०१६ मध्ये जमिनीवरील 2 MWp क्षमतेच्या सौर पॅनेलचे कार्यान्वयन करण्यात आले होते. मृदा तपासणी प्रयोगशाळा, उत्पादन केंद्रांमध्ये स्वच्छ भारत अभियानाची नियमित अंमलबजावणी, टाऊनशिप हॉस्पिटल, शाळा, आरसीएफ क्रेडिट सोसायटी यासारखे उपक्रमही इथे राबविले जातात.

अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्थानासाठी भात आणि फळझाडांची रोपे, खते कंपनीतर्फे पुरविली जातात. याशिवाय आसपासच्या सात गावांना गेल्या २४ वर्षांपासून पिण्यासाठी पाणी पुरविले जात आहे. यामुळे पाण्यातून पसरणाऱ्या रोगराईला मोठ्या प्रमाणात आळा बसला आहे.

पर्यावरण संवर्धन, हरितगृह वायूंच्या निर्मितीवरील नियंत्रण, उत्पादनांचा दर्जा, सामाजिक बांधिलकी या सर्व बाबींसाठी आरसीएफच्या थळ केंद्राला अनेक महत्त्वाचे सन्मान व पुरस्कार वेळोवेळी प्राप्त झाले आहेत. आयएसओ सर्टिफिकेशन लाभलेले हे उत्पादन केंद्र रायगड जिल्ह्याचे एक भूषणच म्हणावे लागेल.







# रिलायन्स लिमिटेड

रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा आणि नागोठणे येथील औद्योगिक वसाहतींमध्ये रिलायन्स लिमिटेडची बृहद् उत्पादन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. या दोन्ही केंद्रांमध्ये उत्तम दर्जाच्या पेट्रोकेमिकल उत्पादनांची निर्मिती केली जाते.

नागोठणे येथील उत्पादन केंद्राचा रिलायन्सच्या प्रमुख सहा उत्पादन केंद्रामध्ये समावेश होतो. येथे इथिलिन ऑक्साईड, इथिलिन ग्लायकॉल, लिनिअर लो डेन्सिटी हाय डेन्सिटी पॉलीइथिलिन, हेक्झिन-१ यांचे गॅस-बेस्ड कॅप्टिव्ह पॉवर प्लांटमध्ये उत्पादन केले जाते. २०१८ मध्ये २३३८ कोटी रुपये खर्चून या उत्पादन केंद्राचा विस्तार करण्यात आला.

पाताळगंगा येथील उत्पादन केंद्रामध्ये लिनिअर अल्काईल बेन्झीन, प्युरिफाईड टेराथेलिक ॲसिड, पॉलिएस्टर फायबर यार्न आणि पॉलिएस्टर स्टेपल फायबर, पॉलिएस्टर इंडस्ट्रिअल यार्न, फुल्ली ड्रॉन यार्न अशा उत्पादनांची निर्मिती केली जाते. या उत्पादन केंद्राचाही १४८७ कोटी रुपये खर्चून विस्तार केला जात आहे.









# महाराष्ट्र सीमलेस लिमिटेड

महाराष्ट्र सीमलेस लिमिटेड (एमएसएल) ची स्थापना १० मे १९८८ रोजी सीमलेस पाईपची वाढती मागणी लक्षात घेऊन करण्यात आली. हा आयात पर्यायी प्रकल्प १९९१ मध्ये नागोठणे येथे जर्मनीच्या मॅनेस्मन डेमाग हटेनटेक्निक (जीएमबीएच) यांच्या सहकार्याने सुरू करण्यात आला. CPE तंत्रज्ञानाचा वापर करून उत्कृष्ट दर्जाच्या अनेक प्रकारच्या सीमलेस पाईप्स आणि ट्यूब्सचे उत्पादन येथे करण्यात येते. अशी निर्मिती करणारा हा जगातील तिसरा अत्याधुनिक प्रकल्प आहे. प्रकल्पासाठी MDH डिझाइनवर आधारित मुख्य प्लांट आणि यंत्रसामग्री यूएसएमधून आयात केली गेली. कार्बन आणि अलॉय स्टीलपासून तयार केलेले हॉट आणि कोल्ड फिनिश सीमलेस पाईप्सचे १,५०,००० TPA तयार करण्याची या प्रकल्पाची क्षमता आहे. इंडियन बॉयलर रेग्युलेशन (IBR) आणि अमेरिकन पेट्रोलियम इन्स्टिट्यूट (API) द्वारे त्यास मान्यताही देण्यात आली आहे.

MSL ने पुढे जागतिक दर्जाच्या रीलर्सद्वारे PLUG MILL तंत्रज्ञानाचा वापर करून, भारतात प्रथमच २० पर्यंत व्यासाचे आणि ४० मिमी पर्यंत भिंतीची जाडी असलेल्या मोठ्या आकाराच्या सीमलेस पाईप्सचे उत्पादन करण्यासाठी प्रकल्पाचा विस्तार केला. यामुळे सीमलेस प्लांटची एकूण स्थापित क्षमता ३५०००० TPA झाली.

MSL प्लांट राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वर रायगड जिल्ह्यातील नागोठणे, पाईप नगर, गाव सुकेली, तालुका रोहा, बीकेजी रोड, जिल्हा येथे मुंबईपासून सुमारे १३० किलोमीटर अंतरावर जवळपास १०० एकर क्षेत्रावर स्थापित आहे. मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेजवळ असल्यामुळे उत्पादनवाढीस सातत्याने चालना मिळते.

MSL ने २००० मध्ये ERW पाईप श्रेणीमध्ये प्रवेश केला. त्याचे उत्पादनही रायगड जिल्ह्यातील निर्मिती केंद्रात करण्यात येते. हे केंद्र नैसर्गिक वायू, कच्चे तेल, रिफायनरीज आणि खते इत्यादीसारख्या प्रमुख क्षेत्रातील उद्योगांसाठी मोठ्या व्यासाच्या ERW पाईप्सची बाजारपेठेची मागणी पूर्ण करत आहे.

२००६-०७ या आर्थिक वर्षात कंपनीने नागोठणे येथील सध्याच्या सुविधेजवळ एफबीई आणि ३ लेयर पीई/पीपी कोटिंगसाठी नवीनतम तंत्रज्ञान वापरून कोटेड लाइन पाईप सुविधा यशस्वीपणे सुरू केली. २००७-०८ या आर्थिक वर्षात कंपनीने 6 OD पर्यंत सीमलेस पाईप तयार करण्यासाठी 200000 TPA ची क्षमता असलेला प्रकल्प रोमानियामधून खरेदी केला. तो मार्च २०१२ रोजी कार्यान्वित झाला.

कंपनीच्या उपरोक्त प्रकल्पाला महाराष्ट्र शासनाने मेगा प्रोजेक्ट चा दर्जा बहाल केला आहे.

२०१७ मध्ये नागोठणे येथील कारखान्यात 20MW सोलार PV प्लांट आणि एक MW रूफ टॉप सोलर जोडून, एकूण क्षमता 33MW झाली आहे. यामुळे अक्षय उर्जा निर्मितीच्या क्षेत्रातही एमएसएलतर्फे भरीव कामगिरी केली जात आहे.






# एमआयडीसी

मुंबईसारख्या भारतातील मोठ्या औद्योगिक केंद्रापासून जवळ असल्यामुळे रायगड जिल्ह्यातील नैसर्गिक व मानवी संसाधने, पायाभूत सुविधांची उभारणी आणि वाहतूक व्यवस्थेचे सुनियोजन करून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने जिल्ह्यातील तळोजा, पाताळगंगा, विले भागड, रोहा आणि महाड या पाच ठिकाणी विस्तृत औद्योगिक क्षेत्रांची स्थापना केली.

तळोजा येथे रासायनिक उद्योग, खाद्यपदार्थ आणि मासे यांच्यावरील प्रक्रिया, दुग्ध उत्पादने, कोल्ड स्टोरेज आणि इंजिनिअरिंग हे उद्योग स्थापन करण्यात आले आहेत.

पाताळगंगा येथे रिलायन्स, ह्युंदाई मोबिस, सिप्ला, पेट्रोनास, कॅमलिन इत्यादी जागतिक दर्जाच्या मोठमोठ्या उद्योगांची उत्पादन केंद्रे आहेत. या औद्योगिक क्षेत्राला 'रसायनी' या नावाने देखील ओळखले जाते. पूर्व पाताळगंगा, अतिरिक्त पाताळगंगा आणि पाताळगंगा–बोरीवली असे या औद्योगिक क्षेत्राचे तीन भाग आहेत. पाताळगंगा–बोरीवली पट्ट्यासाठी एमआयडीसी तर्फे नवीन जागेचे संपादन करण्यात येत आहे.

विले भागड औद्योगिक क्षेत्र अभियांत्रिकी उत्पादनांसाठी तर रोहा व महाड औद्योगिक क्षेत्र रसायनिक उद्योगांसाठी सुप्रसिद्ध आहे.

या सर्व औद्योगिक क्षेत्रांमधून रसायने, लोखंड, स्टील, आयुर्वेदिक व इतर औषधे, तांदूळ आणि काजू यांची मोठ्या प्रमाणावर निर्यात केली जाते.

औद्योगिक विकास महामंडळातर्फे सर्व औद्योकि क्षेत्रांसाठी पाणी, ऊर्जा, वाहतूक, मनुष्यबळ, कचरा व्यवस्थापन, संपर्क व्यवस्था, इंटरनेट, निवास व्यवस्था इत्यादी अनेक प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असल्यामुळे रायगड जिल्ह्याचा समावेश देशातील प्रमुख उत्पादन केंद्रांमध्ये केला जात आहे.














# इमॅजिका

रायगड जिल्ह्यातील खोपोली येथे १३० एकरच्या जमिनीवर पसरलेलं इमॅजिका हे आबालवृद्धांच्या मनात आनंद पसरवणारं ठिकाण आहे. मनमोहन शेट्टी या चित्रपट व्यावसायिकानं ॲडलॅब इमॅजिकाची संकल्पना साकारण्यासाठी देशविदेशातील तज्ज्ञांना इथे बोलावून घेतलं आणि त्यांच्या देखरेखीखाली इमॅजिकाची बांधणी झाली. लंडन, चीन, हाँगकाँग, न्यूयॉर्क आणि ॲमस्टरडॅम अशा देशविदेशातील तज्ज्ञ लोकांच्या हाताखाली अडीच हजार कामगार चार वर्ष राबत होते त्यातून या इमॅजिकाचा जन्म झाला.

या ठिकाणी वॉटरपार्क, स्नो पार्क, लहानग्यांसाठी छोटा भीम फेरी, मिस्टर इंडिया, सलीमघर, अलिबाबा आणि चालीस चोर अशा भारतीय आणि परदेशी कथांना एकमेकांत गुंफून त्यातून इथल्या वेगवेगळ्या खेळांचा जन्म झाला आहे. 'व्हेअर स्टोरीज कम अलाइव्ह,' अशीच इमॅजिकाची मूळ संकल्पना आहे. पर्यटक इथे आल्यावर ती संकल्पना पूरेपुर जगतात हे काही वेगळं सांगायला नको!



# बिग एन. डी. स्टुडिओ

नितीन चंद्रकांत देसाई यांच्या कर्जत इथे ५२ एकर भागात पसरलेल्या बिग एन. डी. स्टुडिओने बॉलिवूड, हॉलिवूड आणि मालिकांमध्ये आपलं मोलाचं स्थान निर्माण केलं आहे. ऐतिहासिक चित्रपटांपासून मारधाडपटांच्या शूटिंगसाठी लागणारं अचूक परदेशी किंवा भारतीय लोकेशन इथं सापडतं. या स्टुडिओची स्थापना झाली २००५ मध्ये झाली. २००८ मध्ये अमेरिकास्थित ट्वेन्टीएथ सेन्चुरी फॉक्स स्टुडिओने ४ मजल्यांच्या जागेसाठी दहा वर्षांचा करार केला. शूटिंगसोबतच इथे फिल्म एडिटींग, मिक्सिंग, साऊंड योजना, प्रकाशयोजना, कपडेपट, भोजनव्यवस्था या इतर महत्त्वाच्या गोष्टींसाठीही भरपूर जागा आहे.

पर्यटकांना इथे चित्रपटांचे सेट्स, कपडे आणि इतर सामुग्री पाहता येते. त्यातून एक चित्रपट बनविण्यामागे किती हात झटत असतात याची कल्पना येते.

बिग एन.डी स्टुडिओने सुरू केलेल्या फिल्मशी संबंधित प्रशिक्षण केंद्रात ग्रंथालय, मीडिया सेंटरसोबत ॲम्फिथिएटर, कॉन्फरन्स रूम, ऑडियो व्हिज्युअल रूम, स्पोर्ट्स, फिल्ममेकिंग, प्रोडक्शन डिझाइन, डायरेक्शन, सिनेमॅटोग्राफी, स्क्रिप्ट रायटिंग, टीव्ही जर्नालिझम, ॲक्टिंग, ग्राफिक्स आणि ॲनिमेशन इत्यादी कोर्सेस उपलब्ध आहेत.

२०२२ मध्ये महाराष्ट्र दिनानिमित्ताने बिग एन डी स्टुडिओने महाकला महोत्सव आयोजित केला होता. यात व्हर्सेटाइल एड्युकेअर सिस्टमही सहभागी होती. रुबिक क्युबपासून मोझॅक पद्धतीने चित्र बनवण्याचं ठरवलं होतं. यात मुंबई, ठाणे, नवी मुंबई आणि पुणे इथल्या एकूण ५०२३ मुलांनी भाग घेतला होता. त्यांनी यातून १३×१२ फुटांची छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा साकारली. तिची नोंद इंडिया बुक रेकॉर्ड्समध्ये घेण्यात आली आहे. या महाकलाउत्सवात प्रख्यात चित्रकारांच्या कलाकृतीही प्रदर्शनासाठी ठेवण्यात आल्या होत्या. बाबूराव पेंटर, प्रभाकर कोलते, वासुदेव कामत, दीनानाथ दलाल यांचसारख्या चित्रकर्मींची चित्रे तर वारली, पट्टचित्रे, तारकशी, गोंड चित्रे, छोट्या प्रतिकृती, आदिवासी दागिने यांसारखी पारंपरिक कारागिरीही प्रदर्शनात ठेवण्यात आली होती. चार दिवस चाललेल्या या उत्सवात भारतीय सिनमाचे जनक दादासाहेब फाळके आणि गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या संपूर्ण कलामहोत्सवात दहा हजाराहून अधिक कलाकार सहभागी होते. दिवसाला हजारो पर्यटक इथे भेट देत होते.

















## रायगड जिल्हाधिकारी निवासस्थान

ऐतिहासिक वारसा लाभलेले हे निवासस्थान व त्याभोवतालचा परिसर निसर्गसुंदर आहे.

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ अतिथीगृह, हरिहरेश्वर, रायगड



## शासकीय विश्रामगृहे

**सार्वजनिक बांधकाम विभागाअंतर्गत :**

पेण, पनवेल, रोहे, मुरूड, माणगांव, महाड, श्रीवर्धन, कर्जत, नांदवी, पाली, पोलादपूर, उंबर्डे (हेटवणे), खोपोली, म्हसळा, आंबेत व अलिबाग (तुषार व सारंग) ही शासकीय विश्रामगृहे आहेत.

**रायगड जिल्हा परिषदेअंतर्गत :**

रोहे, मुरूड, खालापूर, श्रीवर्धन, गोरेगांव, रायगड किल्ला, पाली, उन्हेरे, नेरळ इ. ठिकाणी विश्रामगृहे आहेत.

**वनविभागाअंतर्गत :**

कर्नाळा (मयूर व भारद्वाज) तसेच कर्जत तालुक्यात पोही विश्रामगृह, आंबिवली, चाफेवाडी आणि माथेरान, मुरुड (निरीक्षण कुटी), घारापुरी, उरण, रोहे व माथेरान (निरीक्षण कुटी) या ठिकाणी विश्रामगृहे आहेत.



कोकम अँड स्पाईस



# रॅडिसन ब्लू, अलिबाग

**(तालुका अलिबाग)** अनेक सुखसुविधांनी सुसज्ज अलिबागचं रॅडिसन ब्ल्यू हॉटेल पर्यटकांना सुखद दुनियेत घेऊन जातं. स्पा, रेन शॉवर, सुंदर लँडस्केप ही इथली वैशिष्ट्यं आहेत. सर्वात वरच्या मजल्यावरील प्रेसिडेन्शियल सूटमधून अतिशय नयनरम्य नजारा दिसतो. पर्यटकांची पसंती लक्षात घेऊन नॉन स्मोकिंग आणि स्मोकिंग खोल्या इथे उपलब्ध आहेत.

इथं येणारे पर्यटक हे वेगवेगळ्या आवडी निवडीचे असतात. काहींना केवळ वर्सोली, नागाव, अलिबाग अशा समुद्रावर फिरायचं असतं तर काहींना कर्नाळा पक्षी अभयारण्य किंवा फणसाड वाइल्ड लाइफ सेन्च्युरी असा जंगल सफारीचा अनुभव घ्यायचा असतो किंवा मग कणकेश्वर मंदिर आणि कुलाबा किल्ला या ठिकाणी जायचं असतं. रॅडिसन ब्ल्यू हे या सर्व ठिकाणांहून जवळ आहे.

इथलं जेवणही विविध प्रकारचं आहे. कौटुंबिक सहभोजनाचा आनंद घेण्यासाठी 'अपरन्ता'मध्ये जाणं योग्य ठरेल. तिथे आंतरराष्ट्रीय पदार्थांपासून लहान मुलांना आवडणाऱ्या मेन्यूपर्यंत सर्वच चाखायला मिळेल. पारंपरिक भारतीय जेवण जेवायचा मूड असेल तर 'कोकम ॲण्ड स्पाइस'ला भेट द्यावी आणि बाहेर कुठेही पडण्याचा विचार नसेल तर रूम सर्विसही तयार आहे. 'लाउंज बार'ही इथे आहे. 'पिआनो लाउंज'मध्ये कलाकारांनी प्रत्यक्ष सादर केलेलं संगीत ऐकण्याची सोय आहे तर 'राज मा ताज'मध्ये डिस्कोथेकची सुविधाही आहे.



# रॅडिसन ब्लू, कर्जत

**(तालुका कर्जत)** मुंबई पुणे या दोन शहरांच्या बरोबर मधोमध असलेला रायगड जिल्ह्यातील तालुका म्हणजे कर्जत. इथल्या 'रॅडिसन ब्ल्यू रिसोर्ट ॲण्ड स्पा'मध्ये वीकएंडला पर्यटक मोठ्या संख्येनं भेट देतात. हॉटेलच्या आजूबाजूला असलेल्या सह्याद्रीच्या रांगा आणि शेजारून वाहणारी उल्हास नदी यांच्या मधोमध हे रिसोर्ट वसलेलं आहे. इथल्या नैसर्गिक वातावरणात मन उल्हसित होतं. रात्री झोपताना खिडकीतून येणारा उल्हासनदीच्या पाण्याची 'खळखळ' मनाला प्रसन्न करते.

इथे जेवणासाठी 'पाम्स रेस्टॉरण्ट'मध्ये उत्तम सोय आहे. सकाळची सुरुवात सुपर कॉन्टिनेन्टल आणि बुफे ब्रेकफास्टने होते, तर दुपारच्या व रात्रीच्या जेवणात भारतीय तसंच आंतरराष्ट्रीय पदार्थही चाखायला मिळतात. मित्रमैत्रिणीसोबत आनंदात वेळ घालवायचा असेल तर 'पूल बार ॲण्ड ग्रिल' इथंही भेट देता येते. कर्जत रेडिसन ब्ल्यू इथून हायकिंगला जायचं असेल तर कोंढाणा लेणी किंवा कोथळीगड यांसारखे पर्याय उपलब्ध आहेत. भिवपुरी धबधब्यापासून हे केवळ १३ किलोमीटरवर आहे. इथे बिलिअर्डस आणि टेबल टेनिस असे दोन्ही खेळ खेळता येऊ शकतात.

# ऐतिहासिक












# शिरढोण

**(तालुका पनवेल)** आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके यांचे हे जन्मगांव. या गावी वासुदेव बळवंत फडके यांच्या स्मरणार्थ उभारलेले समाजमंदिर तसेच हुतात्मा स्मारक आहे. पनवेलपासून ६-७ कि.मी. अंतरावर पनवेल-पेण रस्त्यावर हे गांव आहे. फडके यांना पकडून एडन येथे जन्मठेपेची शिक्षा भोगण्यासाठी पाठवण्यात आले होते. शिरढोण येथील फडकेंच्या स्मरणार्थ बांधण्यात आलेल्या समाज मंदिरात तीन खोल्या असून एका खोलीत फडके वापरत असलेली बोकडाची गाडी ठेवलेली आहे. फडके यांच्या नातेवाईकांनी १९४० मध्ये गावातील मंदिरासमोर तळ्याच्या समोर दीपस्तंभ उभारला आहे.






स्मारक



स्मृतिमंदिर



महादेवाचे मंदिर





## गांगवली


**(तालुका माणगांव)** हे ऐतिहासिक स्थळ माणगांवच्या पूर्वेस साडेसहा किमी अंतरावर असून रायगडाकडे जाणारा जुना रस्ता येथून पाचाडमार्गे जात असे. छत्रपती पहिला शाहू यांचा जन्म येथे झाला. याबाबतची कथा अशी, की संभाजी महाराजांच्या पाठीवर शत्रू असताना त्याने गर्भवती असणाऱ्या राणी येसूबाईला पुढील प्रवास करणे शक्य नसल्याने या गावात कुंभाराच्या घरात ठेवले होते. तेथेच शाहूंचा जन्म झाला होता असे म्हणतात. पुढे नानासाहेब पेशव्यांनी छत्रपती शाहूंच्या स्मरणार्थ येथे महादेवाचे मंदिर बांधले. मंदिरासमोरून वाहणाऱ्या नदीच्या काठी दगडी बांध बांधला आहे.

## गागोदे बुद्रुक

**(तालुका पेण)** महान विचारवंत, स्वातंत्र्यसेनानी व भूदान चळवळीचे प्रणेते आचार्य विनोबा भावे आणि त्यांचे बंधू शिवाजीराव भावे यांचे हे जन्मस्थान आहे. ज्या घरात विनोबाजींचा जन्म झाला, तेथे त्यांचा अर्धाकृती पुतळा बसविला आहे. येथे गांधी सेवक समाजाचे ग्रामकेंद्र आणि विनोबा भावे आश्रम या संस्था आहेत. हे गांव बाबुराव आंग्रे यांनी इनामदार रास्ते यांस त्यांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल दिले होते. गावाच्या दक्षिणेकडील घाटातील सैतानमाळावर शिवाजी महाराजांचे सेनापती आबाजी सोनदेव यांनी कल्याणच्या सुभेदाराचा खजिना लुटला होता.





# चवदार तळे

**(तालुका महाड)** २० मार्च १९२७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे तळे तत्कालीन अस्पृश्य समाजासाठी खुले करून दिले. मुंबई हायकोर्टाने १७ मार्च १९३७ रोजी हे तळे सार्वजनिक असल्याचा निर्णय देऊन अस्पृश्यांना पाणी पिण्याचा व वापरण्याचा कायदेशीर हक्क मिळवून दिला. दरवर्षी २० मार्चला या तळ्याचा वर्धापनदिन साजरा केला जातो. महाड नगरपालिका आणि राज्य सरकार यांनी संयुक्तपणे २००३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाची उभारणी केली. वर्धापन दिनानिमित्त जमणाऱ्या शेकडो आंबेडकरी अनुयायांच्या भेटीमुळे हा परिसर गजबजून जातो.

या तळ्यात १४ विहिरी अथवा जिवंत झरे होते, त्यावरून त्याला चवदार तळे हे नाव प्राप्त झाले असावे. महाड नगरपालिकेने ऐतिहासिक चवदार तळ्याचे सुशोभीकरण केले असून तेथे चौथरा उभारण्यात आला असून त्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या साडेदहा फुटी पूर्णाकृती ब्रॉन्झ पुतळ्याची स्थापना करण्यात आली आहे. परिसरात सभागृह व वाचनालय बांधण्यात आले आहे. तळ्यातील चार कारंजांमुळे तळ्याचे सौंदर्य वाढले आहे.







## नवाबाचा राजवाडा

**(तालुका मुरूड)** मुरूड शहरात प्रवेश करताना आपले लक्ष वेधून घेतो तो नवाबाचा भव्य राजवाडा. सन १८८५ च्या सुमारास नवाब सदर राजवाड्याची निर्मिती करून, त्या ठिकाणी राहावयास गेला. राजवाड्याचे वास्तुशिल्प मुघल व गॉथिक पद्धतीचे असल्याचे समजते. हा राजवाडा नवाबाची खासगी मालमत्ता असून, तेथे त्यांचे वास्तव्य आहे. त्यामुळे हा भव्य ऐतिहासिक राजवाडा बाहेरूनच पाहावा लागतो. या ठिकाणाहून मुरूड शहर व भोवतालच्या सागरी परिसराचे दर्शन होते.

# खोकरीचे घुमट

**(तालुका मुरूड)** सिद्दींचे धर्मगुरू सय्यद अली नजीर व सिद्दी नवाबांच्या काही कबरी खोकरी या ठिकाणी आहेत. खोकरीचे घुमट म्हणून हे ठिकाण पर्यटकांना ठाऊक आहे. इतिहासकाळात दंडा-राजपुरी बंदराजवळचे खोकरी हे एक कमी वस्तीचे गांव होते. भारतीय व अरबी पद्धतीच्या शिल्पकलेचा एक उत्तम प्राचीन नमुना म्हणून या घुमटांचे शिल्पकाम पाहण्यास चोखंदळ पर्यटक येतात. सिद्दी सिरुलखान, सिद्दी खैरीयत खान व सिद्दी याकूतखान यांच्या कबरीसुद्धा याच ठिकाणी आहेत. हे ठिकाण मुरूड आगरदांडा रोडवर मुरूड एस.टी. डेपोपासून जवळपास ६ कि.मी. अंतरावर आहे.





# आक्षी येथील शिलालेख


कर्नाटक राज्यातील श्रवण बेळगोळ इथला बाहुबली गोमटेश्वराच्या मूर्तीखालील शिलालेख हा मराठीतील पहिला शिलालेख मानला गेला होता. हा ११९६-१७ दरम्यान कोरला गेला असावा असं मानलं जातं. परंतु महाराष्ट्रातील रायगड जिल्ह्यातील आक्षी या गावी त्याहूनही जुना शिलालेख सापडला. हा शिलालेख एक हजार वर्षांहून जुना आहे असं मान्य करण्यात आलं आहे.


ज्येष्ठ पुरातत्त्वज्ञ डॉ. श. गो. तुळपुळे यांच्या संशोधनानुसार हा मराठीतील पहिला शिलालेख आहे. या शिलालेखाची निर्मिती शके ९३४ म्हणजे इ.स.१०१२ झाली असल्याचा उल्लेख या शिलालेखावर कोरलेला आढळतो.नऊ ओळींच्या या देवनागरी लिपीतील शिलालेखावर संस्कृत भाषेचा प्रभाव दिसून येतो. पश्चिम समुद्रपती श्री कोकण चक्रवर्ती केसीदेवराय यांच्या महाप्रधान भरजु सेणुई यांनी हा शिलालेख कोरून घेतला होता. महालक्ष्मीदेवीच्या बोडणासाठी दर शुक्रवारी नऊ कुवली धान्य देण्याचा उल्लेख यावर करण्यात आला आहे. शके ९३४ मधील प्रभव संवत्सर अधिक कृष्णपक्षातील शुक्रवारी हा निर्णय घेतल्याचा उल्लेखही इथे आढळतो. तसेच भविष्यात या शिलालेखाचे विद्रूपीकरण न करण्याचे आवाहनही यात आहे.

भाषेची मौलिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्मयीन परंपरेचा स्वयंभूपणा, प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रूप असे जे काही निकष आहेत, त्यापैकी भाषेची प्राचीनता या निकषासाठी आक्षी येथील हा आद्य शिलालेख अतिशय महत्त्वाचा आहे. मराठी भाषेचे वय एक हजार वर्षांपेक्षा जास्त आहे, हे या शिलालेखावरून सिद्ध होते.

# नकाशे






**Themes:** Leisure, Eco, Pilgrimage

**Duration:** 3 Days, **Distance:** Approximately 100 Km





**Circuit No. 2:**

Chavadar Lake - Mahad – Gandharpale caves – Sav - Pachad – Raigad fort - Shivtharghal

**Themes:** Leisure, adventure, Pilgrimage

**Duration:** 2 Days, **Distance:** Approximately 70 Km




**Circuit No. 3:**

Kudpan – Umarath – Morzot waterfall – KapadeBudruk - Kangorigad

**Themes:** Eco, adventure

**Duration:** 3 Days, **Distance:** Approximately 105 Km




**Circuit No. 4:**

Janjira fort – Diveagar – Shriwardhan - Harihareshwar

**Themes:** Leisure, Pilgrimage, adventure

**Duration:** 3 Days, **Distance:** Approximately 155 Km




**Circuit No. 5:**

Mahad – Pali – Sudhagad – Kolad – Harihareshwar – Shriwardhan – Diveagar

**Themes:** Pilgrimage – Adventure - leisure

**Duration:** 3 days, **Distance:** Approximately 210 Km




**Circuit No. 6:**

Pali – Sudhagad fort – Unhere hot water spring

**Themes:** Pilgrimage, adventure

**Duration:** 2 Days, **Distance:** Approximately 20 Km




**Circuit No. 7:**

Elephanta caves - JNPT — Shirdhon – Karnala bird sanctuary – Uran - Kegaon

**Themes:** Leisure – Educational

**Duration:** 2 Days, **Distance:** Approximately 70 Km



**Circuit No. 8:**

Machi Prabal – Matheran – Mahad (Ashtavinayak) – Pali – varadayini water fall – Karnala bird sanctuary

**Themes:** Pilgrimage, adventure, Eco

**Duration:** 3 Days, **Distance:** Approximately 160 Km





**Circuit No. 9:**

Phansad – Nandgaon – Kashid

**Themes:** Leisure - Eco

**Duration:** 2 Days, **Distance:** Approximately 30 Km




**Circuit No. 10:**

Mahad (Ashtavinayak) – Pali – Kolad (river rafting) – Raigad Fort – Shirtharghal - Harihareshwar – Diveagar – Janjira fort – Kashid beach – Alibag

**Themes:** Pilgrimage - Leisure – Eco - Adventure


**Duration:** 5 Days, **Distance:** 400 Km




**Circuit No. 11: Fort circuit**

Machi Prabal – Sudhagad fort – Raigad Fort – Lingana fort – Kangori fort – Janjira fort – Korlai fort – Sagargad

**Themes:** Adventure



### Circuit No. 12: Beach circuit

Mandawa – Sasawane – Awas – Kihim – Varsoli – Alibag – Akshi – Nagaon – Kashid – Nandgaon – Murud – Dive agar – Shekhadi – Shriwardhan - Harihareshwar


**Themes:** Leisure




### Circuit No. 13: Temple circuit

Mahad – Pali – Kedar Janani – Shivtharghal – Harihareshwar – Chaul – Kanakeshwar

**Themes:** Pilgrimage



Circuit No. 14: Hill Station circuit

Matheran – Kumbhe – Kudpan


**Themes:** Eco tourism




Circuit No. 15: Wild life circuit

Karnala bird sanctuary – Phansad wild life

**Themes:** Wild life




**संदर्भ साहित्यः**

- रायगड जिल्हा गॅझेटियर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन १९९३
- रायगडची जीवनकथा : लेखक-शांताराम विष्णु आवळसकर, प्रकाशन-महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती -२००८
- मराठी विश्वकोष नोंदी
- सिंधुरत्न पर्यटन विशेषांक- २०१५.
- रायगडचा युवक दिवाळी अंक २०१७.

घारापुरी (एलिफंटा) । कोंडाणे लेणी । खडसांबळे (नेणवली)। कुडे । ठाणाळे (नाडसूर) । आंबिवली ।

रेवदांड्याचा इतिहास । द्रोणागिरी । कर्नाळा किल्ला । प्रबळगड । कासा (पद्मदुर्ग)। अवचितगड । सांक्षी

रेवदंडा आगरकोट । जंजिरा । तळागड । घोसाळगड । बिरवाडीचा किल्ला । लिंगाणा । सोनगड । बिकट

(ढवळ्या) । पेठचा किल्ला । ढाक । सरसगड । सूरगड । पीरवाडी । अलिबाग । वरसोली । थळ-किहि

धबधबा । फणसाड व सिद्धेश्वर धबधबा । झेनिथ धबधबा । ताम्हिणी व भिवपुरी । मंडाळा व वरदा

जीवना बंदर । रेवस । जे.एन.पी.टी. । दिघी । मांडवा । फणसाड । कर्नाळा । खारफुटीचे जंगल । ऑलिव्ह

(नांदगाव) । श्री विक्रम विनायक । मुगवली स्वयंभू गणपती । श्री हरिहरेश्वर काळभैरव । हरिहरेश्वर क्षेत्र

। वीरेश्वर । भुवनेश्वर । शितळादेवी । सोमजाई । दत्तमंदिर (चौल-भोवाळे) । दत्तमंदिर (मुरूड) । रूपना

धावीर महाराज । श्रीसिद्धनाथ व श्रीकेदारनाथ भैरव । शिवथरघळ । आवास । गगनगिरी आश्रम । शंकर

अली शाह दरबार । बेने इस्रायली आळी । घोणे काष्ठशिल्प संग्रहालय । करमरकर शिल्पालय । उरण । ना


रेवदंड्याचे नानासाहेब व अप्पासाहेब धर्माधिकारी । चिरनेरचा जंगल सत्याग्रह । गेल इंडिया लिमिटेड ।




। रॅडिसन अलिबाग व कर्जत । शिरढोण । गांगवली । गागोदे बुद्रुक । चवदार तळे । नवाबाचा राजवाड

पाले । कोल । दुर्गदुर्गेश्वर रायगड । इतिहासातील रायगड जिल्हा । ऐतिहासिक अलिबाग । चौल ।
। कोथळीगड । कुलाबा किल्ला । खांदेरी । उंदेरी । सागरगड । कांगोरी (मंगळगड) । कोर्लई ।
टगड (पेब) । भिवगड । रतनगड । माणिकगड । महेंद्रगड । ईर्शाळगड । सोनगिरी (मिरगड) । चंद्रगड
म । आक्षी । नागांव । काशिद । श्रीवर्धन । दिवेआगर । मुरूड । हरिहरेश्वर । माथेरान । सवतकडा
यिनी । पांडवकडा । भीमाची काठी । झुलता पूल । डोलवाला । शहापाडा । हेटवणे । मोर्बे व गारंबी ।
रिडले टर्टल्स । जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या । बल्लाळेश्वर मंदिर । वरदविनायक (महड) । सिद्धीविनायक
ाची परिक्रमा । श्री रामेश्वर । श्री कनकेश्वर । जीवनेश्वर । कुसुमेश्वर । दिवेआगर सुवर्णमंदिर । उत्तरेश्वर
रायण व सुंदरनारायण । बोंबल्या विठोबा । वरसोलीचा विठ्ठल । उन्हेरे । लक्ष्मीनारायण । पेशवे मंदिर ।
रगिरी महाराज मठ । वाळणकुंड । सव । उद्धर । अफनासी निकितीन स्मृतिस्तंभ । ईदगाह । हजरत
गांवची मंदिरं । हंबीररावांच्या शिलालेखाचा ठसा । चुंबकीय वेधशाळा । हिराकोट (अलिबाग कारागृह) ।
पनवेल । इर्मॅजिका । एन डी फिल्म वर्ल्ड । रायगड जिल्हाधिकारी निवासस्थान व शासकीय विश्रामगृहे
ा । खोकरी । आक्षी शिलालेख...

महाराष्ट्र शासन

**रायगड
जिल्हाधिकारी
प्रकाशन**







Created by Media R&D (I) Pvt Ltd 9819907982